UNIVERSAL LIBRARY
OU_192660
UNIVERSAL LIBRARY

बंकिमचंद्र साहित्य-माला–६

# चंद्रशेखर

[ संक्षेपित आवृत्ति ]

★

: लेखक :

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय

: अनुवादक–संक्षेपक :

भा. वि. वरेरकर

★

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई ४.

: प्रकाशक :

रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन-संस्था,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

★

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

★

आवृत्ति पहिली,
जून १९५४

★

किंमत दोन रुपये

★

: मुद्रक :

रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

# प्रस्तावना

प्रस्तुत कादंबरी 'वंगदर्शन' मासिकांत १८७३ सालीं बारा अंकांत प्रसिद्ध झाली होती. त्यावेळीं परिशिष्ट धरून तिचीं पंचेचाळीस प्रकरणें होतीं. खंड-विभाग केलेले नव्हते. १ जून १८७५ रोजीं ही पुस्तक स्वरूपांत प्रसिद्ध झाली, त्यावेळीं बंकिमचंद्रानीं तिच्यांत बरेचसे फेरफार केले होते. उपक्रमणिका सोडून ती सहा खंडांत विभागली होती आणि सर्वसाधारण तिचीं एकूण-चाळीस प्रकरणें झालीं होतीं. मूळ 'वंगदर्शन' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या कथेंतील कांहीं प्रकरणें पुस्तकांत गाळलीं होतीं.

बंकिमचंद्रांच्या त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं म्हटलें होतें:—

"चंद्रशेखर पहिल्यानें वंगदर्शनमधून प्रसिद्ध झालें, पण या पुस्तक स्वरूपांत त्यांतला बराचसा भाग बदलला गेला आहे, बराचसा भाग गाळला आहे आणि कांहीं कांहीं ठिकाणीं कांहीं भाग पुन्हा लिहिला गेला आहे.

"या कथेंत ज्या ऐतिहासिक घटनांचा उल्लेख केलेला आहे, त्यांतील कांहीं कांहीं प्रसंग भारतवर्षाच्या किंवा बंगालच्या प्रचलित इतिहासांत सर्वस्वी सांपडतीलच असें नाहीं. मताक्षरीन् नांवाच्या फ्रेंच ग्रंथाचा जो इंग्रजींत अनुवाद आहे त्या ग्रंथाचा ऐतिहासिक प्रसंगाच्या बाबतींत कुठें कुठें आधार घेतला आहे. हा ग्रंथ सध्या दुर्मिळ आहे. त्याची नवी आवृत्ती निघणें अवश्य आहे."

बंकिमचंद्रांच्या हयातींत 'चंद्रशेखर'च्या आणखी दोन आवृत्ती प्रसिद्ध झाल्या होत्या. १८८३ सालीं दुसरी आवृत्ती (पृष्ठें १९७) आणि १८८९ सालीं तिसरी आवृत्ती (पृष्ठें २३१) प्रसिद्ध झाली होती. चवथी आवृत्ती बंकिमचंद्र ज्या वर्षी स्वर्गवासी झाले त्याच वर्षी, म्हणजे १८९४ सालीं, त्यांच्या पश्चात प्रसिद्ध झाली होती. दुसऱ्या आणि तिसऱ्या आवृत्तींत देखील बंकिम-चंद्रांनीं बऱ्याचश्या दुरुस्त्या केल्या होत्या. प्रस्तुत ग्रंथाला त्या तिसऱ्या आवृत्तीचा आधार घेतलेला आहे.

कथानक ऐतिहासिक असो कीं अलौकिक असो, बंकिमचंद्रांची प्रवृत्ती अद्भुततेकडे विशेष असे. विषवृक्ष आणि इंदिरा या सामाजिक कथा लिहून झाल्यावर त्यांनीं पुन्हा आपली नजर ऐतिहासिक कथेकडे वळवली. अशी ऐतिहासिक कथा लिहितांना ते सर्वस्वी प्राकृत इतिहासावर अवलंबून रहात नसत. या कथेंतील रमानंदस्वामी, चंद्रशेखर, प्रताप आणि रामचरण हे त्यांचे

मानसपुत्र आहेत. इतिहासाच्या दृष्टीनें या व्यक्तींच्या कथेला सजीवपणा आणण्यासाठीं त्यांनीं मीरकासीम आणि इंग्रज लोक यांच्यांतल्या झगड्याच्या पार्श्वभूमीची या कथेला जोड दिली आहे. या जोडीमुळें प्रताप आणि शैवलिनी यांच्या सामाजिक पटभूमिकेला वास्तव स्वरूप आलें आहे.

प्रस्तुत कथेच्या अवलोकनावरून असें दिसून येतें, कीं बंकिमबाबूंचा आध्यात्मिक योगबलावर विश्वास असावा, पण तो तसा खरोखरच होता, कीं या कथेला वैचित्र्य आणण्यासाठीं त्यानीं तो आभास उत्पन्न केला आहे, हें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं.

बंकिमबाबूंच्या सर्व कथानकांत 'प्रताप' ही भूमिका आदर्शचरित्र या नात्यानें त्यांनीं निर्माण केली असें समजलें जातें. महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें ही भूमिका क्वचित अतिरंजित स्वरूपांत निर्माण केली गेली आहे असें ठरण्याचा संभव आहे, पण बंगालच्या चिकित्सक साहित्यिकांनीं ही निर्मिती असामान्य असल्याचें पुन्हापुन्हा घोषित केलें आहे.

चंद्रशेखर या कादंबरीवर साधक आणि बाधक अशा दोन्ही प्रकारच्या टीकांची झोड उठवली गेली होती. विशेषतः जमीदार वर्ग या कथेमुळें बंकिमबाबूंवर रुष्ट झाला होता. तरीही सर्वसामान्य लोकप्रियतेच्या दृष्टीनें ही कादंबरी अव्वल दर्जाची समजली गेली आहे.

बंकिमचन्द्रांच्या हयातींत या कादंबरीचा अनुवाद कोणत्याच भाषेंत झाला नव्हता. १९०४ सालीं मन्मथनाथ राय चौधरी यांनीं या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केला. त्याच्या दुसऱ्याच वर्षी देवेंद्रचन्द्र मल्लिक यानीं आणखी एक इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केला होता. १९०८ सालीं. एस्. टी. पिल्ले आणि एस्. के. शर्मा या दोन लेखकांनीं या कथेचे तमीळ अनुवाद प्रसिद्ध केले होते. १९१० सालीं टी. एस्. राव यानीं केलेला तेलुगू अनुवाद प्रसिद्ध आहे. याच काळच्या सुमाराला वाईच्या 'कादंबरी कल्पद्रुम' मासिकांतून या कथेचा मराठी अनुवाद प्रसिद्ध झाल्याचें मला आठवतें. पुढें भारतगौरव ग्रंथमालेंत वा. गो. आपटे यांनीं केलेला अनुवाद प्रसिद्ध आहे. १९२० सालीं कलकत्त्याच्या 'स्टार' थिएटरमध्ये या कथानकावर आधारलेल्या नाटकाचा प्रयोग मी पाहिला होता. पण तें नाट्यीकरण कुणी केलें होतें तें प्रसिद्ध करण्यांत आलें नव्हतें. या नाटकांतील कांहीं भाग चित्रपटाच्या द्वारें दाखवले गेले होते.

— भा. वि. वरेरकर

# चंद्रशेखर

# उपक्रमणिका

भागीरथीच्या तीरीं एका आंब्राईत एक मुलगा संध्याकाळच्या वेळीं नदीच्या लाटांचा आवाज ऐकत पडला होता. त्याच्या पायाशीं बसलेली एक मुलगी त्याच्या तोंडाकडे नुसतीच पहात बसली होती. त्या मुलाचें नांव प्रताप—मुलीचें नांव शैवलिनी. तिचें वय होतें सात आठ वर्षें—आणि प्रताप तिच्यापेक्षां दोन तीन वर्षांनीं मोठा होता. तितक्यांत एक कोकिळ कुहु कुहू आवाज करीत त्यांच्या मस्तकावरून उडून गेला. त्याला वेडावीत शैवलिनीही त्याच्या मागें धांवत गेली. तो दिसत नाहींसा झालेला पहातांच ती मागें परतली.

तिनें येतां येतां तिथल्या झुडुपांवरचीं कांहीं फुलें तोडलीं, त्यांची माळ गुंफली, ती त्या मुलाच्या गळ्यांत घातली, पुन्हा ती काढून घेऊन आपल्या खोप्यावर ठेवून दिली—तिचें समाधान झालें नाहीं—तिनें ती माळ घेऊन शेजारीं चरत असलेल्या एका गाईच्या शिंगावर ठेवून दिली.

काळोख पडूं लागला. ती दोघेंही आकाशांतल्या चांदण्या मोजूं लागलीं. त्या मोजण्यांतून भांडण सुरू झालें—तूं किती पाहिल्यास ? मी किती पाहिल्या ?

नदीवरून होड्या जात होत्या. त्या मोजतांनाही असेंच भांडण सुरू झालें. शैवलिनीला नऊ आकड्यापलीकडे मोजतां येत नसे. प्रतापनें एकवीस होड्या मोजल्या, तेव्हां ती ओशाळली.

रोज असेंच चालत असे. त्यामुळें दोघेंही एकमेकांशीं जखडलीं जाऊं लागलीं. तें प्रेम नव्हतें. आठ बारा वर्षांच्या मुलांना प्रेम कुठें कळत होतें ? लहान मुलें बाहुला बाहुलीचीं लग्नें लावतात त्याप्रमाणें आपलेंही लग्न लावायची आवड त्यांच्याठायीं उत्पन्न होते. शैवलिनीला वाटे, प्रतापबरोबर आपलें लग्न व्हावें—प्रतापला माहीत होतें कीं तसें होणार नाहीं. त्यांचें गोत्र एक होतें.

शैवलिनी होती दरिद्री माणसाची मुलगी. आईखेरीज तिला दुसरें कुणीच नव्हतें. संपत्ती म्हणायला होतें एक झोंपडीवजा घर—आणि शैवलिनीचें सौंदर्य. प्रताप देखील दरिद्रीच होता.

शैवलिनी वाढत चालली होती. पण तिचें लग्न होत नव्हतें. लग्नासाठीं पैसा आणायचा कुठून ! त्या जंगलांतलें हें रत्न शोधून काढून त्याचें मोल ओळखणारा होता कोण !

शैवलिनीला हळुहळु कळूं लागलें—प्रतापशिवाय या जगांत दुसरा कुणीच आपल्या जोडीचा नाहीं ! तिला कळून आलें, या जन्मीं तरी प्रतापची प्राप्ती होणें शक्य नाहीं. तीं दोघेंही आपल्या परीनें खलबतें करीत होतीं. कुणाला तें माहित नव्हतें.

एके दिवशीं तीं गंगेंत उतरलीं. पोहूं लागलीं. दोघेंही पोहण्यांत पटाईत होतीं. पावसाळ्यांतली उफाळलेली नदी—पण तीं बेछूट पोहत होतीं. पोहत पोहत तीं बरींच दूर गेलीं.

काठावरचीं माणसें त्यांना हांका मारीत होतीं.

त्यांनीं ऐकलें नाहीं. तीं तशींच पोहत पोहत दूर दूर गेलीं. तेव्हां प्रताप म्हणाला, "शैवलिनी, हेंच आमचं लग्न !"

शैवलिनी म्हणाली, "खरंच ! इथंच !"

प्रतापनें बुडी मारली. शैवलिनीनें बुडी मारली नाहीं. ती घाबरली. तिला वाटलें—कां म्हणून मरायचें ? प्रताप माझा कोण ? मला भीती वाटते. मी जीव देणार नाहीं. शैवलिनी पोहत पोहत पुन्हा किनाऱ्यावर आली.

प्रतापनें जिथें बुडी मारली होती तिथून जवळच थोड्या अंतरावरून एक होडी जात होती. होडींतल्या माणसांनीं प्रताप बुडाल्याचें पाहिलें. त्यांनीं पाण्यांत उडी घेतली. तो होता चंद्रशेखर शर्मा !

चंद्रशेखर पोहत पोहत गेला आणि त्यानें प्रतापला बाहेर काढून आणून होडींत बसवलें. त्याला घेऊन तो किनाऱ्यावर गेला. होडींतून उतरून प्रतापला बरोबर घेऊन तो त्याच्या घरीं गेला. प्रतापची आई आपल्या मुलाच्या रक्षणकर्त्याला तसाच जाऊं देईना. तिनें काकुळतीला येऊन त्याला आपल्या घरीं राहून घेतलें.

चंद्रशेखरला आंतली गोष्ट कांहीं माहीत नव्हती. शैवलिनी प्रतापच्यासमोर येत नव्हती, पण चंद्रशेखरनें तिला पाहिलें. तिला पहातांच तो मुग्ध झाला.

तो सध्या थोड्याशा अडचणींतच होता. बत्तीस वर्षे उलटून गेलीं तरी त्यानें लग्न केलें नव्हतें. ज्ञानार्जन करणाऱ्या व्यक्तीला लग्न हें विघ्न असतें, म्हणून अजूनपर्यंत तो अविवाहित राहिला होता. एक वर्षापूर्वीच त्याची आई स्वर्गवासी झाली होती. आतां मात्र लग्न न करणें हेंच विघ्न होऊन राहिलें होतें. स्वैंपाकापासून सारींच कामें आतां त्याला स्वतःच करावीं लागत होतीं, त्यामुळें अध्ययन अध्यापन करायला त्याला वेळ मिळत नव्हता. देवधर्माचीं कामें सुरळित रितीनें होत नव्हतीं. घरांत सारी अव्यवस्था माजली होती. जमाखर्चाला ताळतंत्र राहिला नव्हता. आतां लग्न केल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें त्याला वाटूं लागलें होतें.

पण लग्न करायचें तें सुंदर स्त्रीशीं करूं नये असें त्याला वाटे. कारण सुंदरीच्या प्रेमांत गुंतला कीं माणूस संसारांत गुंतून पडतो. ज्ञानार्जनाला पारखा होतो.

अशा प्रकारच्या मानसिक अवस्थेंत असतांना शैवलिनी त्याच्या नजरेसमोर आली. तिला पाहातांच त्याचा सारा संयम ढांसळला. सारे बेत कुठल्याकुठें नाहींसे झाले. त्यानें आपण होऊन शैवलिनीला मागणी घातली आणि तिच्याशीं लग्न केलें.

सौंदर्याच्या मोहानें कोण वेडा होत नाहीं ! या कथेला आरंभ होत आहे तो हें लग्न झाल्यानंतर आठ वर्षांनीं.

★

# प्रथम खंड

## : १ :

सुभे बंगाल, बिहार आणि उडिया प्रांताचा अधिपती नबाब अलीजा मीरकासीम खाँ मुंगेरच्या किल्ल्यांत रहात होता. किल्ल्यांतला वाडा अगदीं सजवलेला होता. रात्रीचा पहिला प्रहर अजून उलटला नव्हता.

त्या सुसज्जित दिवाणखान्यांत एका बैठकीवर किनखाबाच्या तक्याला टेकून एक मुलीसारखी दिसणारी तरुणी गुलिस्ताँ वाचायचा प्रयत्न करीत होती. ती होती सतरा वर्षांची, पण तिचा बांधा फार नाजुक होता.

वाचीत असतांना ती पुन्हा पुन्हा वर पाहून म्हणत होती, " अजून कसे आले नाहींत ? कशाला येतील ? हजारों दासींतली मी एक दासी, माझ्यासाठीं त्यांनीं इतक्या दूर यावं काय म्हणून ? "

पुस्तकांत तिचें मन रमत नव्हतें. ती पुन्हां पुन्हां वाचायचें टाकून वाटेकडे डोळे लावीत होती.

शेवटीं ती कंटाळली. पुस्तक टाकून उठली. ती उठून उभी राहातांच तिच्या सौंदर्याच्या तेजानें सारा दिवाणखाना उजळून उठला.

तिनें वीणा हातांत घेतली, तार छेडली, हळुहळू गायला सुरवात केली—कुणाच्या कानीं जाऊं नये अशा स्वरांत ती गात होती. इतक्यांत बाहेरून शिपायांची खडी तालीम ऐकूं आली. ती दचकून उठली. घाबऱ्याघुबऱ्या दाराशीं जाऊन उभी राहिली. नबाब मीरकासीम अलीखाँ आंत येत होते.

आसनावर बसल्यावर नबाबानीं विचारलं, "कुठलं गाणं गात होतीस दलनी बिबी ?" तिचं नांव होतं दौलतउन्निसा. नबाब तिच्या नांवाचा संक्षेप करून तिला म्हणे दलनी. अर्थात सारे लोकसुद्धां तिला दलनी बेगम किंवा दलनी बिबी म्हणत असत.

दलनी खालीं मान घालून लाजून उभी राहिली होती. नबाब म्हणाला, "तेंच गाणं गा पाहूं."

मोठी पंचाईत आली. वीणेची तार कांहीं केल्या सूर देईना. तिनें सारंगी घेऊन पाहिली. तीही बेसूर होती. नबाब म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं. तीच घेऊन गा."

दलनीला वाटलें, कीं आपल्याला सूरज्ञान नाहीं असें का नबाबला वाटतें ? बेसूर हत्याराबरोबर गायचें कसें ? तिनें पुष्कळ प्रयत्न केला, पण कांहीं केल्या तिच्या तोंडांतून सूर बाहेर फुटेना. तिनें साथीचीं हत्यारें फेंकून दिलीं आणि म्हटलें, "मी नाहीं गात !"

नबाब चकित होऊन म्हणाला, "कां ? राग आला का तुला ?"

दलनी म्हणाली, "कलकत्त्याचे इंग्रज जें वाद्य वाजवून गातात तेंच आणून दिलंत तरच गाईन मी, नाहीं तर नाहीं."

नबाब हंसला आणि म्हणाला, "त्या वाटेंत कांटा उगवला नाहीं तर खात्रीनं आणून देईन."

"कांटा कसला ?" तिनें विचारलें.

नबाब म्हणाला, "कदाचित त्यांच्याबरोबर विरोध यायचा प्रसंग आहे. तुला माहीत नाहीं का ती हकिकत ?"

"माहीत आहे." असें म्हणून दलनी उगीच राहिली. तेव्हां नबाब म्हणाला, "कसला विचार करते आहेस ?"

दलनी म्हणाली, "एकदां आपण म्हटलं होतं, कीं इंग्रजांबरोबर जो झगडा करील तोच हरेल ! मग काय म्हणून तुम्ही त्यांच्याबरोबर विरोध करूं पाहतां ? मी एक पोर आहें—आपली दासी आहें—आपल्यासमोर मी असं बोलणं योग्य नव्हे, पण हा अधिकार आहे प्रेमाचा—"

"तें खरं आहे दलनी," नबाब म्हणाला, "माझं प्रेम आहे तुझ्यावर. कुठल्या स्त्रीवर मी तुझ्याइतकं प्रेम केलं नाहीं आणि करणारही नाहीं. ऐक—माझा नाइलाज झाला आहे. तूं अगदीं माझीच आहेस म्हणूनच मी उघड करून बोलतों आहें—माझी अगदीं खात्री आहे, कीं या झगड्यांत मीं राज्य हरवून बसेन—कदाचित प्राणही हरवून बसेन—मग कां ही लढाई करायला सरसावलों आहें ? इंग्रज वागताहेत राजासारखे. मी नुसता नामधारी राजा. ज्या राज्यांत मी राजा नाहीं तें राज्य घेऊन मला काय करायचं ? शिवाय ते म्हणतात, 'हें राज्य आहे आमचं पण प्रजेला पिळून काढायचा भार आहे तुझ्यावर. आमच्या वतीनं प्रजेला तूं पिळून काढ.' तें पाप मी कां करूं ? प्रजेच्या कल्याणासाठीं जर मला राज्य चालवतां येत नाहीं, तर त्या राज्याचा त्याग करणं हेंच ठीक ! निष्कारण पापाचा आणि कलंकाचा भागीदार कां होऊं ? मी सिराजउद्दौला नाहीं कीं मीरजाफरही नाहीं !"

दलनीनें मनांतल्या मनांत बंगालच्या नबाबाला हजार आशीर्वाद दिले. ती म्हणाली, "आपणच असं म्हटल्यावर मी काय बोलूं ? पण मला एक भिक्षा घाला—स्वतः लढाईवर जाऊं नका."

नबाब म्हणाला, "बंगालच्या नबाबानं काय बायकांच्या हुकुमानं वागायचं ? अन् अशा बाबतींत मोठ्यांना सल्ला देणं हेंच का पोरींचं कर्तव्य ?"

दलनी ओशाळली. ती म्हणाली, "मला क्षमा करा. मी चुकून तसं बोललें. पण मला आणखी एक भिक्षा घाला—लढाईवर जायचं असेल तर मलाही आपल्याबरोबर न्या."

"म्हणजे तूं लढणार आहेस का तिथं ?" नबाब म्हणाला, "गुरगनखाँला बडतर्फ करून तुला देऊं का त्याची जागा ?"

दलनी अधिकच ओशाळली. ती उगीच राहिली. नबाब मोठ्या प्रेमानें म्हणाला, "बरोबर यावं असं कां वाटतं तुला ?"

"सदोदित आपल्या बरोबर रहावं म्हणून !" ती म्हणाली. नबाबानें कांहीं केल्या तिच्या मागणीला संमती दिली नाहीं. तेव्हां थोडीशी हंसून दलनी म्हणाली, "जहांपन्हा, आपण ज्योतिष जाणतां—सांगा पाहूं, लढाईच्यावेळीं मी कुठं असेन ?"

मीरकासीमनें कलमदान मागून घेतलें. तो हिंदू पंडितांकडे ज्योतिष शिकला होता. त्यानें प्रश्नकुंडली मांडली. थोडावेळ तो त्या कुंडलीकडे पहात बसला होता. नंतर त्यानें तो कागद फेंकून दिला. दलनीनें विचारलें, "काय दिसलं?"

मीरकासीम म्हणाला, "फार चमत्कारिक आहे तें. तुला सांगण्याजोगं नाहीं."

नबाब लगेच उठून बाहेर गेला. त्यानें मीर मुन्शीला बोलावून घेतलें आणि हुकूम केला, "मुर्शिदाबादच्या कुणा हिंदू अधिकाऱ्याला सांगा, कीं मुर्शिदाबादच्या शेजारींच वेदग्रामांत चन्द्रशेखर नांवाचा एक विद्वान ब्राह्मण रहात असतो. त्यानंच मला ज्योतिष शिकवलं. त्याला बोलावून घेऊन म्हणावं, कीं यावेळीं इंग्रजांशीं आमची लढाई जुंपली तर त्या लढाईच्या काळांत आणि लढाईनंतर दलिनी बेगम कुठं असेल?"

मीर मुन्शीनें हुकुमाची तामिली केली. चंद्रशेखरला आणण्यासाठीं मुर्शिदाबादला माणसें पाठवलीं.

● ●

## : २ :

♣ **भीमा** नांवाच्या एका मोठ्या तलावाच्या चारी कांठाला ताडांच्या झाडांच्या रांगा लागल्या होत्या. अस्ताला जाणाऱ्या सूर्याचीं किरणें तलावाच्या पाण्यांत पडलीं होतीं. घाटाच्या बाजूला छोटीं छोटीं झाडें आणि झुडुपें होतीं. त्यांच्या आड पाणी भरायला आलेल्या गांवच्या बायका कुणाच्या नजरेसमोर येत नव्हत्या. हातांत कळशा घेऊन आलेल्या शैवलिनी आणि सुंदरी या त्या झुडुपाआड पाण्याशीं खेळत बसल्या होत्या.

कसला हा खेळ? पाण्यावर कळश्या ठेवायच्या, त्या हालवायच्या, त्या हालल्या म्हणजे पाण्यावर वाटोळ्या वाटोळ्या लहरी यायच्या आणि त्या लहरींच्या तालांत कळशीही पाण्यावर नाचत राहायची. घाटावर बसल्या-बसल्या पाण्यांत पाय सोडायचे, हालवायचे—त्याचे तरंग उठायचे—दोन्हीही सारखींच! पाणीही चंचल आणि स्त्रीजातही चंचल! पाण्याला डाग लागत नाहीं—स्त्रीच्या हृदयाला लागतो का डाग?

सरोवराच्या पाण्यांत पडलेलीं सूर्याचीं किरणें हळुहळु ओसरलीं आणि पाणी काळें पडूं लागलें तेव्हां सुंदरी म्हणाली, "चल बाई, काळोख पडला. आतां घरीं जाऊं !"

"कोण नाहीं इथं," शैवलिनी म्हणाली, "हळुच एक गाणं म्हण पाहूं."

"पुरे झालं !" सुंदरी म्हणाली, "चल आतां घरीं !"

शैवलिनी गाऊं लागली.—

"मर मेले !" सुंदरी म्हणाली, "मदनमोहन बसला आहे घरीं. आतां चल तिकडे."

शैवलिनी म्हणाली, "त्याला जाऊन सांग, भीमेचं पाणी थंड थंड लागलं, तेव्हां तुझी मदनमोहिनी आंत बुडी मारून मेली."

"आतां ही थट्टा पुरी कर." सुंदरी म्हणाली, "रात्र झाली आहे. आतां मी थांबत नाहीं. ती खेमीची आई म्हणत होती, इकडे एक गोरा आला आहे."

"त्याला कशाला भ्यायचं ?"

"म्हणतेस काय ग मेले ? उठ नाहींतर चाललें मी." सुंदरी म्हणाली, "या इथं घाटावर संध्याकाळच्या वेळीं खरोखरच का एकटी थांबणार आहेस ?"

शैवलिनीनें उत्तर दिलें नाहीं. नुसतें बोटानें दाखवलें—तलावाच्या दुसऱ्या कांठाला ताडाच्या झाडाखालीं—कोण तो ?—सुंदरीनें कमेरवरची कळशी जमिनीवर फेंकली आणि ती धूम पळत सुटली. ताडाच्या झाडाखालीं एक इंग्रज उभा असलेला दिसला.

इंग्रजाला पाहून शैवलिनी जाग्यावरून हालली नव्हती. तिनें पाण्यांत गळ्यापर्यंत बुडी मारली होती. सरोवरांत उगवलेल्या कमळासारखें तिचें सुंदर मुखमंडल दिसत होतें.

सुंदरी पळून गेली असें पाहून तो इंग्रज हळुहळू घाटापाशीं आला. तो दिसायला तरुण होता. त्याचे केंस इतर इंग्रजांपेक्षां जसे काळे होते, तसेच त्याच्या डोळ्यांतलीं बुबुळेंही बरींचशीं काळीं होतीं. तो घाटाखालीं आला आणि म्हणाला, "I come again fair lady !"

"O! That nasty gibberish. I must speak it I suppose—मैं again आया है."

शैवलिनी म्हणाली, "कां ? यमाच्या घराचा रस्ता आहे का हा ?"

"क्या बोलता है ?"

"मी म्हणतें आहें, यम विसरला का तुला घेऊन जायला ?"

"जम ?" साहिब म्हणाला, "जॉन यू मीन ? हम जॉन नहीं. हम लॉरेन्स."

"छान !" शैवलिनी म्हणाली, "एक इंग्रजी शब्द कळला—लॉरेन्स म्हणजे माकड."

त्यावेळीं शैवलिनीच्या तोंडच्या बऱ्याचशा देशी शिव्या खाऊन लॉरेन्स फॉस्टर निघून गेला. तलावाच्या टेंकाडावरून खालीं उतरून आंबराईत असलेल्या घोड्यावर बसून तो जात असतांना आपल्याशींच म्हणत होता, "आमच्या थंड देशांतल्या हिमवर्षावासारख्या मेरीच्या प्रेमांत कित्येक वर्षे गुंतून पडलों होतों. आतां तें नुसतं स्वप्नच राहिलंय. देश बदलला कीं रुचीसुद्धां कशी बदलते ही ! थंड्या देशांतली थंडावलेली मेरी आणि ही गरम देशांतली जळजळीत सुंदरी—तुलना होईल का यांची ? तें सांगतां येत नाहीं !"

फॉस्टर निघून गेल्यावर शैवलिनी पाण्याची भरलेली कळशी कडेवर घेऊन घरीं आली. कळशी ठेवून ती शेजघरांत गेली. तिथें चन्द्रशेखर कांबळें अंथरून बसला होता आणि समोर पणतीचा दिवा घेऊन भूर्जपत्रावर लिहिलेली पोथी वाचीत होता.

चन्द्रशेखराचें वय यावेळीं बेचाळीस वर्षांचें होतें.

घरांत येतांना शैवलिनीला प्रश्न पडला होता, कीं एवढ्या रात्रपर्यंत कुठं होतीस म्हणून नवऱ्यानें विचारलें तर त्याला काय सांगावें ? पण ती आंत आली तरी चन्द्रशेखर कांहीं बोलला नाहीं. तो ब्रह्मसूत्रावरची टीका वाचण्यांत गढून गेला होता. शैवलिनी हंसली, तेव्हां त्यानें तिच्याकडे पाहिलें आणि म्हटलें, "ही अवेळीं वीज कां चमकली ?"

"मला वाटलं होतं कीं तुम्ही मला टाकून बोलाल," शैवलिनी म्हणाली· "पाणी घेऊन यायला उशीर लागला म्हणून बोलाल."

“ खरंच की ! ” चन्द्रशेखर म्हणाला, “ आतां आलीस ना ? कां उशीर लागला ? ”

शैवलिनी म्हणाली, “ एक गोरा आला होता. त्याला पाहून सुंदरीवन्सं मला टाकून पळून गेली. मी पाण्यांत उतरलें होतें. घाबरून मी गळाभर पाण्यांत बुडी घेऊन राहिलें अन् तो गेला तेव्हां निघून आलें. ”

“ अशी जाऊं नकोस—” असें कांहींतरी विचूक बोलून त्यानें पुन्हां शांकरभाष्यांत डोकें खुपसलें.

बरीच रात्र उलटून गेली तरीही चंद्रशेखर प्रमा, माया, स्फोट, अपौरूषेयत्व वगैरेंच्या खटाटोपांत अडकून पडला होता. नवऱ्याचें ताट वाढून त्याच्या शेजारीं ठेवून शैवलिनीनें स्वतःचें जेवण उरकलें आणि शेजारच्या बिछान्यावर ती झोंपी गेली. सारी रात्र वाचन करीत बसायची संवय असल्यामुळें चंद्रशेखरनें तिला तसेंच करायची ताकिद दिली होती.

बाहेर कुठेंतरी घुबडाचा आवाज ऐकूं आला. रात्र बरीच झाली असावी असें वाटून चंद्रशेखरनें पोथी गुंडाळून ठेवली. उभा राहून तो आळस देत होता. उघडया खिडकीनून त्याची नजर बाहेर गेली. चंद्र उगवला होता. त्याचे किरण शैवलिनीच्या सुंदर मुखावर पडले होते. तो डोळे भरभरून तिच्याकडे पहात असतांना त्याच्या डोळ्यांत आसवें आलीं. तो आपल्याशींच म्हणाला, ‘ कशाला मी हिच्याशीं लग्न केलं ? राजमुकुटांत शोभायला योग्य असलेली ही हिरकणी विद्याभ्यासजड ब्राह्मणाच्या घरांत काय म्हणून मी आणून टाकली ? मी सुखी झालों खरा, पण ही सुखी झाली आहे का ? हिच्या माझ्या वयांत केवढं हें अंतर !—इथं अनुराग उत्पन्न होणार कसा ? मी असा हा पोथींत डोकं खुपसून पडलेला, शैवलिनीच्या सुखाची आठवण कुठं करतोंय मी ? माझ्या पोथ्या रचून ठेवण्यांत या सुंदर तरुणीला कोणतं सुख लाभणार आहे ? केवढा स्वार्थी मी ! कां मला ही दुर्बुद्धी झाली ? आतां काय करूं मी ? एवढ्या कष्टानं मिळवलेल्या या पोथ्या पाण्यांत फेंकून देऊन या सुंदरीच्या तोंडाकडे पहात का बसूं ?—छे छे तें शक्यच नाहीं ! तर काय या निरपराध शैवलिनीला माझ्या पापाचं प्रायश्चित्त भोगायला लावूं ? हें नाजुक फूल काय अतृप्तीच्या आगींत भाजून काढूं ? ’

विचाराच्या भरांत तो जेवण विसरला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीर मुन्शीकडून निरोप आला—चंद्रशेखरला नबाबानें मुर्शिदाबादला बोलावलें होतें.

• •

## : ३ :

वेदग्रामाच्या शेजारींच असलेल्या पुरंदरपूर नांवाच्या गावीं इस्टइंडिया कंपनीची एक छोटीशी रेशमाची वखार होती. लॉरेन्स फॉस्टर हा तिथला कोठीवाला होता. मेरी नामक एका मुलीच्या प्रेमभंगामुळें निराश होऊन इस्टइंडिया कंपनीची नोकरी पत्करून तो बंगाल्यांत आला होता. भारतवर्षांत आले म्हणजे इंग्रजांना एक रोग जडतो—पैसे उकळणें. थोड्याच अवधींत फॉस्टरला हा रोग जडला आणि त्याचबरोबर त्याच्या मनांतून मेरीची प्रतिमा पुसली गेली. एकदां वेदग्रामांत गेला असतांना तलावाच्या काठीं त्यानें शैवलिनीला पाहिलें. त्याला पाहून शैवलिनी पळून गेली खरी, पण तिची मूर्ती मात्र त्याच्या हृदयांत ठसून राहिली.

पैशाच्या लोभानें कित्येक बंगाली तरुणी त्यावेळीं इंग्रजांच्या जनानखान्यांत जात होत्या, तशीच शैवलिनी कां येणार नाहीं असें त्याला वाटलें. कारकुनाला बरोबर घेऊन तो पुन्हां वेदग्रामांत आला आणि बंगलांत लपून राहिला. कारकुनानें शैवलिनीचा पत्ता लावला आणि तिचें घर पाहून घेतलें.

बंगाल्यांचीं मुलें 'बागुलबुवा' म्हटला कीं भितात, पण कांहीं कांहीं अशीं नाठाळ मुलें आहेत, कीं तीं बागुलबुवा पाहायचाच हट्ट धरून बसतात. शैवलिनीही त्याच वर्गांतली होती. पहिल्यापहिल्यानें ती फॉस्टरला पाहिल्यावर पळत असे, पण पुढें, लोक म्हणतात त्याप्रमाणें तो आपल्याला अजून खात नाहीं असें जेव्हां तिला दिसून आलें, तेव्हांपासून पळून जायचें तर राहोच पण ती त्याच्याशीं बातचीत करूं लागली.

कुठल्यातरी अशुभ क्षणाला शैवलिनीनें जन्म घेतला होता. अशुभ क्षणालाच चंद्रशेखरनें तिचें पाणिग्रहण केलें होतें. शैवलिनी कशी होती तें पुढें कळेलच, पण ती कशीही असली तरी फॉस्टरचे प्रयत्न मात्र फुकट जात होते.

कलकत्त्याहून फॉस्टरला एकाएकीं हुकूम आला—' पुरंदरपूरच्या वखारीवर दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक केली आहे—म्हणून तुम्ही तडक कलकत्त्याला निघून यावें. एका विशेष कामगिरीवर तुमची नेमणूक करण्यांत येणार आहे '—या हुकुमाबरोबरच नेमणूक झालेला अधिकारी येऊन हजर झाला आणि फॉस्टरला लगेच कलकत्त्याला जावें लागलें.

शैवलिनीच्या सौंदर्यानें फॉस्टर मोहित झाला होता. तिची आशा सोडून जाणें त्याला आतां भाग पडलें होतें. यावेळीं बंगाल्यांत येणारे इंग्रज दोन बाबतींत असमर्थ असत—एक, लोभ आवरणें—आणि दुसरें, पराभव कबूल करणें. हें काम आपल्याकरवीं होणें अशक्य आहे असें ते कधींच म्हणत नसत. कोणतेंही काम धर्मबाह्य आहे म्हणून तें करूं नये, हेंही ते केव्हांच कबूल करीत नसत. भारतवर्षांत पहिल्यानेंच राज्यसंस्थापन करायला आलेल्या व्यक्तीसारखे सामर्थ्यशाली आणि स्वेच्छाचारी लोक जगांत कुठेंच दिसून आले नसतील! याच कोटींतला होता लॉरेन्स फॉस्टर, तो म्हणाला, " Now or Never ! "

कलकत्त्याला निघून जायच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं मेणा, भोई आणि कांहीं बरकंदाज घेऊन तो स्वतः सशस्त्र होऊन वेदग्रामांत आला. त्या रात्रीं चन्द्रशेखरच्या घरावर दरवडा पडल्याची बातमी साऱ्या वेदग्रामांत पसरली. चन्द्रशेखर त्यावेळीं मुर्शिदाबादेहून परत आला नव्हता. त्याच्या घराच्या बाजूला मोठा आरडा ओरडा, बंदुकांचे आवाज आणि रडणें विव्हळणें ऐकून गांवचे कांहीं लोक बिछाना सोडून बाहेर आले. त्यांना दिसून आलें कीं चन्द्रशेखरच्या घरावर डाका पडला होता. जिकडे तिकडे मशाली तेवत होत्या. पुढें जायची कुणालाच छाती होईना. त्यानीं दुरून पाहिलें, तों एकेक डाकू लूटमार करून निघून जात होता.

भोयांच्या खांद्यावर दिलेला एक मेणा त्या घरांतून बाहेर आलेला पाहून सारे चकित झाले. मेण्याचीं दारें बंद केलेलीं होतीं आणि त्याच्याबरोबर पुरंदरपूरच्या वखारीवरचा साहेब चालत होता. तें पाहून सगळे जण घाबरून गेले आणि त्यांची पांगापांग झाली.

दरवडेखोर निघून गेले असें पाहून शेजारचे लोक चंद्रशेखरच्या घरांत गेले. फारशी लूट झाली नव्हती. घरांतलें बरेंचसें सामान शाबूत होतें. मात्र शैवलिनी

घरांत नव्हती. कुणी कुणी म्हटलें, कीं ती कुठेंतरी लपून बसली असेल, आतां इतक्यांत येईल—पण जाणते माणूस म्हणाले, "ती कसली येते आतां ? आणि आली तरीही चंद्रशेखर तिला घरांत घेणार नाहीं. तो मेणा पाहिलात ना ? त्यांतूनच गेली ती."

पुष्कळ वेळ सर्वांनीं वाट पाहिली, पण शैवलिनी फिरून आली नाहीं. घाटावर शैवलिनीबरोबर आलेली सुंदरी सर्वांच्या मागून निघून गेली. ती चंद्रशेखरच्या शेजारणीची मुलगी—त्याची दूरची बहीण अन् शैवलिनीची मैत्रिण होती. तिनें उजाडेपर्यंत वाट पाहिली, नंतर ती घरीं गेली आणि रडत बसली.

● ●

## : ४ :

मेण्याच्या बरोबर चालत फॉस्टर भागीरथीच्या तीरापर्यंत आला. तिथें होडी तयार होती. शैवलिनीला त्यानें होडींत घेतलें. होडींत हिंदू दासदासी आणि पहारेकरी आधींच आणून ठेवले होते.

फॉस्टरला कलकत्त्याला लवकर जायचें असल्यामुळें तो दुसऱ्याच होडींतून निघून गेला. जाण्यापूर्वी त्यानें शैवलिनीची सर्व प्रकारची सुव्यवस्था करून ठेवली होती. आपण बरोबर नसलों तर त्या होडीवरून शैवलिनीला कुणी सोडवून नेईल ही शंकासुद्धां त्याच्या मनाला आली नाहीं. कारण इंग्रजांची होडी आहे असें कळल्यावर कुणीही जवळ आलाच नसता. शैवलिनीची होडी मुंगेरला घेऊन जाण्याचा हुकूम देऊन तो निघून गेला.

पहाटेच्या वाऱ्याच्या जोरावर ती होडी उत्तरेच्या दिशेनें चालू झाली होती. दुर्जनावर विश्वास ठेवतां येईल पण पहाटेच्या वाऱ्यावर कुणी विश्वास ठेवूं नये अशी म्हण आहे, ती खरी ठरली. थोड्याच वेळांत वाऱ्यानें जोर केला. ती होडी फार मोठी असल्यामुळें उलट्या वाऱ्यावर चालवणें कठीण गेलें म्हणून नावाड्यानें ती भद्रहाटीच्या घांटावर लावली

थोड्या वेळानें एक न्हावीण नौकेपाशीं आली. ती सधवा होती. तिच्या हातीं आळत्याची संबळी होती. बंगाल्यांत सवाष्ण बायकांच्या पायांना आळता लावायचें काम न्हाव्याच्या बायका करीत असतात. होडीवरचे मोठमोठे दाढीवाले नोकर पाहून तिनें माथ्यावरचा पदर चांगला पुढें ओढला. दाढीवाले

तिच्याकडे नुसते पहात राहिले होते. होडीच्या एक कोंपऱ्याला एकजण ब्राह्मण शैवलिनीसाठीं सैंपाक करीत होता. फॉस्टर साहेबानें मुद्दामच ती व्यवस्था केली होती. हिंदूबाई कांहीं एकाच दिवसांत मडम बनत नाहीं, आज ना उद्यां हीच शैवालिनी यवन खानसाम्याच्या हातचा सैंपाक टेबलावर बसून काट्या चमच्यानें खाऊं लागेल याची त्याला खात्री होती. त्याला वाटलें, इतक्यांतच घाई कशाला ? घाई केल्यानें सारेंच कांहीं बिघडेल या भीतीनें त्यानें सैंपाकाला ब्राह्मण आणि तैनातीला हिंदू दासदासींची योजना केली होती.

ब्राह्मण सैंपाक करण्यांत गुंतला होता आणि शेजारीं एक दासी त्याला भाजी चिरून देत होती.

न्हावीण त्या दासीपाशीं आली आणि म्हणाली, " काय हो, कुठून आलांत हो तुम्ही ? "

साहेबाचा पगार खाणारी ती दासी चिडली आणि म्हणाली, " तुला काय करायचं ग सटवे ? आम्ही दिल्ली, मिल्ली मक्केहून आलों. "

न्हावीण ओशाळून म्हणाली, " तसं नव्हे हो. मी आहें न्हावीण. या होडीवर कुणी बायकामुली असल्या तर विचारतेंय मी. "

ती दासी आतां जरा नरम आली आणि म्हणाली, " बरं बरं, विचारून येतें हं ! " असें म्हणून ती शैवलिनीपाशीं गेली. दासीनें विचारल्यावरून शैवलिनी म्हणाली, " हो, येऊंदे तिला आळता लावायला. "

पहारेकऱ्यांची अनुमती घेऊन दासीनें न्हाविणीला होडींत आणून सोडलें आणि ती पुन्हा सैंपाकाच्या कामाला लागली.

शैवलिनीला पाहतांच न्हाविणीनें माथ्यावरचा पदर आणखी थोडा पुढें ओढला. ती मुकाट्यानें शैवलिनीच्या पायाला आळता लावूं लागली. शैवलिनी सारखी तिच्याकडे पहात राहिली होती. पहातां पहातां ती म्हणाली, " काय ग न्हाविणी, तुझं घर कुठं ? " तिनें कांहीं उत्तर दिलें नाहीं, तेव्हां शैवलिनीनें पुन्हा विचारलें, " तुझं नांव काय ग ? " तरीही उत्तर मिळालें नाहीं. तिनें पुन्हा विचारलें, " रडते आहेस का तूं ? " न्हाविण हळुच म्हणाली, " नाहीं."

" तूं रडते आहेस ! " असें म्हणून शैवलिनीनें तिचा बुरखा दूर केला. ती खरोखरच रडत होती, पण बुरखा दूर करतांच ती उगीच थोडीशी हंसली.

शैवलिनी म्हणाली, " तूं आल्याबरोबर मी तुला ओळखलं. माझ्यासमोर का बुरखा घेतेस मेले ? पण तूं इथं कुठून आलीस ? "

ती न्हावीण नव्हती—' सुंदरीवन्सं ' होती. सुंदरी डोळे पुसून म्हणाली, " आतां एकदम पळ इथून. माझी ही साडी नेस, ही आळत्याची संबळी घे आणि पदर चांगला पुढं ओढून घेऊन होडीबाहेर पळ. "

शैवलिनी विचुकपणें म्हणाली, " तूं इथं आलीस कशी ? "

सुंदरी म्हणाली, " कशी आलें आणि कुठून आलें तें सवड सांपडली तर मग सांगेन. तुझ्या तपासावर आलेंय इथं. मेणा गंगेच्या कांठीं नेला असं कुणीतरी सांगितलं तेव्हां पहाटे उठून कुणाला कांहीं न सांगतां पायी पायी गंगेवर आलें. तिथं कुणी सांगितलं, कीं होडी उत्तरेकडे गेली म्हणून. इतक्या-दूर चालत आल्यामुळं पाय सुजले होते म्हणून भाड्याची होडी करून तुझ्या होडीच्या पाठोपाठ आलें. तुझी होडी आहे मोठी—लवकर चालत नाहीं—माझी छोटीशी होडी असल्यामुळें मी लवकर येऊन तुला गांठलं. "

" पण तूं एकटीच कशी आलीस ? "

सुंदरीला वाटलें, कीं ' साहेबाच्या मेण्यांत बसून तूं कशी आलीस काळतोंडे ?' असें तिला विचारावें पण वेळप्रसंग पाहून तिनें जीभ आवरली.

ती म्हणाली, " मी कांहीं एकटी आलें नाहीं. माझा नवराही आलाय माझ्याबरोबर. होडी जरा दूर ठेवून न्हाविणीचं सोंग घेऊन मी आलें. "

शैवलिनी म्हणाली, " आतां पुढं काय ? "

सुंदरी म्हणाली, " आतां पुढं हेंच—ही माझी साडी नेस. आळत्याची संबळी घे. बुरखा ओढून होडींतून उतरून किनाऱ्यावर जा. कोण तुला ओळखा-यचं नाहीं. कांठाकांठानं गेलीस कीं होडींत असलेला माझा नवरा तुला भेटेल. नणंदेचा नवरा म्हणून लाजूं नकोस—जाऊन होडींत बैस, कीं लगेच ते होडी सोडून तुला घरीं घेऊन जातील. "

शैवलिनी कांहीं वेळ विचार करीत होती. नंतर ती म्हणाली, " पण इथं तुझं काय होईल ? "

" माझी काळजी करूं नकोस." सुंदरी म्हणाली, " सुंदरी बामणीला होडींत अडकवून ठेवील असा कुठलाच इंग्रज या बंगाल्यांत अजून आला नाहीं.

ब्राह्मणाची मुलगी—ब्राह्मणाची बायको—मन खंबीर असलं कीं कुणाचीच भीती बाळगायला नको. आतां तूं जा. काय वाटेल तें करून मी रात्रीपर्यंत घरीं येतें. देवाला माझी काळजी आहे. आतां उशीर लावूं नकोस. माझा नवरा तिथं उपाशीं आहे. आजच्या दिवसांत त्याला जेवायला मिळेल कीं नाहीं याचीच शंका आहे. ”

शैवलिनी म्हणाली, “ ठीक ! समज, मी गेलें—गेलें तर मला घरांत घेतील का ? ”

“ अगऽबाई ! कां घेणार नाहींत ? असं काय झालंय घरांत न घ्यायला ? ”

“ हें पहा—इंग्रजानं मला पळवून नेलं. आतां बाटलें आहें नाहीं का मी ? ”

सुंदरी अचंबित होऊन शैवलिनीच्या तोंडाकडे पहातच राहिली. ती तिच्याकडे मर्मभेदी नजरेनें पाहूं लागली तेव्हां शैवलिनीनें मान खालीं घातली. सुंदरीनें जराशा करड्या बोलीनें विचारलें, “ खरं सांगशील ? या गंगेच्या पाण्यांत बसून खरं सांगशील ? ”

“ सांगेन, ” शैवलिनी म्हणाली, “ तुला विचारायलाच नको. मीच सांगतें. या क्षणापर्यंत साहेबाची माझी दृष्टभेटसुद्धां झालेली नाहीं. मला घरीं घेतलं तर माझ्या नवऱ्याची जात बुडायचा प्रश्नच यायला नको. ”

सुंदरी म्हणाली, “ तर मग मी सांगतें, तुझा नवरा तुला केव्हांही घरांत घेईल. मुळीच शंका बाळगूं नकोस. तो धर्मात्मा आहे. त्याच्याकरवीं अधर्म घडायचा नाहीं. आतां बोलत बसण्यांत वेळ घालवायचा नाहीं. ”

शैवलिनी क्षणभर उगीच बसली होती. तिनें थोडेंसें रडून घेतलें. नंतर डोळे पुसून ती म्हणाली, “ मी जातें—माझा नवरा माझा स्वीकार करील, पण माझ्यावरचा हा कलंक धुवून जाईल का कधीं ? ” सुंदरी कांहीं उत्तर देत नाहीं असें पाहून शैवलिनी म्हणाली, “—गांवच्या पोरीबाळी माझ्याकडे बोट दाखवून म्हणतील, कीं हिला इंग्रजानं पळवून नेली होती. देवदयेनं मला कधीं मूल झालं, तर त्याच्या बारशासाठीं कुणी येईल का माझ्या घरीं ? जर मुलगी झाली तर कुणा ब्राह्मणाचा मुलगा लग्न करील का तिच्याबरोबर ? मी माझा धर्म राखून राहिलें आहें, पण आतां परत गेलें तर कुणी विश्वास ठेवील का माझ्या बोलण्यावर ? घरीं जाऊन कसं कुणाला हें तोंड दाखवूं ? ”

सुंदरी म्हणाली, " नशिबीं होतं तसं घडून आलं. तें कांहीं आतां बदलतां येत नाहीं. क्लेश भोगावे लागतील खरे, तरीपण आपल्या घरीं तर राहाशील ?"

" कसल्या आधारावर ? " ती म्हणाली, " कोणत्या सुखाच्या आशेनं ? इतके कष्ट सहन करण्यासाठीं का पुन्हां घरीं जाऊं ? नाहीं बाप, नाहीं आई, नाहीं कुणी नात्यागोत्याचं—"

" आणि नवरा ? त्याच्याचसाठीं ना हें बायकांचं जिणं ? "

" तुला सारं कांहीं माहीत आहे—"

" सारं कांहीं माहीत आहे ! " सुंदरी म्हणाली, " या जगांत तुझ्यासारखी कुणी पापी नाहीं. असला नवरा मिळणं म्हणजे महद्भाग्य, पण तुला त्याचा ओढा वाटत नाहीं. मुलं बाहुली घेऊन खेळवतात तसा तो तुला घेऊन खेळत बसत नाहीं ! ब्रह्मदेवानं त्याला घडवला आहे तसाच—माणूस आहे तो ! तो धर्मात्मा आहे, पंडित आहे, पण तूं आहेस पापी—तुला तो कसा आवडेल ? आंधळ्यापेक्षां आंधळी आहेस तूं. तुझ्या नवऱ्याचं तुझ्यावर किती प्रेम आहे तें तुला अजून कळलं नाहीं. कित्येक जन्मींच्या पुण्याईनं असल्या नवऱ्याचं प्रेम तुला लाभलंय !—जाऊंदे तें—यावेळीं नकोत त्या गोष्टी. नसेल त्याचं तुझ्यावर प्रेम, पण त्याची सेवा करण्यांत आयुष्य वेंचलंस तर तुझ्या जन्माचं सार्थक होईल ! आतां उशीर कशाला लावते आहेस ? कां राग येऊं लागलाय माझा ?"

शैवलिनी म्हणाली, " असं पहा, घरीं असतांना माझ्या मनांत येई, कीं आईबापांच्या कुळांतलं कुणी गवसलं तर त्यांच्या घरीं जाऊन राहीन— नाहीं तर काशींत जाऊन भिक्षा मागेन—नाहींतर नदींत जीव देईन ! सध्या मुंगेरला जातें आहें. एकदा मुंगेर कसं आहे तें पहातें. राजधानींत भिक्षा मिळते कीं नाही तें पहातें. मरायचंच असलं तर मरणं कांहीं कठीण नाहीं. आतां मरणाखेरीज मला दुसरा उपाय नाहीं. पण मी प्रतिज्ञा केली आहे, कीं जगलें किंवा मेलें तरी आतां यापुढं घरीं जायचं नाहीं ! माझ्यासाठीं उगीच तूं इतके कष्ट सोसलेस ! आतां आलीस तशी परत जा. मी यायची नाहीं. मी मेलें म्हणून समज—मरणारच आहें मी ! आतां जा तूं. "

रडूं येत असलेलें आवरून सुंदरी उठून उभी राहिली आणि म्हणाली, " आतां मर एकदांची ! देवाजवळ मी हात जोडून मागतें, की जीव देण्या-

इतकं साहस तुला लाभो. मुंगेरला पोंहचायच्या पूर्वीच—वारा वावटळीनं म्हण, तुफानांत होडी बुडून म्हण, मुंगेरला जायच्या पूर्वीच तुला मरण येवो." असें म्हणून सुंदरी तिथून चालती झाली. कांठावर येतांच तिनें आळस्याची संबळी पाण्यांत फेकून दिली आणि ती वाट पहात असलेल्या आपल्या नवऱ्याकडे निघून गेली.

• •

## : ५ :

♣ चंद्रशेखरनें कुंडली मांडून पाहिलें. तो अधिकाऱ्याला म्हणाला, "महाशय, नवाबाला सांगा मला गणना करतां आली नाहीं."

"असं कां म्हणतां महाशय?" अधिकाऱ्यानें विचारलें.

चंद्रशेखर म्हणाला, "साऱ्याच गोष्टींचीं भविष्यं वर्तवतां येत नाहींत. तसं झालं असतं तर माणूस सर्वज्ञ ठरला असता. असलं भविष्य मला बघतां येत नाहीं."

अधिकारी म्हणाला, "अप्रिय गोष्ट राजाला सांगायला शहाण्या माणसाला कठीण जातं. तें कसं का असेना, आपण जसं सांगितलं तसं मी राजाला कळवीन"

चंद्रशेखरनें त्याचा निरोप घेतला. त्याला प्रवासखर्च द्यायचें अधिकाऱ्याच्या जिवावर आलें. चंद्रशेखर ब्राह्मण होता, पंडित होता पण तो भिक्षुक नव्हता. तो कोणाचें दान घेत नसे.

चंद्रशेखर गांवीं आला त्यावेळीं समोर त्याला त्याचें घर दिसलें. पहातांच त्याला मोठा आनंद झाला. तो तत्वज्ञ होता, तसाच तत्त्वजिज्ञासू होता. त्याला वाटलें, कां आपल्याला हा आनंद झाला? प्रवासांत असतांना देखील आहार-निद्रेची आपली गैरसोय झाली होती का? मग घरीं गेल्यावरच असें विशेष काय होणार होतें? घरांत माझी आवडती बायको आहे, तिच्या भेटीच्या अपेक्षेचा का हा आनंद? विश्वब्रह्माण्ड सारें ब्रह्ममय आहे, मग एकाबद्दलच प्रेम कां वाटतें? आणि दुसऱ्याबद्दल अश्रद्धा कां वाटते? त्या आपल्या पत्नीचें आनंदी मुखमंडल पहाण्यासाठीं मन असें कां उतावीळ होतें? कुठल्या दारुण

मोहजालांत आपण सांपडलों आहोंत ? हें मोहजाल तोडावेंसें वाटत नाहीं—असें कां होतें ?

एकाएकीं चन्द्रशेखरच्या मनांत भीतीचा संचार झाला—घरीं गेलों आणि शैवलिनीची भेट झाली नाहीं तर ?—कां असें वाटावें ? ती आजारी तर नसेल ?—त्याचे पाय भराभर चालूं लागले—देवानें हें रत्न या वयांत माझ्या पदरांत बांधलें आहे तें हरपणार नाहीं ना ? कां असें मनांत येतें ?

तो गांवांत आला त्यावेळीं लोक त्याच्याकडे चमत्कारिक मुद्रेनें पहात होते. गांवचीं पोरें त्याच्याकडे पाहून गालांतल्या गालांत हंसत होतीं. कुणी कुणी त्याच्या मागोमाग बरेंचसें अंतर ठेवून पाठोपाठ येत होते. गांवचे म्हातारे त्याला पहातांच थबकून मागें वळून उभे रहात होते. चन्द्रशेखरला आश्चर्य वाटलें. तो घाबरला—बावरला—इकडे तिकडे न पहातां घराच्या दाराशीं आला.

दार बंद होतें. दारावर थाप मारतांच नोकरानें ओटीचें दार उघडलें. चन्द्रशेखरला पहातांच तो एकदम रडूं लागला. 'काय झालं ?' म्हणून त्यानें विचारलें तेव्हां उत्तर न देतां तो रडत रडत निघून गेला.

चन्द्रशेखरनें मनांतल्या मनांत इष्टदेवतेचें स्मरण केलें.

घरांतला केर निघाला नव्हता. चण्डीमंडपांत धूळ सांचली होती. ठिकठिकाणीं विझलेल्या मशाली पडल्या होत्या. दारें फोडलीं होतीं.

तो घरांत गेला—सारीं दारें बाहेरून बंद होतीं. दासी त्याला पहातांच बाजूला सरल्या आणि बाहेर जाऊन रडूं लागल्या. चंद्रशेखरनें कांपत कांपत हांक मारली, "शैवलिनी !" कुणी उत्तर दिलें नाहीं.

त्यानें पुन्हा हांक मारली. त्याच्या हांकेचा पडसाद ऐकूं आला पण उत्तर आलें नाहीं.

त्यावेळीं शैवलिनी इंग्रजांच्या होडीवर लाल निशाणाखालीं बसली होती. वारा जुळझुळ वाहात होता. नावाडी वल्हवतांना गात होते.

× × ×

चन्द्रशेखरनें सारें कांहीं ऐकून घेतलें.

देव्हाऱ्यांतला शाळिग्राम नेऊन त्यानें सुंदरीच्या बापाच्या घरीं ठेवला. घरांत असलें नसलेलें सामान त्यानें गरीबगुरीब शेजाऱ्यांना देऊन टाकलें. संध्या-

काळपर्यंत हें सर्व काम उरकल्यावर काळजाच्या रक्ताच्या मोलानें त्यानें मिळवलेले सारे ग्रंथ आणून आंगणांत त्याची रास केली आणि त्यांना आग लावून दिली. पुराण, इतिहास, काव्य, अलंकार, न्यायवेदांत, वेदउपनिषदांवरचे सारे ग्रंथ जळून खाक झाले.

हें अग्निकांड पुरें करून अंगावर नुसतें एकच उत्तरीय घेऊन त्यानें आपल्या वास्तूला रात्रीच्या एक प्रहरानंतर रामराम ठोकला.

तो कुठें गेला तें कुणाला कळलें नाहीं—आणि विचारलेंही नाहीं कुणी.

★

# द्वितिय खंड

## : १ :

♣ "नाहीं—या चिमण्या नाहीं नाचायच्या. आतां तुझी गोष्ट सांग." असें दलनी बेगमनें म्हटलें तरी मोर नाचेना म्हणून तिनं त्याचा पिसारा धरून ओढला. आपल्या हातांतली एक जडावाची बांगडी काढून घेऊन तिनें ती एका मोराच्या गळयांत चढवली. एका बोलक्या काकाकुवाच्या तोंडावर तिनें गुलाबपाण्याची पिचकारी मारली, तेव्हां त्यानें 'बांदी' म्हणून तिला शिवी दिली. तिनेंच ती त्याला शिकवली होती.

शेजारीं एक दासी उभी होती. तिला दलनी म्हणाली, "आतां तुझी गोष्ट सांग."

कुलसुम म्हणाली, "गोष्ट कसली ? हत्यारं भरून आलेल्या दोन होड्या घाटावर लागल्या आहेत. त्यांच्यावर एक इंग्रज अधिकारी आहे. त्या दोन्हीं होड्या अडकवून ठेवल्या आहेत. त्या अडकवून ठेवल्यामुळं इंग्रजांबरोबर वाद माजेल म्हणून इब्राहिमखाँ म्हणाला, कीं त्या सोडून दे. गुरगनखाँ म्हणाला, कीं लढाई झाली तरी पत्करेल पण होड्या सोडणार नाहीं."

दलनीनें विचारलें, "कुठं नेत होते हीं हत्यारं ?"

"अझिमाबाद ( पाटणा ) च्या वखारींत. लढाई व्हायची तर तिथंच !"

"इथून इंग्रज एकदम बेदखल होऊं नयेत म्हणून हत्यारं तिकडे पाठवलीं जात आहेत अशी सर्वत्र भुमका उठली आहे."

"मग गुरगनखाँनं कां अटक केली त्यांना ?" दलिनीनें विचारलें.

"तो म्हणे, कीं एवढीं हत्यारं तिथं गोळा झालीं तर लढाई करणं कठीण जाईल," कुलसुम म्हणाली, "शत्रूला मजबूत होऊं देणं बरं नव्हे."

" अलिइब्राहिमखाँ म्हणतो, कीं कांहींही झालं तरी इंग्रजांबरोबरच्या लढाईत जय मिळायचा नाहीं." दलनी म्हणाली, " लढाई करायची नाहीं असं एकदां ठरवल्यावर होड्या कां अडकवल्या ? नबाब सिराजउद्दौलाचं जसं झालं तसंच पुन्हा व्हायचं. "

दलिनी बराचवेळ विचार करीत बसली होती, नंतर ती म्हणाली, " एक धाडस करशील का कुलसुम ? "

" कोणतं धाडस ? " कुलसुम म्हणाली, " इलिसमासे खाऊन दाखवूं, कीं थंड पाण्यानं आंघोळ करूं ? "

" सध्या थट्टा राहूं दे, " दलनी म्हणाली, " याचा सुगावा लागला तर नबाब तुला अन् मला दोघांनाही हत्तीच्या पायाखालीं देईल. "

" सुगावा लागला तर ना ?" कुलसुम म्हणाली, " आजवर एवढं अत्तर गुलाब सोनंचांदी चोरली पण कुणाला सुगावा लागला नाहीं. पुरुषांना डोळे असतात ते नुसते डोक्याच्या शोभेसाठीं—त्यांना दिसत नाहीं कांहींच—बायकांचं कवटाळ पुरुषांना कधीं उमगलेलं मी तरी पाहिलं नाहीं. "

" मी खोजा खाँसाहेबांची गोष्ट बोलत नाहीं. " दलनी म्हणाली, " नबाब-अलीजा इतर पुरुषांसारखा नाहीं. त्याच्यापासून लपवणं मोठं कठीण. "

" मला जमेल का तें ? " कुलसुम म्हणाली, " काय करायला हवं ? "

" एकदां गुरगनखाँला एक पत्र पाठवायला हवं. " दलनी म्हणाली,

" कुलसम थक्क होऊन उभी राहिली आहे असं पाहून दलनीनें विचारलं, " काय म्हणतेस ? "

" पत्र कोण लिहिणार ? "

" मी ! " दलनी म्हणाली.

" म्हणतेस काय ? वेड लागलंय का तुला ? "

" जवळ जवळ तसंच. "

नंतर कुलसुम म्हणाली, " तसं हें काम सोपं आहे. कुणा खोजाची मूठ दाबली कीं तो पत्र देऊन येईल, पण अडचण आहे ती अशी, कीं नबाबाला पत्ता लागला तर दोघांच्याही जिवावर बेतेल. कसं का असेना, तुझं कर्म तूं निस्तार. मी आहें दासी ! पत्र लिहून दे अन कांहीं नगद दे. "

थोड्या वेळानें कुलसुम पत्र घेऊन गेली.

या पत्राच्या पायींच दलनी आणि शैवलिनी या दोघींच्या नशिबाची गांठ एकत्र बांधली गेली.

● ●

: २ :

♣ **दलनीनें** तें पत्र गुरगनखाँला पाठवलें होतें. बंगालच्या त्यावेळच्या राजपुरुषांत गुरगनखाँ हा सर्वश्रेष्ठ आणि सर्वोत्कृष्ठ होता. तो जातीनें आरमानी होता. इस्पाहानला त्याचें जन्मस्थान. पूर्वी तो कपडेविक्या होता असें कुणी म्हणत. बंगालच्या राजकारणांत शिरल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो मुख्य सेनापती झाला आणि त्यानें नवी गोलंदाज सेना अस्तित्वांत आणली. त्यानें इंग्रजांप्रमाणेंच ती सेना शिकवून सजवून तयार केली आणि तोफा बंदुकांचे नवे कारखाने काढून त्यांत इंग्रजांपेक्षांही जास्त मजबूत हत्यारें तयार करवून घेतलीं.

आतां हें सैन्य इंग्रजांच्या तोडीस तोड देईल असें झालें होतें. गुरगनखाँच्या कर्तबगारीच्या जोरावर इंग्रजांचा आपण पाडाव करूं असें मीरकासीमला वाटत होतें. गुरगनखाँचा सल्ला घेतल्याशिवाय तो कोणात्याही कामाला हात घालीत नसे. मीरकासीमसमोर गुरगनखाँच्या विरुद्ध बोलायची कुणाची छाती नव्हती. अशा प्रकारें आरयानी गुरगनखाँ एक छोटा नबाब होऊन बसला होता आणि त्यामुळें मुसलमान अधिकारी नाराज होऊन गेले होते.

दोनप्रहर रात्र उलटून गेली तरी गुरगनखाँ झोंपी गेला नव्हता. तो एकटाच दिव्यापाशीं पत्रें वाचीत बसला होता. तीं पत्रें कलकत्त्याच्या एका आरमानी व्यक्तीकडून आलीं होतीं. पत्र वाचून होतांच गुरगनखाँनें चोपदाराला बोलावून म्हटलें, " सारीं दारं खुलीं आहेत ना ? कुणी मला भेटायला आला तर त्याला अडथळा करूं नका कीं त्याची विचारपूस करूं नका—सर्वांना सांगितलंय ना असं ? " चोपदारानें होकार दिला तेव्हां खान म्हणाला, " तूं कुठंतरी जवळपासच रहा. "

तीं पत्रें योग्यजागीं ठेवून देऊन गुरगनखाँ आपल्याशींच म्हणाला, " आतां कोणता मार्ग पत्करावा ? हा भारत देश म्हणजे एक समुद्र आहे. जितक्या

बुडया माराव्या, तितकीं रत्नं मिळवावीं. कांठावर बसून लाटा मोजण्यांत काय फायदा ? गजानं कापड मोजण्यांत माझं आयुष्य गेलं, पण आतां सारा भारत माझं नांव ऐकून कांपतोय. बंगालचा मी मालक झालों आहें. खरोखरच का मी बंगालचा मालक झालोंय ? खरे मालक आहेत इंग्रज—त्यांचा गुलाम मीरकासीम—मी आहे मीरकासीमचा गुलाम – म्हणजे मालकाच्या गुलामाचा गुलाम ! ही भारीच मानाची जागा नाहीं का ! मग मीच मालक कां होऊं नये ? माझ्या तोफेच्या समोर कोण टिकेल ? इंग्रज ? एकदां पाहिलं पाहिजे. इंग्रजांना या देशांतून हुसकावून काढल्याशिवाय मी मालक होणार कसा ? मीरकासीम माझ्या हिशेबांत नाहीं– कुठल्याही क्षणाला मी त्याला ठुकरावून उडवून देईन. मीरकासीम मसनदीवर आहे तोंपर्यंत त्याच्या नांवाच्या जोरावर इंग्रजांचं नांव नेस्तनाबूद करीन अन् मग मीरकासीमलाही निरोप देईन—हाच खरा मार्ग ! पण आज अचानक हें पत्र कां आलं ? असलं धाडस करायलाही कां तयार झाली ही—" जिचा विचार तो करीत होता तीच येऊन समोर उभी राहिली. त्यानें दलनी बेगमला शेजारच्या आसनावर बसवून घेतलें. तो म्हणाला, "आज फार दिवसांनीं तुला पाहून मला मोठं समाधान वाटलं. तूं नबाबाच्या अंतःपुरांत शिरल्यापासून मला दिसली नव्हतीस—पण हें धाडस तूं कां करते आहेस ?"

"हें धाडस कसं ?" दलनी म्हणाली.

गुरगनखाँ म्हणाला, "रात्रीच्या वेळीं एकटीच गुपचुप मला भेटायला आलीस हें नबाबाला कळलं तर तो आम्हा दोघांचाही जीव घेईल."

दलनी म्हणाली, "त्यांना हें कळलंच तर तुमचं माझं नातं काय आहे तें मी त्यांना सांगून टाकीन. मग राग यायचं कारणच उरणार नाहीं."

गुरगनखाँ म्हणाला, "एवढीशी पोर तूं, पण तुला ही खात्री वाटते ? अजून-पर्यंत आपण हें आपलं नातं गुप्त ठेवलं होतं. तुझामाझा परिचय आहे हें देखील अजून कुणाला कळलेलं नाहीं —असं असतांना पेंचांत आल्यामुळं हें नातं आपण उघड केलं तर कोण विश्वास ठेवील त्याच्यावर ? तूं आलीस हें बरं केलं नाहींस !"

"पण नबाबाला हें कळणार कसं ?" दलनी म्हणाली, "सारे पहारेवाले आहेत तुमच्या हुकमतींत—मी आलें आहें तें एकच विचारायला,—इंग्रजां-

बरोबर लढाई जुंपणार हें खरं का ? किल्ल्यांत सारीं माणसं म्हणताहेत, कीं तुम्हींच ही लढाई उठवली आहे—कां ? ”

“ पोर आहेस तूं ! ” खान म्हणाला, “ तुला कसं कळेल हें ? ”

दलनी म्हणाली, “ पोरीसारखी का बोलतेंय मी ? तुम्ही ज्याअर्थी एक मदतनीस म्हणून मला नबाबाच्या जनानखान्यांत ठेवून दिलंय, तिथं पोर म्हणून मला धुडकावून लावण्यांत काय अर्थ ? ”

“ बरं बरं ! ” खान म्हणाला, “ इंग्रजांबरोबर लढाई जुंपली तर तुझं माझं काय बिघडणार ? होईना का लढाई ? ”

“ या लढाईत जय मिळेल का आपल्याला ? ”

“ जय मिळायचा पुष्कळच संभव आहे. ”

“ आजवर इंग्रजांना कुणी जिंकलं आहे का ? ”

“ आजवर इंग्रजांनीं कितीशा गुरगनखाँबरोबर लढाई केली आहे ! ”

“ सिराजउद्दौला असंच म्हणत होता ! ” दलिनी म्हणाली, “ जाऊं दे. बायकांच्या जातीचं मन माझं, मला वाटतं, इंग्रजांवर जय मिळवतां यायचा नाहीं. उलट आमचाच पराजय होईल. म्हणून या लढाईच्या भानगडींत पडूं नका अशी विनंती करायला मी आलें आहें. ”

“ या बाबतींत मला बायकांचा सल्ला नको आहे. ” खान म्हणाला.

“ माझं एवढं सांगणं तुम्ही ऐकलंच पाहिजे.” दलिनी म्हणाली, “ आमची राखण करा. मला अंधार दिसतो आहे चोंहींकडे—” असं म्हणून दलनी रडूं लागली.

चकित होऊन खानानें विचारलं, “ तूं कां रडते आहेस ? मीरकासीमला पदच्युत केला, तर मी तुला घेऊन आपल्या मुलखांत जाईन. ”

दलनीचे डोळे रागानें तांबडे लाल झाले. ती म्हणाली, “ मीरकासीम माझा धनी आहे हें विसरलांत का तुम्ही ? ”

“ नाहीं—विसरलों नाहीं ! ” खान थोडासा ओशाळून म्हणाला, “ पण नवरा काय चिरंजीव असतो कुणाचा ? एक नवरा मेला तर दुसरा नाहीं का करतां येत ? माझी खात्री आहे, कीं एक दिवस तूं या भारताची दुसरी नूरजहान होणार आहेस. ”

दलनी रागानें थरथरत उठून उभी राहिली. तिच्या डोळ्यांतून ठिणग्या उडत होत्या. ती थरथर कांपत म्हणाली, "सत्यानाश होओ तुझा ! कोणत्या कुक्षणाला तुझी बहीण म्हणून जन्माला आलें मी ! कोणत्या कुक्षणाला तुला मदत करायची शपथ घेतली मी ! बायकांच्या जातीला अजून तूं ओळखलं नाहींस ! मी तुला सांगतें, ही लढाई होतां कामा नये—नाहींतर आजपासून तुझा माझा कांहीं संबंध नाहीं—आजपासून मी तुझी दुश्मन आणि तूंही माझा दुश्मन !" असें म्हणून दलनी तणतणत बाहेर निघून गेली.

गुरगनखाँला वाटलें, दलनी आपल्या हातून निसटली. भाऊ म्हणून कदाचित ती आपला लोभ धरील, पण मीर कासीमसाठीं जीव टाकील—नवऱ्याच्या कल्याणासाठीं भावाचा बळी देईल—अर्थात तिला आतां किल्ल्यांत जाऊं देतां नये, असा विचार करून त्यानें चोपदाराला बोलावलें आणि दलनीला किल्ल्यांत प्रवेश करायला बंदी करावी असा त्यानें हुकूम दिला. तो हुकूम घेऊन शिपाई घोड्यावर स्वार होऊन गेला.

किल्ल्याच्या दारांत दलनीला मज्जाव करण्यांत आला. ती हताश होऊन मटकन् खालीं बसली. ती कुलसुमला म्हणाली, "आतां मला कुठं थारा राहिला नाहीं !"

कुलसुम म्हणाली, "चल, पुन्हा सेनापतींच्या घरीं जाऊंया."

"तूं जा हवी तर," दलिनी म्हणाली, "आतां मला जागा गंगेच्या पोटांत !"

त्या काळोख्या रात्रीं दलनी राजरस्त्यावर उभी राहून रडत होती. वर नक्षत्रें चमचमत होतीं. झाडावरून रातफुलांचा नाजुक नाजुक सुगंध दरवळत होता. रात्रीच्या वेळच्या वाऱ्याच्या झुलुकीमुळें झाडांचीं पानें सळसळत होतीं.

दलनी रडत रडत म्हणाली, "कुलसुम !"

• •

## : ३ :

♣ **नुसती** एक दासी बरोबर घेऊन रात्रीच्यावेळीं नबाबाची बेगम राजरस्त्यावर उभी राहून रडत होती. कुलसुमनें विचारलें, "आतां काय करायचं ?"

डोळे पुसून दलनी म्हणाली, " आतां उजाडेपर्यंत इथं झाडाखालीं बसूं."

" उजाडल्यावर आम्हाला कुणी पकडतील ना ? " कुलसुम म्हणाली.

" भ्यायचं कशाला ? " दलनी म्हणाली, " आम्ही काय गुन्हा केला आहे कुणाचा ? "

" पण इथं थांबून पुढं होणार काय ? "

" कुणीतरी आम्हाला पकडावं म्हणूनच इथं थांबायचं." दलनी म्हणाली, " पकडल्यावर नेणार कुठं ? मालकांच्या समोरच ना ? तेंच तर हवं आहे मला. चल आपण किल्ल्याच्या दारावर बसून राहूं, मग कुणीतरी लवकर पकडतील आपल्याला."

इतक्यांत एक लंबाचौडा पुरुष गंगातीराकडे जात असतांना त्यांना त्याची छाया दिसली. त्या भिऊन आडोशाला उभ्या राहिल्या. तो पुन्हा वळून त्यांच्याकडेच आला आणि म्हणाला, " कोण तुम्ही ? माझ्यासारख्याच रात्रभर जागत फिरणाऱ्या कोण तुम्ही हतभागी ? "

त्याला पाहून पहिल्यानें त्या घाबरल्या होत्या, पण त्याचा ममताळू आवाज ऐकून त्यांची भीती दूर झाली. कुलसुम म्हणाली, " आम्ही बायका आहों. "

" रात्रीच्या वेळीं काय करतां आहां इथं ? " त्यानें विचारलें.

" दुर्दैवी माणसं आहों आम्ही." दलनी म्हणाली, " आमची कथा ऐकून काय करायचं आहे आपल्याला ? "

तो म्हणाला, " प्रसंगीं सामान्य माणूससुद्धां उपयोगी पडतं. मी एक दरिद्री ब्राह्मण आहें. ब्रह्मचारी आहें. शक्यतर मी तुम्हांला मदत करीन. "

" बुडत्याला काडीचा आधार ! " दलनी म्हणाली, " आपल्या बोलण्यानं आम्हाला धीर आला आहे; पण इथं नको—कुठं तरी दूर जाऊन आपण बोलूं."

" तर मग या माझ्याबरोबर." असें म्हणून तो त्या दोघींना बरोबर घेऊन एका लहानशा घरापाशीं आला. नोकरानें दार उघडलें तेव्हां ब्रह्मचाऱ्यानें त्याला सांगितलें, " आंत दिवा लाव आणि तूं जाऊन झोंप घे रामचरण."

रामचरणनें एकदा त्या दोघींकडे नजर फेंकली. एवढ्या रात्रीं या दोन बायकांना घेऊन गुरूजी कां आले ? ते जितेंद्रिय होते हें त्याला माहित होतें,

पण त्यांच्या येण्याचा उद्देश कळण्यासाठीं त्याचा जीव खालींवर होत असल्या-मुळें त्याला त्या रात्रीं झोंप लागली नाहीं.

ब्रह्मचारी त्या दोघींना घेऊन आंत आले त्यावेळीं दलनीनें त्या दिवशीं झालेली सारी हकिकत त्यांना यथातथ्य सांगितली. ती ऐकून ते म्हणाले, " मला वाटतं तुम्ही यावेळीं अचानक जाऊन नबाबाला भेटूं नये. आधीं झालेली सारी हकिकत त्यांना पत्रानं कळवावी. खरोखरच त्याच्या मनांत तुमच्याबद्दल सहानुभूती असेल तर तुमच्या सांगण्यावर विश्वास ठेवून तो तुम्हाला बोलावणं पाठवील."

" पण हें पत्र घेऊन जाणार कोण ? " दलनीनें विचारलें.

" ती व्यवस्था मी करतों. " असें म्हणून ब्रह्मचाऱ्यानें तिला कागद लेखणी आणून दिली. ती पत्र लिहीत असतांना ब्रह्मचारी म्हणाला, " हें घर माझं नव्हे, तरीपण राजाचं बोलावणं येईपर्यंत तुम्ही इथंच रहा. कुणाला कांहीं कळणार नाहीं कीं कोण तुमची विचारपूसही करणार नाहीं. "

त्या दोघींनीही संमती दिली.

पत्र लिहून झाल्यावर ब्रह्मचाऱ्यानें रामचरणला बोलावून घेतलें. त्या दोघींची नीट व्यवस्था ठेवायला सांगून ब्रह्मचारी पत्र घेऊन निघून गेला.

मुंगेरच्या साऱ्या हिंदू अधिकाऱ्यांशीं ब्रह्मचाऱ्याचा फार निकटचा परिचय होता. मुसलमानही त्याला ओळखीत. सारेच अधिकारी त्यांना मान देत असत.

मुन्शी रामगोविंद राय यांची ब्रह्मचाऱ्यावर फार भक्ति होती. सूर्योदय होतांच ब्रह्मचाऱ्यानें मुंगेरच्या किल्ल्यांत प्रवेश केला आणि रामगोविंदची भेट घेऊन दलनीचें पत्र त्यानें त्यांच्या हातीं दिलें. तो म्हणाला, " माझं नांव सांगूं नका. एका ब्राह्मणानं पत्र दिलं असं सांगा. "

मुन्शी म्हणाले, " उत्तरासाठीं आपण उद्यां या. " तें पत्र कुणाचें म्हणून त्यानें विचारलें नाहीं.

ब्रह्मचारी पुन्हा त्या घरीं आला आणि दलनीला म्हणाला, " उद्यां उत्तर मिळेल. आजचा दिवस कसा तरी काढा म्हणजे झालं. "

या घराच्या दुसऱ्या विभागांत एक व्यक्ति झोंपी गेलीं होती, तें त्या दोघींनाही माहित नव्हतें.

: ४ :

♣ सुंदरी रागारागानें शैवलिनीच्या होडींतून निघून आली होती. जात असतांना ती शैवलिनीला सारखी शिव्या देत होती. ती घरीं आली आणि रडूं लागली. त्यानंतरच चंद्रशेखर आपल्या घरीं येऊन घरदार टाकून निघून गेला होता.

असेच कांहीं दिवस गेले. शैवलिनी किंवा चन्द्रशेखर या दोघांपैकीं एकाचीही कांहीं खबर कळली नव्हती. सुंदरी ही चंद्रशेखरच्या शेजाऱ्याची मुलगी होती. नात्यानें ती त्याची दूरची बहीण लागत होती. तिचा बाप चांगला संपन्न होता. ती बहुधा माहेरींच राहात असे. तिचा नवरा श्रीनाथ वस्तुतः घरजांवई नसला तरी मधून मधून येऊन सासुरवाडीला राहात असे. घरचा सर्व कारभार सुंदरीलाच पहावा लागत असे, कारण तिची आई बरेच दिवस बिछाना धरून पडली होती. सुंदरीला आणखी एक धाकटी बहीण होती. तिचें नांव रूपसी. ती मात्र आपल्या सासरींच राहात असे.

त्या दिवशीं सुंदरी नीटनेटका पोषाख करून आणि दागिने आंगावर घालून बापापाशीं आली आणि म्हणाली, " मी रूपसीला भेटायला जातें. काल मला तिच्याबद्दल फार वाईट स्वप्न पडलं. "

सुंदरीचा बाप कृष्णकमल चक्रवर्ती—सुंदरी त्याची लाडकी मुलगी—नाहीं होय करतां करतां शेवटीं त्यानें तिला जायची परवानगी दिली. सुंदरी रूपसीच्या सासरीं गेली—श्रीनाथ आपल्या घरीं गेला.

रूपसीचा नवरा कोण? तोच प्रताप! शैवलिनीशीं लग्न झाल्यानंतर चंद्रशेखर आपल्या शेजाऱ्याचा मुलगा प्रताप याला वारंवार भेटत असे. प्रतापच्या एकंदर वागणुकीमुळें चंद्रशेखर त्याच्यावर फार खूष असे. त्यानेंच रूपसीशीं त्याचें लग्न घडवून आणलें एवढेंच नव्हे, तर त्यानें प्रतापला नबाबाच्या दरबारीं नोकरी मिळवून दिली. चंद्रशेखरला कासीम अलीखाँ आपला गुरू म्हणून मानीत असे, त्यामुळेंच ही व्यवस्था त्याला करतां आली होती.

स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर प्रतापची चांगलीच प्रगती होत होती.

प्रताप आतां जमींदार झाला होता. भल्यामोठ्या वाड्यांत रहात होता. चोहींकडे त्याचा नांवलौकिक झाला होता.

सुंदरी रूपसीच्या घरीं आली त्यावेळीं प्रतापनें तिला वेदग्रामची खबर विचारली. सुंदरी म्हणाली, "तेंच सांगायला मी आलें आहें. आतां ऐक—" असें म्हणून तिनें शैवलिनी आणि चंद्रशेखर यांच्या ग्रामत्यागाची सारी हकिकत त्याला सांगितली.

ती हकिकत ऐकून प्रताप कांहींवेळ सुन्न होऊन राहिला होता. नंतर तो म्हणाला, "इतके दिवस मला ही हकिकत कां कळवली नाहींस ?"

"तुम्हांला सांगून काय होणार होतं ?" सुंदरी म्हणाली.

"तुला काय माहित ?" प्रताप म्हणाला, "तूं बाई माणूस. तुझ्यासमोर कशाला बढाई मारूं ! मला पूर्वींच कळवलं असतंस तर इतक्यांत मी कांहीं उपाय केला असता. चंद्रशेखरांच्या कृपेच्या पायींच मी आज या पदाला येऊन पोंचलों आहें तें माहित नाहीं का तुला ?"

"माहित आहे तर !" सुंदरी म्हणाली, "पण माणूस मोठा झाला कीं जुनीं माणसं विसरतो—तसंच वाटलं मला."

तिचे ते उद्गार ऐकून प्रताप रागारागानें निघून गेला. त्याला राग आला असें पाहून सुंदरीलाही बरें वाटलें.

दुसऱ्या दिवशीं एक सैंपाकी आणि रामचरण नांवाच्या आपल्या नोकराला घेऊन प्रताप मुंगेरला गेला. जातांना त्यानें आपण कुठें जातों तें कुणालाच सांगितलें नाहीं. मात्र तो रूपसीला म्हणाला, "मी चंद्रशेखर आणि शैवलिनी यांच्या शोधासाठीं जातों आहें. त्यांचा पत्ता लागल्याशिवाय मी परत येणार नाहीं."

ज्या घरांत ब्रह्मचारी दलनीला ठेवून गेला होता तें प्रतापचें मुंगेरचें घर होतें.

सुंदरी कांहीं दिवस आपल्या बहिणीच्या घरीं राहिली होती. रोज सकाळ संध्याकाळ रूपसीपाशीं शैवलिनीची निंदा करून तिला शिव्यागाळी देत होती. एकदां रूपसी म्हणाली, "तूं जर शैवलिनीला पापीण म्हणतेस, तर तिच्यासाठीं धांवाधांव करीत मरायला इथं आलीस कशाला ?".

" तिचं श्राद्ध करायला ! " सुंदरी रागारागानें म्हणाली, " तिला यमाच्या घरीं पाठवायला—तिच्या तोंडाला आग लावायला !—" ती तोंडाला येईल तें भकत होती.

" तूं मोठी भांडकुदळ आहेस आक्का ! " रूपसी म्हणाली.

सुंदरी म्हणाली, " तिच्यापायींच तर मी अशी भांडकुदळ झालें आहें ! "

● ●

: ५ :

♣ **कलकत्त्याच्या** कौन्सिलनें नबाबबरोबर लढाई करायचें ठरवलें. आतां अजिमाबादला शस्त्रास्त्रें पाठवणें अवश्य होतें. तीं होडींत भरून पाठवण्यांत येत होतीं. अजिमाबादचा अधिकारी एलिससाहेब यालाही कांहीं गुप्त निरोप पाठवणें अवश्य होतें. नबाबाबरोबरचा झगडा मिटवण्यासाठीं ॲमिएट साहेब याला मुंगेरला पाठविण्यांत आलें होतें—तिथें त्यानें काय केलें तें कळल्याशिवाय एलिससाहेबाला कोणत्याही प्रकारचा संदेश पाठवणें शक्य नव्हतें. एवढ्यासाठीं ॲमिएटसाहेबाची भेट घेऊन तिथली बातमी काढून कलकत्त्याच्या कौंसिलला कळवणें अवश्य असल्यामुळें इंग्रजांचा गव्हर्नर व्हॅन्सिटार्ट यानें फॉस्टरला पुरंदरपूरहून बोलावून घेतलें. त्यानें शस्त्रास्त्रें असलेल्या होडीवर देखरेख करायची आणि ॲमिएटची भेट घेऊन पाटण्याला जायचें, असें ठरल्यामुळें फॉस्टरला कलकत्त्याला येऊन मग पश्चिमेकडे जावें लागलें.

फॉस्टरला आधींच ही सर्व हकिकत कळली होती, म्हणूनच त्यानें शैवलिनीला पुढें मुंगेरला पाठवून दिलें होतें.

शस्त्रास्त्रांची होडी आणि शैवलिनीला घेऊन तो मुंगेरला आला. होड्या घाटावर बांधून ठेवल्या होत्या. ॲमिएटसाहेबाची भेट घेऊन तो परत घाटावर येईपर्यंत गुरगनखाँनें होड्या जप्त केल्या होत्या.

या प्रकारामुळें ॲमिएट आणि नबाब या दोघांत वाद निर्माण झाला. नबाबानें होड्या ताब्यांत दिल्या नाहींत तर त्या तशाच सोडून देऊन फॉस्टरनें पाटण्याला जावें, असें ॲमिएटसाहेबानें ठरवलें.

त्या दोन्ही होड्यांवर नबाबाचे शिपाई पहारा देत होते. त्या होड्यांतील एक होडी मोठी होती आणि दुसरी लहान होती. ज्या होडींत—किंवा गलबतांत—शस्त्रास्त्रें भरलेलीं होतीं तें गलबत फार मोठें असल्यामुळें किनाऱ्यापासून पन्नास हात दूर होतें. तिच्यावर नबाबाचा पहारा नव्हता. त्या होडीवर तेलिंगा नांवाचा एक इंग्रजांचा शिपाई तिचें रक्षण करण्यासाठीं बसून राहिला होता.

दोन प्रहर रात्र उलटून गेली होती. काळोख पडला होता, तरीही दिशा स्वच्छ होत्या. छोट्या होडीवरचे पहारेवाले उठत होते, बसत होते, मधुन मधुन डुलक्या देत होते. नदीच्या कांठावर दाट झाडी होती, त्या झाडींतून एकजण टेहळणी करीत होता—तो होता स्वतः प्रताप राय.

पहारेकरी पेंगत असल्याचें पाहून प्रताप राय हळुहळु पाण्यांत उतरला. पाण्यांत आवाज झालेला ऐकून पहारेकऱ्यानें पेंगत पेंगत साद घातला, "हुकूमदर?" प्रतापनें उत्तर दिलें नाहीं. पहारेकरी पुन्हा पेंगू लागला. आंत फॉस्टर साहेब जागत बसला होता. पहारेकऱ्याचा सवाल ऐकून त्यानें बाहेर डोकावून पाहिलें—कुणीतरी माणूस स्नान करण्यासाठीं पाण्यांत उतरला होता.

इतक्यांत नदीकांठच्या झाडींतून बंदुकीचा आवाज आला आणि पहारेकरी गोळी लागून पाण्यांत पडला. जिथवर होडीची सांवली पडली होती तिच्या आंत प्रताप नाकापर्यंत बुडी देऊन राहिला.

बंदुकीचा आवाज ऐकतांच गलबतावरचे शिपाई, "क्या है, क्या है?" करीत धांवाधाव करूं लागले. होडीवरचे इतर लोकही जागे झाले. फॉस्टर हातीं बंदुक घेऊन पहातो तों तेलिंगा पहारेकरी मरून पाण्यांत पडला होता. त्याला वाटलें, कीं नबाबाच्या शिपायांनी त्याला गोळी घातली असावी, पण तितक्यांत त्याची नजर कांठावरच्या झाडीकडे गेली. तिथून धूर आलेला दिसत होता. दुसऱ्या होडीवरचीं माणसें इकडे तिकडे दौडादौडी करीत होतीं.

आकाशांत नक्षत्रें चमकत होतीं. नगरांत दिवे तेवत होते. गंगेच्या पात्रांत शेंकडों होड्या झोंपी गेलेल्या राक्षसीसारख्या दिसत होत्या. गंगेचें पाणी संथपणें वाहात होतें आणि त्या प्रवाहांतून पहारेकऱ्याचें प्रेत वहात जात होतें. एका चुटकीसरशी फॉस्टरसाहेबानें हें सारें पाहून घेतलें होतें.

झाडींत जिथें धुराची रेषा दिसली होती, त्या बाजूच्या रोखानें फास्टर बंदुक

घेऊन निघाला. या झाडींत शत्रू लपलेले असावेत असें त्याला खात्रीनें वाटत होतें. त्यांनीं पहारेकऱ्याचा जसा जीव घेतला तसाच आपलाही घ्यायला ते कमी करणार नाहींत याची त्याला खात्री होती.

प्लासीच्या लढाईनंतरच तो भारतांत आला होता. देशी लोक इंग्रजांवर नजर ठेवून राहिले असतील असें त्यानें मनांतसुद्धां आणलें नाहीं. देशी शत्रूच्या भीतीनें जो इंग्रज मागें हटतो त्याला मरणच येणें उचित, अशी कल्पना करून त्यानें बंदुक वर उचलली तोंच, झाडींतून आगीची रेघ झळकली—पुन्हा बंदुकीचा आवाज झाला—आणि मस्तकाला गोळी लागून त्या पहारेकऱ्या-प्रमाणेंच तो खालीं पाण्यांत पडला. मोठा आवाज होऊन त्याची बंदुक होडींतच पडली.

याच वेळीं प्रतापनें कमरेला लटकावलेली कट्यार म्यानांतून बाहेर काढली आणि होडीच्या दोऱ्या तोडून टाकल्या. त्याजागीं पाणी थोडें होतें आणि पाण्याला जोर नव्हता म्हणून नावाड्यानीं नांगर टाकला नव्हता—आणि टाकला असता तरीही प्रतापसारख्या बलवान माणसाला त्याचा अडथळा झाला नसता. एक उडी मारून प्रताप होडीवर चढला.

पहातां पहातां या सर्व गोष्टी घडल्या होत्या, त्यामुळें दुसऱ्या होडींतले लोक लगेच तिथें आले नव्हते. आतां ते आले त्यावेळीं प्रतापच्या कौशल्यामुळें होडी बाहेरच्या पाण्यांत गेली होती. एकजण पोहत पोहत होडी धरायला आला, त्याच्यावर प्रतापनें काठीचा फटका हाणला, तसा तो परत गेला. प्रतापनें त्याच काठीचा जोर लावून होडी प्रवाहांत लोटली.

तितक्यांत प्रतापनें पाहिलें, कीं तेलंगा शिपायी होडीवरून बंदुक रोखीत होता. त्यानें तीच काठी त्याच्या हातावर मारली त्यासरशीं बंदुक खालीं पडली. ती प्रतापनें उचलली. फॉस्टरच्या हातांतून पडलेली बंदुकही त्यानें उचलून घेतली होती. होडींतल्या लोकांना उद्देशून तो म्हणाला, "ऐका, माझं नांव प्रताप राय. नबाब देखील मला भीतो. या बंदुका माझ्या हातांत आहेत. तुम्ही माझं ऐकलंत तर मी कांहीं करणार नाहीं. मी सुकाणूवर जातों आहें. वल्हीं-वाल्यांनीं वल्हीं चालवावीं. बाकीच्यांनीं इथून तसूभर देखील हालतां कामा नये. कुणीं हालचाल केली तर एकदम गोळी घालीन."

नावाड्यांनीं घाबरून जाऊन वल्हीं हातीं घेतलीं. प्रतापनें सुकाणू धरलें. होडी वेगानें चालू झाली. दुसऱ्या होडीवरचे लोक एका छोट्या होडींत उतरून या होडीवर चाल करून येत होते. त्यांच्यावर नेम धरून प्रतापनें गोळ्या झाडल्या. दोघेजण खालीं पडले. बाकीचे लोक घाबरून होडी फिरवून पळून गेले. झाडींत लपलेला रामचरण, होडींतले शिपाई झाडीच्या मार्गानें येत आहेत असें पाहून, हळुच बाजूला सरून निघून गेला.

शैवलिनी आंतल्या केबिनमध्यें झोंपली होती. बाहेरची गडबड ऐकून ती जागी झाली. तिची दासी पार्वतीही जागी झाली होती. तिला शैवलिनीनें विचारलें, " काय झालं आहे ? तुला कांहीं कळलंय का ? " पार्वती म्हणाली, " कुणी कुणी म्हणताहेत होडीवर धाड पडली आहे. साहेबाला मारून टाकलं. आतां डाकू आम्हांला पकडतील. "

" फार उत्तम ! " शैवलिनी म्हणाली, " गोऱ्या डाकूच्या हातून काळ्या डाकूच्या हातीं गेलों तर त्यांत काय बिघडलं ? त्या डाकूंना बोलाव पाहूं. "

" त्यांना कशाला बोलवायचं ? " पार्वती म्हणाली, " ते येतील आपोआप !"

चार घटका निघून गेल्या तरी कुणी आलें नाहीं. थोड्या वेळानें होडी कांठाला लागली. एक लाठीवाला मेणा घेऊन होडीपाशीं आला. त्याच्याबरोबर रामचरण होता. तो होडीवर चढून प्रतापपाशीं गेला आणि त्याच्या हुकुमानुसार केबिनमध्यें जाऊन शैवलिनीला म्हणाला, " आतां होडीखालीं उतरा. मी आपलाच नोकर आहें. कांहीं काळजी करूं नका. माझ्याबरोबर चला. "

शैवलिनी मुकाट्यानें रामचरणबरोबर निघाली. पार्वती तिच्याबरोबरच निघत होती, तिला रामचरणनें मागें हटवलें. पार्वती तिथेंच राहिली आणि शैवलिनी मेण्यांत बसून प्रतापच्या घरीं आली.

त्यावेळेपर्यंत दलनी आणि कुलसुम त्याच घरांत होतीं. त्या झोंपेंतून जाग्या होतील या भीतीनें शैवलिनीला तिकडे न नेतां रामचरण तिला माडीवर घेऊन गेला. हें घर कुणाचें म्हणून शैवलिनीनें विचारलें, पण त्यानें तिला उत्तर दिलें नाहीं.

रामचरणनेंही आपली अक्कल चालवली होती. प्रतापनें शैवलिनीला जगत्-शेठच्या घरीं घेऊन जायला सांगितलें होतें, पण रात्रीच्या वेळीं त्या मोठ्या

माणसांना त्रास द्यायचा कसा असा विचार करून त्यानें मेणा प्रतापच्या घरीं आणला होता.

इकडे प्रताप मेणा गेल्यावर होडीखालीं उतरला. त्याच्या हातीं बंदुक असलेली पाहून सारेच चुपचाप राहिले होते, पण आतां बरेचसे लाठीवाले त्याच्याबरोबर आल्याचें पाहिल्यावरून त्याला कुणीच अडथळा केला नाहीं.

तो तडक आपल्या घरीं आला. रामचरणनें आपला हुकूम पाळला नाहीं हें पाहून तो चिडला होता. तो म्हणाला, " आतांच तिला जगत्‌शेठच्या घरीं घेऊन जा. तिला बोलावून आण. "

रामचरणनें वर जाऊन पाहिलें तों शैवलिनी गाढ झोंपली होती. अशा बिकट परिस्थितींतही तिला झोंप कशी यावी ? पण ती वस्तुस्थिती होती. तिला जागी करायचा प्रयत्न न करतां रामचरणनें प्रतापला येऊन सांगितलें कीं ती झोंपी गेली आहे. तें ऐकून प्रतापला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " आतां अधिक गडबड करूं नकोस. तूंही झोंप घे. मीही थोडा वेळ आराम करतों. "

रामचरण निघून गेल्यावर प्रताप माडीवर शेजघरांत आला. पहातो तों शैवलिनी त्याच्याच बिछान्यावर झोंपी गेली होती. दिवा तेवत होता. त्या दिव्याच्या प्रकाशांत तिचें असामान्य सौंदर्य पाहून तो मुग्ध होऊन गेला. कितीतरी वेळ अनिमेष नजरेनें तो तिच्याकडे पहात होता.

शैवलिनीला झोंप लागली नव्हती. ती नुसती डोळे मिटून आपल्या परिस्थितीचा विचार करीत बिछान्यावर पडली होती. प्रताप हलक्या पावलांनीं आंत आला असल्यानें तो आल्याची चाहूल तिला लागली नव्हती. प्रतापनें आपल्या हातांतील बंदुक भिंतीला टेकून ठेवली, पण ती घसरून खालीं पडली. त्या आवाजानें शैवलिनीनें डोळे उघडले. ती घाबरून ओरडली, " कोण आहे तें ? कोण तुम्ही ? " उठतां उठतां ती भीतीनें मूर्छित होऊन पडली.

प्रताप तें पाहून घाबरला. त्यानें तिच्या तोंडावर पाण्याचा शिडकाव केला. कमळाच्या पाकळीवर दवाचे बिंदू पडावे तसें तें तिचें मुखमंडल पाहून तो बेभान झाला.

थोड्या वेळानें शैवलिनी सावध झाली. प्रताप तसाच उभा होता. त्याला

पाहून ती शांतपणें म्हणाली, " कोण तुम्ही ? प्रताप ? कीं देवता माझी कसोटी पहाते आहे ? "

" मी प्रतापच ! " प्रताप म्हणाला.

शैवलिनी म्हणाली, " होडीवर मला शंका आली होती, कीं तो आवाज तुझाच. मी झोंपेतून घाबरून जागी झाल्यामुळं मला तो भ्रम झाला असं त्यावेळीं मला वाटलं होतं, पण आतां तो संशय फिटला.—" असें म्हणून ती स्तब्ध राहिली.

ती सावध झाली असें पाहून प्रताप जायला निघाला होता. त्याला थांबवून शैवलिनी म्हणाली, " तूं इथं कशाला आला होतास ? "

" हें माझंच घर आहे. " प्रताप म्हणाला.

शैवलिनी अस्वस्थ झाली होती. तिच्या अंतरांत आग पेटली होती. सर्वांग रोमांचित झालें होतें. ती थरथर कांपत होती. कांहीं वेळ थांबल्यावर उसनें अवसान आणून तिनें विचारलें, " मला इथं कुणी आणलं ? "

" मी—माझा नोकर होता माझ्याबरोबर. "

" मला कां आणलं इथं ? काय जरूरी होती मला इथं आणायची ? "

प्रतापला एकदम राग आला तो म्हणाला, " तूं पापी आहेस. म्लेंछांच्या हातून मी तुला सोडवलं अन् तूं मला विचारतेस कीं इथं कां आणलं म्हणून ?"

तो रागावला होता खरा, पण शैवलिनीला त्याचा राग आला नव्हता. ती गहिंवरून म्हणाली, " म्लेंछाच्या घरीं मी गेलें हें माझं दुर्भाग्य असं जर तुला वाटलं होतं, तर तिथंच मला हातांतल्या बंदुकीची गोळी कां घातली नाहींस ?"

आतां अधिकच चिडून प्रताप म्हणाला, " तेंही केलं असतं, पण स्त्रीहत्या म्हणून हटलों. तुझ्या लेखीं मरणच श्रेयस्कर. "

शैवलिनीला रडें कोसळलें. ती म्हणाली, " मला मरणच श्रेयस्कर—पण तसं म्हणावं लोकांनीं—तूं असं म्हणूं नकोस. कुणामुळं माझी अशी दुर्दशा झाली ? कुणाच्यामुळं माझं जीवन अंधकारमय झालं ? कुणाच्या सहवासाच्या सुखाच्या आशेची निराशा होतांच मला बरा वाईट मार्ग कळेनासा झाला तो कुणामुळं ? तुझ्याचमुळं ! कुणाच्यापायीं मी दुःखी झालें ? कुणाच्यासाठीं मी गृहधर्मसुद्धां विसरलें ? तुझ्याचसाठीं ना ? तूं तरी मला शिव्याशाप देऊं नकोस."

प्रताप म्हणाला, " तूं पापी आहेस, म्हणूनच तुला शिव्याशाप देतों. मला दोष लावतेस ? मी कोणत्याही प्रकारें दोषी नाहीं हें एक ईश्वरच जाणे. तूं नागीण आहेस असं समजून मी तुझ्यापासून दूर रहात होतों. तुझ्या डंखाच्या भयानं मी वेदग्राम सोडून गेलों. मी दोषी नाहीं. तुझं अंतरंगच दोषी आहे. तुझी प्रवृत्तीच दोषी आहे. स्वतः तूं पापी अन् मलाच दोष देतेस ! मी काय केलंय तुझं ? "

" तूं काय केलं आहेस होय ?" शैवलिनी गर्जून म्हणाली, " काय म्हणून तूं माझ्यासमोर आलास ? या उमलत्या यौवनाच्यावेळीं आपल्या सौंदर्याची ज्योती काय म्हणून माझ्यासमोर पाजळलीस ? मी सारं कांहीं विसरून टाकलं होतं, पुन्हा कां जागवलंस तें ? तुझंच ध्यान करतांना माझ्या सुन्दर गृहाचं अरण्य झालं होतं तें माहित नाहीं का तुला ? तुझ्याच आशेनं मी घर सोडून निघालें होतें तें माहित नाहीं का तुला ? नाहींतर फॉस्टर माझा कोण ? "

प्रतापच्या मस्तकावर वज्राघात झाला. विंचू डसल्यासारखा तो पीडित होऊन तिथून तडकाफडकी निघून गेला.

त्याच वेळीं बाहेर मोठी गडबड माजली होती.

● ●

## : ७ :

♣ **रामचरण** शैवलिनीला होडीवरून घेऊन गेल्यावर जखमी झालेला तेलंगा शिपाई हळुहळु उठून उभा राहिला. शैवलिनी मेण्यांतून जात असतांना त्याला दिसली. तो खुरडत खुरडत त्या मेण्याच्या रोखानें निघाला आणि प्रतापच्या घरापर्यंत येऊन पोंहचला. शैवलिनी त्या घरांत गेल्याचें पाहून तो ॲमिएटसाहेबापाशीं गेला.

त्या शिपायाचं नांव होतं बकाउल्ला. ॲमिएटसाहेबाच्या कचेरींत तो गेला त्यावेळीं तिथें एकच गर्दी उसळली होती. या दरवडेखोरांची बातमी जो देईल त्याला एक हजार रुपये बक्षिस देण्यांत येतील असें त्यानें जाहीर केलें त्याचवेळीं बकाउल्ला त्याच्यासमोर हजर झाला आणि त्यावेळपर्यंत घडलेली सारी हकीकत साहेबाला सांगून म्हणाला, " मी त्या डाकूचं घर तुम्हाला दाखवून देतों. "

ॲमिएटसाहेब खूष झाला. एका नाईकाला त्यानें बकाउल्लाबरोबर जायला सांगितलं, तेव्हां बकाउल्ला म्हणाला, " कुणीतरी दोघे इंग्रज माझ्या-बरोबर द्या. प्रतापराय म्हणजे मूर्तिमंत सैतान आहे. तो देशी लोकांच्या हातीं लागणार नाहीं."

ॲमिएटसाहेबानें गलस्टन आणि जॉन्सन नांवाच्या दोघां इंग्रजांना बका-उल्लाबरोबर जायला सांगितलें.

ही सर्व मंडळी निघाली त्यावेळीं गलस्टन म्हणाला, " बरोबर मेणबत्ती आणि काड्याची पेटी घ्या. रात्रीच्या वेळीं दिवा लावून ठेवून हे हिंदूलोक तेल खर्ची घालीत नाहींत."

जॉन्सननें मेणबत्ती आणि काड्याची पेटी बरोबर घेतली आणि ते सर्वजण इंग्रजांच्या पद्धतीनें खाड्खाड् मोजकीं पावलें टाकीत राजरस्त्यावरून निघाले. त्यांच्या मागें चार शिपाई, एक नाईक आणि बकाउल्ला होता. तो तांडा जात असतांना पाहून गांवांतले पहारेकरी घाबरून दूर झाले.

एक शब्दसुद्धां न बोलतां ते येऊन प्रतापच्या दाराशीं हजर झाले. त्यांनीं दार ठोठावलें. दार उघडण्यासाठीं रामचरण दाराशीं आला पण लगेच थांबला. त्याला संशय आला. तो मोठा धूर्त होता, तितकाच स्वामिभक्त आणि विश्वासू होता. बाहेर बोलत असलेल्या इंग्रजांची भाषा ऐकून तो दचकला. हातीं बंदुक घेतल्याशिवाय दार उघडणें त्याला धोक्याचें वाटलें. आधीं धन्याला उठवावें म्हणून तो माडीवर गेला. इकडे ते इंग्रज हातघाईला आले होते. जान्सन म्हणाला, " पहातोस काय ? मार लाथ. भारतवर्षाचीं दारं इंग्रजाच्या बुटाच्या लाथेसमोर कितीशीं टिकणार आहेत ? "

गलस्टननें लाथ मारली. खड्खड् आवाज झाला, पण दार तुटलें नाहीं. रामचरण धांवतच गेला. तो आवाज प्रतापच्या कानीं गेला होता.

प्रताप उठून जिन्यावरून खालीं उतरत होता, तोंच जॉन्सनच्या लाथेनं दरवाजा तुटून पडला.

" ब्रिटिशांच्या लाथेसरशीं भारतवर्ष असाच तुटून पडो ! " असें म्हणून ते दोघे घरांत घुसले. त्यांच्याबरोबर ते शिपाईही होते.

जिन्यावर प्रतापला गांठून रामचरण म्हणाला, " काळोखांत लपा. इंग्रज

आले आहेत. आमवाताच्या कचेरींतून आले आहेत वाटतं !—" रामचरण ॲमिएटला आमवात म्हणे. तो म्हणाला,—" ते आठ असामी आहेत. तुम्ही लपा आतां. "

" मी कसा लपून राहूं ? " प्रताप म्हणाला, " घरांत बायका आहेत त्यांची काय दशा होईल ? तूं आधीं माझी बंदुक घेऊन ये. "

ते दोघे बोलत असतांनाच जान्सननें मेणबत्ती पेटवली. जिन्यावर दोघेजण उभे असल्याचें जान्सनला दिसलें. त्यांच्याकडे बोट करून जान्सननें बकाउल्लाला विचारलें, " हेच का ते ? "

बकाउल्लाला नीटशी ओळख पटली नव्हती तरीही तो बेधडक म्हणाला, " हो, हेच ते. "

तें ऐकतांच त्या दोघांनीही एकदम जिन्यावर उडी मारली. प्रतापची बंदुक आणण्यासाठीं रामचरण मागल्यामागें हटत होता तोंच जॉन्सननें त्याच्यावर पिस्तुल झाडलें. पायाला गोळी लागून रामचरणनें तिथेंच बसकण मारली.

प्रताप निःशस्त्र होता, तरी तो पळून जायला तयार नव्हता. पळून जातांना रामचरणची काय दशा झाली तें त्यानें पाहिलें होतें. तो शांतपणें म्हणाला, " कोण तुम्ही ? कां आलां आहां इथं ? "

गलस्टननें विचारलें, " तूं कोण ? "

" मी प्रताप राय. " प्रताप म्हणाला. त्यासरशी दोघांही इंग्रजांनीं दोन्ही बाजूनें त्याचे हात पकडले. आतां धडपड करण्यांत अर्थ नाहीं असें वाटून प्रताप स्तब्ध राहिला. त्यांनीं प्रतापच्या हातांत हातकड्या अडकवल्या. रामचरणलाही उचलून आणण्याचा हुकूम देऊन ते प्रतापला घेऊन निघाले.

जिन्याखालच्या शेजघरांत दलनी आणि कुलसुम झोंपल्या होत्या त्या जाग्या होऊन दार किलकिलें करून पहात होत्या, त्यांच्याकडे बकाउल्लाची नजर गेली. तो ओरडला, " ती पहा फॉस्टरसाहेबाची बिबी ! "

ते दोघेही इंग्रज त्या खोलींत घुसले आणि दलनी आणि कुलसुमला दरडावून म्हणाले, " तुम्ही दोघीही चला आमच्याबरोबर. "

त्या दोघीही घाबरून मुकाट्यानें त्यांच्याबरोबर जाऊं लागल्या.

आतां शैवलिनीच काय ती तिथें एकटी राहिली होती. हा सर्व प्रकार भिंती

आड राहून ती पहात होती. त्या दोघी यवनी जशा दार किलकिलें करून पहात होत्या तशीच तीही पहात होती. तिघीही घाबरल्या होत्या, पण दैवयोगानें शैवलिनी मात्र त्यांच्या तडाख्यांतून सुटली.

ती आतां त्या घरांत एकटीच होती. कुणाचा आधार नव्हता. मरण दाराशीं आलें तरीही त्यांतून आपण कां निसटतों हेंच तिला कळेना. प्रतापची भेट होईल या आशेनें ती घराबाहेर निघाली होती. तो भेटला, पण लगेच त्याचा वियोग झाला. जीव द्यावा असें तिच्या मनांत आलें. तिनें लपवून ठेवलेली सुरी बाहेर काढली. ती आपल्या छातीशीं धरली—पण आत्महत्या करायचें साहस तिला झालें नाहीं.

विचार करतां करतां ती तिथेंच झोंपी गेली. जागी झाली त्यावेळीं दिवस बराच वर आला होता. सूर्याचीं किरणें खिडकीवाटे आंत येत होतीं. तिनें डोळे उघडून पाहिलें—ती थक्क झाली—घाबरली—स्तंभित झाली—

तिच्या समोर चंद्रशेखर उभा होता.

★

# तृतीय खंड

## : १ :

मुंगेरच्या एका मठांत रमानंदस्वामी नांवाचे एक परमहंस रहात होते. चन्द्रशेखर हा त्यांचा शिष्य होता. त्यांनींच दलनीचें तें पत्र नबाबाकडे पोंचतें करायची व्यवस्था केली होती.

पत्र पोंचतांच नबाबानें प्रतापच्या घरीं मेणे पाठवले. त्या घरांत आतां शैवलिनीखेरीज दुसरें कुणीच नव्हतें. त्यांना वाटलें, शैवलिनी हीच बेगम.

शैवलिनीच्या मनांतही त्यावेळीं पाप आलें. त्यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न न करतां ती त्या मेण्यांतून निघाली.

तिला नबाबापुढें आणून उभें केलें त्यावेळीं ती दलनी नव्हे हें त्यानें ओळखलें. दलनीपेक्षांही ती सुंदर होती, इतकेंच नव्हे, तर तिच्याइतकी दुसरी सुंदरी त्याच्या जनानखान्यांत नव्हती. नबाबानें विचारलें तेव्हां ती म्हणाली, " मी एक ब्राह्मणकन्या आहें. मीच बेगम समजून आपल्या शिपायांनीं मला इथं आणलं. "

नबाबानें विचारलें, " मग बेगम कुठं आहे ? "

तिनें झालेली सर्व हकिकत नबाबाला निवेदन केली तेव्हां नबाबानें विचारलें, " कुणाचं घर होतं तें ? "

शैवलिनी म्हणाली, " तें घर प्रताप रायचं. "

" तुझं त्याचं कांहीं नातं आहे का ? " नबाबानें विचारलें.

" हो—ते माझे पती. "

" तुझं नांव काय ? "

शैवलिनी म्हणाली, " रूपसी. " अगदीं सहजासहजीं तिनें हें उत्तर दिलें. हेंच सांगण्यासाठीं ती चांडाळीण तिथें गेली होती.

नबाब म्हणाला, " ठीक आहे. तूं आपल्या घरीं जा. "

" माझं घर कुठं आहे आतां ? " ती म्हणाली, " माझं घर माझ्या पतीपाशीं. मला माझ्या नवऱ्याकडे पाठवून द्या. आपण राजे आहां, माझी फिर्याद आहे आपल्यापाशीं—इंग्रजांनीं माझ्या नवऱ्याला पकडून नेलं आहे. त्याला सोडवून तरी आणा एक किंवा मला त्याच्याकडे पाठवून तरी द्या. आपण असं कांहीं करीत नसाल तर मी इथंच आपल्यासमोर डोकं आपटून प्राण देईन. "

इतक्यांत नोकरानें येऊन सांगितलें कीं गुरगनखाँ आले आहेत. नबाब शैवलिनीला म्हणाला, " मी परतून येईपर्यंत तूं इथंच थांब. "

• •

## : २ :

♣ **नबाबानें** गुरगनखाँची सर्व हकीकत ऐकून घेतली आणि म्हटलें, " इंग्रजांबरोबर विवाद करणेंच आतां प्राप्त झालंय. प्रत्यक्ष विरोध दाखवण्यापूर्वी ॲमिएटला आधीं कैद केलं पाहिजे. आमचा सर्वांत मोठा शत्रू आहे तो तोच ! तुम्हाला काय वाटतं ? "

" युद्धाला मी केव्हांही तयार आहें. " गुरगनखाँ म्हणाला, " पण परराष्ट्राच्या वकिलाला हात लावतां येत नाहीं. त्याला कैद केलं तर साऱ्या जगांत आपली बदनामी होईल. "

नबाब म्हणाला, " काल रात्रीं आमच्या प्रजेंतल्या एका माणसाला त्यानं धाड घालून पकडून नेलं. तो आमचा अपराधी आहे. वकील असला म्हणून काय झालं ? त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. "

" तसंच असेल तर तो शिक्षेला पात्र आहे." गुरगनखाँ म्हणाला, " पण त्याला पकडायचा कसा ? "

" शिपायांची तुकडी त्याच्या रहात्या जागीं पाठवा," नबाब म्हणाला, " आणि त्याच्या सर्व नोकरांसह त्याला पकडून आणा. "

गुरगनखाँ म्हणाला, " तो या शहरांतच नाहीं मुळीं. आज दुपारीं तो इथून निघून गेला."

" असं कसं झालं ? आम्हांला वर्दी दिल्याशिवाय तो गेला कसा ? "

"वर्दी देण्यासाठीं त्यानं हे नांवाच्या एका साहेबाला इथं ठेवून दिलं आहे."

" पण आम्हाला कळवल्याशिवाय तो असा कां पळून गेला ? हें गैरवर्तन झालं नाहीं का त्याचं ? "

गुरगनखाँ म्हणाला, " शस्त्रास्त्र भरलेल्या त्याच्या एका गलबतावरच्या इंग्रज अधिकाऱ्याचा कुणी खून केला, ॲमिएटसाहेबाचा असा समज झाला आहे, कीं तो खुनी माणूस आमचाच म्हणून—म्हणून तो रागारागानं निघून गेला. इथं रहाणं म्हणजे जीव धोक्यांत घालणं—असं त्याचं म्हणणं. "

" कुणी खून केला त्या इंग्रजाचा ? "

" प्रताप राय नांवाच्या एका माणसानं. " गुरगनखाँ म्हणाला.

" छान केलं ! " नबाब म्हणाला, " तो भेटला तर त्याला मी शाबासकी देईन. आतां कुठं आहे हा प्रताप राय ? "

" त्या सर्वांना पकडून तो घेऊन गेला आहे. " गुरगनखाँ म्हणाला, " त्यांना त्यानं आपल्याबरोबर नेलं आहे कीं अजिमाबादला पाठवून दिलं आहे तें नक्की कळलेलं नाहीं. "

" हा वेळ पर्यंत ही बातमी कां दिली नाहींत ? " नबाबानें विचारलें.

" मला ती आतांच कळली. " गुरगनखाँ म्हणाला.

तें खोटें होतें. गुरगनखाँला सारी हकीकत आधींच कळली होती. त्याच्या संमतीशिवाय ॲमिएटला मुंगेर सोडून जातां आलें नसतें, पण गुरगनखाँचे दोन बेत होते—पहिला दलिनी मुंगेरच्या हद्दीबाहेर गेलेली बरी. दुसरा, ॲमिएट साहेब एक प्रकारें आपल्या हस्तगत झालेला बरा—पुढें केव्हांतरी त्याचा उपयोग करतां यावा.

नबाबानें गुरगनखाँला निरोप दिला आणि मीर मुन्शीला बोलावून घेऊन सांगितलें, " मुर्शिदाबादला महंमद तकीखाँच्या नांवें परवाना पाठवून कळवा, कीं ॲमिएटचं गलबत मुर्शिदाबादेस पोंहचतांच तें ताब्यांत घ्या. ॲमिएटला कैद करा आणि त्यानं पकडून नेलेल्या माणसाला आणून आमच्यासमोर पेश

करा. उघड उघड हल्ला न करतां मोठ्या युक्तीनं हें सर्व काम पार पाडावं असं त्याला कळवा. परवाना घेऊन माणसाला किनाऱ्यावरून पाठवा म्हणजे तो आधीं पोंचेल. ”

नबाब अंतःपुरांत आला आणि त्यानें शैवलिनीला बोलावून घेतलें. तो तिला म्हणाला, “ तुझ्या नवऱ्याला घेऊन इंग्रज कलकत्त्याला गेले आहेत. त्याला तिथून सोडवून आणण्यासाठीं मीं मुर्शिदाबादला हुकूम पाठवला आहे. आतां तूं—”

“ मला माफ करा खाविंद ! ” शैवलिनी हात जोडून म्हणाली, “ पण आतांच माणसं पाठवलीं तर त्यांना पकडतां नाहीं का यायचं ?”

“ इंग्रजांना पकडणं म्हणजे तितकंस सोपं नाहीं. ” नबाब म्हणाला, “ सशस्त्र माणसं पाठवायचीं म्हणजे मोठं गलबत पाहिजे. ती तयारी होईपर्यंत इंग्रज मुर्शिदाबादला जाऊन पोंचतील देखील. शिवाय आम्ही हल्ला करण्याच्या तयारीनं येतों आहों असं कळलं तर ते त्या कैद्यांना मारूनसुद्धां टाकतील. मुर्शिदाबादचीं आमचीं माणसं मोठीं धूर्त आहेत. तीं युक्तीयुक्तीनं सारं काम पार पाडतील. ”

शैवलिनीला कळून चुकलें होतें, कीं आपल्या सौंदर्याचा प्रभाव नबाबावर पडला होता. ती सांगत होती तें तें त्याला खरें वाटत होतें. नाहींतर अशा-प्रकारें प्रत्येक गोष्ट तिला तपशीलवार सांगायची त्याला काय जरूर होती ?

शैवलिनीला आतां बराच धीर आला होता. ती पुन्हा हात जोडून म्हणाली, “ कृपा करून मला एक भिक्षा घाला. माझ्या नवऱ्याला सोडवून आणणं फार सोपं आहे. तो स्वतः एक लढवय्या आहे. त्याच्या हातीं शस्त्र असतं तर त्याला पकडणं इंग्रजांना कठीण गेलं असतं. आज त्याच्या हातीं कुणी हत्यार दिलं तर तो सहज तिथून सुटून येईल आणि आपल्या सोबत्यांनाही सोडवील. ”

“ तूं पोर आहेस ! ” नबाब हसून म्हणाला, “ इंग्रज म्हणजे काय याची तुला कल्पना नाहीं. त्या इंग्रजांच्या होडीवर चढून जाऊन त्याला हत्यार देऊन येईल कोण ? ”

शैवलिनी मान खालीं घालून मोठ्या अदबीनें म्हणाली, “खाविंदांचा हुकूम झाला, मला होडी देण्यांत आली, तर मीच स्वतः जाईन—”

नबाब मोटमोठ्यानें हंसूं लागला तेव्हां ती म्हणाली, " मला तें नाहीं साधलं खाविंद, तर मी मरून जाईन. त्यांत दुसऱ्या कुणाचंच नुकसान व्हायचं नाहीं; पण जर मला यश आलं तर माझंही काम होईल अन् आपलंही काम होईल. "

नबाबाला वाटलें, ही बाई धाडसी आहे. हें धाडस करतांना मेली तर आपलें काय नुकसान आहे ? जर तिनें काम पार पाडलें तर ठीकच, नाहींतर महंमद-तकीला परवाना गेलाच आहे. तो शैवलिनीला म्हणाला, " तूं एकटीच जाणार आहेस का ? "

शैवलिनी म्हणाली, " मी बायको माणूस—एकटी कशी जाऊं ? कृपा करून माझ्याबरोबर एक दासी आणि एक रक्षक द्यायचं कबूल करा. "

नबाबानें मसिबुद्दिन नांवाच्या एका विश्वासू आणि बलवान खोजाला तिच्याबरोबर जायला सांगितलें. बरोबर एक हिंदू दासीही दिली होती. शैवलिनी-बरोबर तीं जायला निघालीं त्यावेळीं नबाब म्हणाला, " मसिबुद्दीन, ही सांगेल तो हुकूम तूं पाळीत जा. ही बेगम आहे असं समज. दलनी बेगमची गांठ पडली तर तिला बरोबर घेऊन तत्काळ इथं ये. " तो शैवलिनीला म्हणाला, " बिबी, जा. यशस्वी हो. केव्हांही कधीं मुष्किल पडली तर मीरकासीमकडे यायला विसरूं नकोस. "

त्याच रात्रीं तीं तिघेंही होडींतून निघालीं.

• •

## : ३ :

♣ स्वच्छ चांदणें पडलें होतें. गंगेच्या दोन्ही कांठांना दूर अंतरापर्यंत वाळवंट पसरलेलें दिसत होतें. नदीचें पाणी संथ वाहत होतें. ओहोट झाल्या-मुळें बऱ्याचशा होड्या तिथें नांगरून पडल्या होत्या. त्या साऱ्या होड्यांत जें एक मोठें गलबत होतें, त्याच्यावर सशस्त्र शिपायांचा पाहारा होता. आंतल्या केबीनमध्यें कांहीं इंग्रज बुद्धिबळाचा डाव खेळत होते. त्यांतला एकजण दारू पीतपीत वाचीत होता. एकजण नुसतें वाद्य वाजवीत होता.

एकाएकीं सगळे दचकून थांबले. त्या भयाण रात्रीं कुठूनतरी जवळूनच रडण्याचा आवाज ऐकूं येत होता. हळुहळु तें रडणें वाढूं लागलें होतें. तो

आवाज दुरून येत असावा, पण नदीच्या वाळवंटांत अंतराचा प्रश्न नव्हता. रात्रीच्या शांत वेळीं ऐकूं येणारा तो रडण्याचा आवाज सर्वांच्या कानाला भयानक वाटूं लागला.

ॲमिएट खेळ टाकून उठला. बाहेर येऊन त्यानें चोंहीकडे नजर फेकली. जवळपास कुठेंच कुणी दिसलें नाहीं. नजिक कुठेंही स्मशान नव्हतें. तो रडण्याचा आवाज ऐकूं येत होता तो त्या वाळवंटाच्या मध्यभागांत. ॲमिएट होडींतून खालीं उतरला आणि आवाजाच्या अनुरोधानें चालूं लागला. थोडेंसें चालून गेल्यावर त्याला दिसून आलें, कीं वाळवंटाच्या मध्यभागीं कुणीतरी बसलेलें असावें. ॲमिएट त्या व्यक्तीच्या जवळ गेला—एक स्त्री टाहो फोडून रडत होती.

ॲमिएटला देशी भाषा येत नव्हती. त्यानें तिची चौकशी केली. पण तिला भाषा न कळल्यामुळें ती अधिकच रडूं लागली.

आपलें म्हणणें तिला समजावून देणें अशक्य आहे असें पाहून त्यानें खुणेनें तिला आपल्याबरोबर येण्यास सांगितलें. ती स्त्री उठली, तसा ॲमिएटही पुढें चालूं लागला. ती स्त्रीही रडत रडत त्याच्यामागोमाग निघाली.

केबिनींत आल्यावर ॲमिएट गलस्टनला म्हणाला, "ही बाई वाळवंटांत एकटीच बसून रडत होती. हिला माझी भाषा कळत नाहीं आणि मला हिची भाषा कळत नाहीं. आतां तूंच हिला विचार."

गलस्टनचें भाषेचें ज्ञान ॲमिएटपेक्षां फारसें अधिक नव्हतें, पण तिथल्या इंग्रजांच्या मेळाव्यांत हिंदीभाषाभिज्ञ म्हणून त्याची प्रख्याति होती. त्यानें तिला हिंदींत विचारलें, "कोण तूं ?" तिनें उत्तर दिलें नाहीं. ती नुसती रडत होती. त्यानें विचारलें, "तूं कां रडते आहेस ?" तरीही रडणें थांबलें नाहीं. त्यानें विचारलें, "तुझं घर कुठं ? कां आली आहेस तूं इथं ?" तरीही ती तशीच रडत राहिली होती.

गलस्टननें हार खाल्ली. ती कांहीं उत्तर देत नाहीं असें पाहून इंग्रजांनीं तिला जायला सांगितलें. तेंही तिला कळलें नाहीं. ती तशीच उभी राहिली होती.

ॲमिएट म्हणाला, "हिच्या पोषाखावरून ही बंगाली असावी असं वाटतं. कुणातरी बंगाली माणसाला बोलावून हिची हकिकत विचारून घ्या."

साहेबांचे सारे खानसामे बहुधा बंगाली मुसलमान होते. साहेबानें त्यांपैकीं एकाला बोलावून घेतलें आणि तिची हकीकत काढून घ्यायला सांगितलें.

खानसाम्यानें तिला विचारलें, " रडतेस कां ? " त्यासरशीं ती मोठमोठ्यानें हंसूं लागली. खानसामा साहेबाला म्हणाला, " ही पागल आहे. "

साहेब म्हणाला, " तिला काय हवं तें विचार ! '

खानसाम्यानें विचारलें तेव्हां ती म्हणाली, " भूक लागली आहे. "

खानसाम्यानें साहेबाला तसें सांगितलें तेव्हां साहेब म्हणाला, " तिला बबर्जीखान्यांत नेऊन खायला घाल. "

बबर्जीखान्यांत गेल्यावर ती म्हणाली, " मी आहें ब्राह्मणाची मुलगी. तुमच्या हातचं अन्न मला कसं चालेल ? "

खानसाम्यानें जाऊन साहेबाला तसें सांगितलें तेव्हां तो म्हणाला, " आपल्या या साऱ्या होड्यांवर कुणी ब्राह्मण नाहीं का ? "

खानसामा म्हणाला, " एक शिपाई ब्राह्मण आहे आणि एक कैदी ब्राह्मण आहे. "

साहेब म्हणाला, " कुणापाशीं अन्न असलं तर हिला त्यांतलं थोडं द्या म्हणावं. "

खानसामा तिला घेऊन पहिल्यानें शिपायापाशीं गेला. शिपायाचें जेवण उरकलें होतें. त्याच्यापाशीं कांहीं शिल्लक नव्हतें. तो तिला घेऊन ब्राह्मण कैदी असलेल्या होडीवर गेला. तो कैदी होता प्रताप राय. त्याच्याभोंवतीं संत्र्याचा खडा पाहारा होता. होडींत काळोख होता. खानसामा म्हणाला, " भटजीबुवा, तुमच्या हंडींत भात आहे का थोडा ? "

" कां ? " प्रतापनें विचारलें.

" एक ब्राह्मणाची बाई उपाशी आहे." खानसामा म्हणाला, " भात असला तर तिला खायला घाला. "

प्रतापच्या हंडींत भात नव्हता. तरीपण त्यानें होकार दिला. तो म्हणाला, " माझ्या हातांतल्या या हातकड्या काढायला सांगा. "

खानसाम्यानें संत्र्याला प्रतापच्या हातांतल्या हातकड्या काढायला सांगितल्या, पण संत्र्यानें साहेबाचा हुकूम असल्याशिवाय तसें करतां येत नाही असें उत्तर दिलें.

सुंदर चेहऱ्याचा सर्वत्र जय होत असतो. खानसाम्यानें जाऊन अॅमिएट साहेबाला वर्दी दिली. तोंपर्यंत शैवलिनी प्रताप असलेल्या होडीवर बाहेर उभी राहिली होती. ती बुरखा घेऊन उभी होती. साहेबाचा हुकूम होतांच तिला घेऊन खानसामा साहेबापाशीं गेला. त्यावेळीं तिनें बुरखा काढला होता. तिच्या सौंदर्याचा साहेबाच्या मनावरही परिणाम झाला. ती वेडी आहे असें कळलें त्यावेळीं त्याला तिची दया झाली. साहेबानें प्रतापच्या हातकड्या काढायचा हुकूम दिला आणि शैवलिनीला प्रतापच्या होडींत जायचीही परवानगी दिली.

खानसामा बत्ती घेऊन आला. संत्र्यानें प्रतापच्या हातकड्या खुल्या केल्या. प्रतापनें खानसाम्याला आपल्या होडींत येऊं दिलें नाहीं—तो मुसलमान होता ना! हातीं बत्ती घेऊन प्रताप हंडींतला भात वाढायचें ढोंग करूं लागला. त्याचा उद्देश होता पळून जायचा.

शैवलिनी होडीच्या आंतल्या केबिनींत गेली. संत्री बाहेर पहारा करीत होता. प्रतापच्या समोर जातांच तिनें पुन्हा बुरखा मागें घेतला. तिला पहातांच प्रताप थक्क झाला. ती दातांनी ओंठ चावीत होती. तिची मुद्रा जितकी निश्चयात्मक तितकीच आनंदानें उजळलेली होती. प्रतापला वाटलें, वाघाला शोभेशी ही वाघीण होती खरी.

शैवलिनी अगदीं पुटपुटत म्हणाली, "हात धुऊन टाक. मी कांहीं तुझ्या भाताची भीक मागायला आलेली नाहीं. आतां पळ इथून. तुझ्यासाठीं वाकणाच्या पलिकडे होडी तयार आहे."

प्रताप तशाच हलक्या आवाजांत म्हणाला, "आधीं तूं जा, नाहींतर तूं संकटांत पडशील."

ती म्हणाली, "आधीं तुम्ही पळा पाहूं. पुन्हा हातकड्या घातल्या तर पळतां यायचं नाहीं. एकदम पाण्यांत उडी घ्या. यावेळीं तरी माझ्या अकले-प्रमाणें वागा. मी आहें पागल. मी पाण्यांत उडी घेतें. मला वांचवण्यासाठीं तुम्ही माझ्या मागोमाग पाण्यांत उडी घ्या." असें म्हणून ती मोठमोठ्यानें हंसत ओरडूं लागली.—"मी नाहीं जेवणार! मी नाहीं जेवणार! मी नाहीं जेवणार!" नंतर तिनें एकदम रडायला सुरवात केली आणि म्हटलें, "मला

मुसलमानाच्या हातचं खायला लावलं. मी बाटलें. आई गंगे, मला शुद्ध कर." असें म्हणून शैवलिनीनें गंगेच्या प्रवाहांत झेंप घेतली.

"काय झालं? काय झालं?" असें म्हणत प्रताप बाहेर आला त्यावेळीं समोरच्या संत्र्यानें त्याला अडवलें. "हरामजादा! बाई माणूस बुडून मरते आहे अन् तूं उभा राहून पहातो आहेस?" असें म्हणत प्रतापनें त्या शिपायाला एक लाथ मारली त्यासरशीं तो किनाऱ्याच्या बाजूला खालीं पडला. "वांचवा! त्या बाईला वांचवा!" असें म्हणत प्रतापनें पाण्यांत उडी घेतली. पोहण्यांत पटाइत असलेली शैवलिनी आधींच पुढें गेली होती. प्रताप तिच्या मागोमाग जात होता. कैदी पळाला असें पाहून पोहत असलेल्या प्रतापवर दुसऱ्या शिपायानें बंदूक रोंखली तेव्हां तो तिथूनच ओरडला, "भिऊं नकोस. मी कांहीं पळत नाहीं. या बाईला आधीं बाहेर काढतों. नजरेसमोर स्त्री-हत्या झालेली कशी पाहूं? हिंदू आहेस ना तूं? कळून सवरून ब्रह्महत्त्या कां करतोस?" शिपायानें बंदुक खालीं केली.

शैवलिनी पोहत पोहत शेवटच्या होडीपाशीं आली. ती होडी पाहातांच ती दचकली. लॉरेन्स फॉस्टरनें तिला ज्या होडींत ठेवलें होतें तीच ती होडी होती. केबिनीच्या छपरावर चंद्राच्या स्वच्छ प्रकाशांत तिला एका खाटेवर लॉरेन्स फॉस्टर आडवा पडलेला दिसला. इतक्यांत त्याचीही नजर तिच्याकडे गेली. त्यासरशीं तो ओरडला, "पकडो, पकडो, हमारा बिबी." फॉस्टर स्वतः जखमी झाल्यामुळें दुबळा होऊन पडलेला होता. त्याला उठायची ताकद नव्हती. सारेच ओरडत उठले, 'पकडो पकडो, फॉस्टरसाब इनाम देगा.' प्रताप आपल्याशींच म्हणाला, "एकदा फॉस्टरला मी इनाम दिलं आहे. पुन्हा एकदा इनाम द्यायची ही संधी बरी आली आहे." तो पाण्यांतून मोठ्यानें ओरडून म्हणाला, "मी पकडतों तिला. तुम्ही फिरा मागें."

त्याच्या शब्दाला ते फसले आणि मागें फिरले. तो प्रताप होता हें फॉस्टरला तरी कुठें माहीत होतें!

## : ४ :

♣ तीं दोघेंही पोहत पोहत फार दूरवर गेलीं होतीं. तो क्षण मोठा आनंदाचा होता. अफाट समुद्र त्यांच्यासमोर पसरला होता आणि ही तर एक लहानशी नदी होती. जन्मादारम्य त्या संसारसमुद्रांत वादळी वाऱ्यांत जीं पोहत आलीं होतीं — त्यांना या छोट्या नदीची काय पर्वा ?

आनंदाची परमावधी झाली होती ती प्रतापची. शैवलिनी मात्र साशंक झाली होती. कळीच्या बाहुलीसारखी ती पोहत होती. पोहत असतांना त्या जखमी साहेबाचा चेहरा तिला दिसत होता.

तीं दोघेंही पोहण्यांत पटाईत होतीं. प्रतापनें तिला गांठलें आणि हांक मारली, " शैवलिनी—शै—! "

शैवलिनी दचकली. तिच्या हृदयाला कंप सुटला. लहानपणी तो तिला 'शै' म्हणून हांक मारी. किती वर्षे झालीं त्या गोष्टीला ! तिनें डोळे मिटले. मनांतल्या मनांत तिनें चंद्र आणि तारका नजरेसमोर आणल्या आणि म्हटलें, " प्रताप, आजसुद्धां या मरतुकड्या गंगेत चंद्राचा प्रकाश आला कसा ? "

" हा चंद्राचा प्रकाश नव्हे." प्रताप म्हणाला, " आतां सूर्य उगवलाय शै. आतां कुणाची भीति नाहीं. "

" तर मग चल किनारा गांठूं. "

" तुला आठवतं का शै, एक दिवस असेच आपण पोहत होतों—" शैवलिनीनें उत्तर दिलें नाहीं. एक लाकूड वाहात जात होतें तें प्रतापकडे लोटून ती म्हणाली, " हें धर अन् जरा विश्रांती घे. "

त्यानें पुन्हा विचारलें, " आठवतं ना ? तूं बुडाली नाहींस—मी बुडालों. "

" आठवतं." शैवलिनी म्हणाली.

" मनांत आणलं तर मी वाटेल तेव्हां बुडेन—पटतं ना हें तुला ?—मी नाहीं वर येत—आज मी जीव देणार--" असें म्हणून प्रतापनें हातांतलें लांकूड सोडून दिलें.

" हें काय चालवलं आहेस प्रताप ? " शै म्हणाली.

" खरोखरच मी जीव देणार आहें. " प्रताप म्हणाला, " मी सांगतों तशी शपथ करीत असलीस तरच मी वर येईन. "

"कोणती शपथ प्रताप ?" शैवलिनीनें विचारलें. यावेळीं तिला हातीं तलवार घेऊन उभा राहिलेला फॉस्टर समोर दिसत होता. तिनें पुन्हां विचारलें, "कसली शपथ प्रताप ?"

"या गंगेच्या पाण्यांत—"

"मला गंगा काय होय !"

"तर मग धर्माला साक्षी ठेवून—"

"आतां धर्म कुठं राहिलाय माझा ?"

"तर मग माझी शपथ घे—"

"जवळ ये." शै म्हणाली, "तुझा हात इकडे दे—" प्रताप जवळ येतांच फारा दिवसांनीं शैवलिनीनें त्याचा हात धरला. दोघांनींही जोडीनें पोहणें कठीण जाऊं लागल्यामुळें त्यानें पुन्हा तें लाकूड हातीं घेतलें.

प्रताप म्हणाला, "आतां माझी शपथ घे. नाहीं तर मी बुडी मारतों. काय करायचं आहे जगून ? कसल्या आशेच्या जोरावर या पापी जीवनाचा भार मी सहन करूं ?—मला हात लावून शपथ घे—माझ्या जिण्यामरण्याच्या शुभाशुभ परिणामाची जबाबदारी आहे तुझ्यावर—"

शैवलिनी म्हणाली, "तुझी शपथ, तूं जें सांगशील तें मी कबूल करतें."

प्रतापनें जें सांगितलें तें फार भयंकर होतें. ती शपथ घेणें शैवलिनीच्या लेखीं अशक्य होतें. ती म्हणाली, "या जगांत माझ्यासारखं दुःखी दुसरं कोण आहे प्रताप ?"

"मी !" प्रताप म्हणाला.

"तूं दुःखी कसा ?" शै म्हणाली, "तुझं एवढं वैभव आहे—अंगांत ताकद आहे—लौकिक आहे—मित्रांचा गोतावळा आहे—रूपसी आहे—माझं काय आहे प्रताप ?"

"खरं आहे" प्रताप म्हणाला, "तुझं म्हणायला कांहींच नाहीं ! ये तर, आपण दोघंहीं बुडून जीव देऊं."

शैवलिनी क्षणभर विचारांत पडली. तिला वाटलें, मी मेलें तरी कांहीं बिघडणार नाहीं, पण माझ्यासाठीं प्रतापनें कां मरावें ? ती म्हणाली, "आतां चल तीरावर !"

प्रतापनें हातचें लाकूड सोडलें आणि खाली बुडी मारली. अजूनही त्याच्या हातांत शैवलिनीचा हात होता. तिनें त्याला वर ओढलें. प्रताप वर आला तेव्हां शैवलिनी म्हणाली, " मी शपथ करतें !—पण तूं एकदां विचार करून पहा, कीं तूं माझं सर्वस्व काढून घेतो आहेस—मला तूं नको आहेस; पण तुझी आठवणसुद्धां मी कां विसरून जाऊं ? "

प्रतापनें तिचा हात सोडला. शैवलिनीनें पुन्हा त्याचा हात धरून गहिंवरून म्हटलें, " प्रताप, हा हात घट्ट धर—ऐक प्रताप, तुला हात लावून मी शपथ घेतें—तुझ्या जिण्यामरण्याच्या शुभाशुभाची जबाबदारी आहे माझ्यावर. ऐक. तुझी शपथ—आजपासून मी तुला विसरून गेलें ! आजपासून मी माझ्या साऱ्या सुखावर तिलांजली दिली. आजपासून मी माझं मन माझ्या ताब्यांत ठेवीन—आजपासून शैवलिनी मेली असं समज. " असें म्हणून तिनें प्रतापचा हात सोडला. हातचें लाकूडही सोडलें.

प्रताप तसाच गहिंवरून म्हणाला, " चल आतां किनाऱ्यावर जाऊं. "

दोघेंही किनाऱ्यावर येऊन पोंचलीं. वळणावरून चालत जाऊन त्यांनीं तिथें ठेवलेली होडी गांठली. दोघेंही होडींत बसलीं.

रमानंदस्वामी त्यांची ही सारी हालचाल लक्षपूर्वक पहात होते याची त्या दोघांनाही जाणीव नव्हती. तिकडे इंग्रजांचे लोक देखील कैदी नापत्ता झाले असें पाहून मागे फिरले होते.

प्रतापाला पळून जावें लागलें, पण रामचरण मात्र सहजासहजीं सुटला. तो इंग्रजाच्या होडींत कैदी म्हणून नव्हता. फॉस्टरला लागली होती ती गोळी त्याचीच, संत्री मेला होता तो त्याच्याच गोळीनें, हें कुणालाच माहीत नव्हतें. तो एक भोळा बिचारा गडी आहे अशी कल्पना करून मुंगेरहून निघतांना फॉस्टरनें त्याला सोडून दिलें, त्यावेळीं रामचरण म्हणाला, "मी गवळ्याचा पोर. माझा पाय हा असा मोडलेला. तुम्ही म्हणतां वाटेल तिकडे जा, पण जाऊं कसा ? "

साहेब म्हणाला, " ठीक आहे. कांहीं दिवस तूं आमच्याबरोबरच रहा. मी तुझ्या औषधाची व्यवस्था करीन. "

रामचरणाला हेंच हवें होतें. जिथें प्रताप तिथेंच आपण राहावें असा त्याचा इरादा होता.

आतां तो कैदी नव्हता. प्रताप पळून गेला असें जेव्हां त्याला कळलें तेव्हां रात्रीच्या वेळीं कुणालाही दाद लागूं न देतां होडीवरून उतरून तो पळून गेला.

• •

: ५ :

♣ त्या रात्रीं चंद्र दिसत नव्हता. ढगांनी सारें आकाश व्यापून टाकलें होतें. जिकडे तिकडे घनदाट काळोख पसरला होता.

नदीच्या कांठाला पुष्कळ आडोशाच्या जागा होत्या. तिथें लपून बसणें शक्य होतें. काळोखाचा फायदा घेऊन प्रतापला दाद लागूं न देतां शैवलिनी होडींतून पळाली आणि त्या आडोशाच्या जागीं लपून राहिली.

आतां तिच्या सर्वस्वाचा अपहार झाला होता. तिच्या साऱ्या आशाआकांक्षा मावळल्या होत्या. आतां या युद्धाला तोंड द्यायला आपण असमर्थ झालों आहों अशी कल्पना आल्यामुळें ती लढाईच्या मैदानांतून पळाली होती. प्रतापला दाद लागली तर तो आपला पाठलाग करीत येईल या भीतीनें ती त्या आडोशाच्या जागेंतून वाट काढीत शक्य तितकी दूर पळून जात होती. समोरच डोंगर होता, पण तो टाळून ती जंगलाच्या झाडींत सारा दिवस लपून राहिली. सारा दिवस ती उपाशी होती. संध्याकाळ झाली, आधीं काळोख पडला. थोड्या वेळानें चंद्र उगवला, तेव्हां त्या चांदण्याच्या प्रकाशांत ती डोंगर चढून जाऊं लागली.

त्या डोंगरावर पायवाट नव्हती. खडेधोंड्याप्रमाणेंच जिकडे तिकडे काटेरी झुडुपें विखुरलेलीं होतीं. त्या तसल्या बिकट वाटेंतून चालत असतांना तिच्या पावलांतून रक्त वाहूं लागलें होतें. ती हवालदिल झाली होती तरीही रस्ता काटायचा प्रयत्न करीत होती.

बुद्धिपुरस्सर तिनें हें दिव्य पत्करलें होतें. सुखाचा संसार टाकून, कांट्याकुट्यांनीं भरलेल्या जंगली भागांत साप किरडवाची पर्वा न करतां तिनें प्रवेश केला होता. तिने आजवर केलेल्या घोरतर पापाचें हें प्रायश्चित्त होतें का ?

सारा देह क्षतविक्षत झालेला, आंत भुकेतहानेनें डोंब उठवलेला, पुढें पाऊल टाकायला देखील असमर्थ झालेल्या परिस्थितींत ती वाट काढीत होती.

इतक्यांत आकाश भरून आलें. काळोखावर काळोखाचे थर चढूं लागले. तो डोंगर, पलिकडील नदी, झाडी झुडपें सारीं काळोखांत बुडून गेलीं. आतां यापुढें डोंगर चढून जाणें अशक्य आहे असें दिसून आल्यामुळें हताश होऊन ती तिथल्या तिथेंच बसली.

आकाशाच्या कुठल्यातरी टोंकाला चमकणाऱ्या विजेच्या रेषा दिसत होत्या. मागोमाग मेघांचा प्रचंड गडगडाट होत होता. वारा घोंघावत होता. झाडें झुडुपें उन्मळून पडत होतीं.

तितक्यांत पावसाचा एक थेंब पडला—एकामागून एक थेंब पडतां पडतां जोराचा पाऊस सुरू झाला. वाऱ्याचा आणि मेघांचा झगडा सुरू झाला होता. जिकडे तिकडे गडगडाट आणि कडकडाट होत असतांना मोठमोठीं झाडें कोसळून पडत होतीं. मोठमोठ्या शिला गडगडत जात होत्या. पलीकडून गंगेच्या पाण्याचा कलकलाट कानीं येत होता. हजारों धारांनीं कोसळणाऱ्या त्या पावसांत शैवलिनी बसून राहिली असतांना डोंगराच्या शिखरावरून कोसळ-णाऱ्या पाण्याच्या प्रवाहांत ती कमरेपर्यंत बुडाली होती.

थोड्या वेळानें पाऊस थांबला, पण वादळ थांबलें नाहीं—थोडेसें ओसरलें मात्र. काळोख अधिकाधिक वाढत होता. आतां डोंगरावर चढणें किंवा खालीं उतरणें, दोन्हीही अशक्य झालीं होतीं.

शैवलिनी थंडीनें कडकड कांपत होती. आतां तिला वेदग्राम आठवलें. नवऱ्याच्या घरचा सुखाचा संसार आठवला. एकदा पुन्हा त्या सुखाच्या संसाराचा अनुभव घ्यावा आणि मग मरावें असें तिला वाटूं लागलें. तें सारें तर दूरच रहो, पण उगवता सूर्य दिसणेंसुद्धां आतां अशक्य झालें होतें. ती मृत्यूला हांक मारीत होती—तिला वाटलें, मृत्यू आतां अगदीं जवळ आला—

इतक्यांत त्या निर्जन पर्वतावर, घनदाट जंगलांत, महाघोर अंधकारांत कुणातरी माणसानें शैवलिनीच्या अंगाला हात लावला.

पहिल्यानें तिला वाटलें, कुणीतरी जंगली जनावर असावें. ती जरा सरकून दूर झाली. पुन्हा तोच तसा हाताचा स्पर्श—प्रत्यक्ष माणसाच्या हाताचा स्पर्श—त्या मिट्ट काळोखांत कांहीं दिसत नव्हतें—ती घाबरून ओरडली, " कोण

तूं ? कोण तूं ? देव कीं माणूस ?" तीं माणसाला भीत नव्हती—भीत होती देवाला—देवाघरच्या शिक्षेला.

तिच्या प्रश्नाला कुणी उत्तर दिलें नाहीं. मनुष्य असो कीं देवता असो, कुणीतरी तिला दोन्ही हातांनीं धरून ठेवलें होतें. कुणाचातरी ऊष्ण श्वासोच्छ्वास तिच्या गालाला चाटून जात होता—कुणीतरी एका हातानें तिचे दोन्ही पाय उचलले आणि दुसरा हात पाठीला दिला—तिला वर उचललें—शैवलिनी ओरडली तरीही कुणी उत्तर दिलें नाहीं. माणूस असो, देव असो कीं पिशाच्च असो, कुणीतरी तिला घेऊन डोंगर चढूं लागला होता.

शैवलिनीला निश्चितपणें वाटलें, तो कुणीही असो, तो लॉरेन्स फॉस्टर नव्हता खास !

★

# चतुर्थ खंड

## : १ :

प्रताप जमीदार होता—प्रताप डाकू होता. ज्या काळचा हा इतिहास लिहिला जात आहे, त्या काळांत बरेच जमीदार डाकू होते. डाकू कुणाला म्हणत नाहींत? तैमूरलंगचे पूर्वपुरुषही डाकू होते. इंग्लंडमधें जे आपल्या वंशाचा अभिमान बाळगतात ते नॉर्मन लोक किंवा स्कँडिनेव्हियन नाविक लोक आपण डाकूंचे वंशज आहोंत असें अभिमानानें सांगतात. कौरव-सुद्धां गाई चोरीत होते. बंगाली जमीदाराचे कांहीं कांहीं वंशज याचप्रमाणें डाकूच्या शाखेंतून जन्माला आले होते.

प्रताप जो डाकू झाला होता तो स्वतःच्या संपत्तीचें रक्षण करण्याकरतां किंवा पराक्रमी शत्रूच्या निःपाताकरतां. त्यानें निष्कारण कुणावर डाका घातला नाहीं, कीं कुणाचीं हत्त्या केली नाहीं. उलट दुबळ्या लोकांचे रक्षण करण्यांत तो पुढाकार घेत असे.

छोट्या होडींतून शैवलिनी पळाली त्या रात्रीच्या प्रभातकाळीं प्रताप जागा झाला तेव्हां रामचरण आलेला पाहून तो आनंदित झाला. त्याच वेळीं शैवलिनीचा पत्ता लागला नाहीं म्हणून तो खिन्न झाला होता. त्याला वाटलें, शैवलिनीनें जीव दिला.

प्रताप त्याच होडींतून मुंगेरला आला. तो किल्ल्यांत गेला त्यावेळीं त्याला दिसून आलें, कीं इंग्रजांबरोबर लढाई देण्याची तयारी नबाब जोरानें करीत होता. प्रतापला आनंद झाला. या दैत्यांना आतां बंगालमधून हांकलून काढतां नाहीं का यायचें? फॉस्टर नाहीं का पकडला जायचा!

पण या कामीं आपल्याला कोणतें सहाय्य करतां येईल? सेतु बांधायला खारकुंडीनें मदत केली नव्हती का? त्याच्यापाशीं सैन्य नव्हतें. नुसते लाठी-वाले होते—डाकू होते—त्यांचा कांहीं उपयोग होईल का या कामीं?

दुसरें कांहीं झालें नाहीं तरी इंग्रजांची रसद तर लुटतां येईल? एवढ्यानें देखील नबाबाच्या कार्याला मदत नाहीं का व्हायची? सैन्याचा पाठलाग करायचा आणि त्यांच्या खाद्यपेयांच्या वस्तु लुटायच्या असें त्यानें ठरवलें.

इंग्रजांनीं चंद्रशेखरचा सर्वनाश केला, शैवलिनी मेली, त्याला स्वतःला कैदेंत घातलें, असेंच आणखी किती लोकांचें या इंग्रजांनीं किती नुकसान केलें असेल! नबाबाला एवढी मदत केली तर तो आपल्याला एक-दोन परगणे-देखील देईल!

नबाबाच्या अमात्य वर्गाची खुषामत करून त्यानें नबाबाची भेट घेतली. बराच वेळ त्या दोघांचें खलबत झाल्यावर तो परत घरीं आला. बऱ्याच दिवसांनीं नवरा घरीं आलेला पाहून रूपसीची काळजी दूर झाली. मात्र शैवलिनीच्या मृत्यूची बातमी ऐकून तिला फार दुःख झालें. सुंदरीवरही त्या बातमीचा तसाच परिणाम झाला.

पुन्हां प्रताप कामगिरीवर निघाला.

मुंगेरपासून काटोवापर्यंत सर्व लाठीवाले आणि डाकू प्रतापनें गोळा केले आहेत ही बातमी जिकडे तिकडे पसरली.

ती बातमी ऐकतांच गुरगनखाँ अस्वस्थ झाला.

● ●

## : २ :

त्या काळोख्या गुहेंत शैवलिनी दगडावर झोंपली होती. त्या महापुरुषानें तिला आणून तिथें ठेवलें होतें. वादळी पाऊस थांबला होता. मात्र त्या गुहेंत सर्वत्र अंधकार पसरला होता. डोळे झांकले तरी अंधार—उघडले तरी अंधार. दगडाच्या फटींतून क्वचित ठिबकणाऱ्या पाण्याच्या थेंबाच्या आवाजाखेरीज कसलाच आवाज ऐकूं येत नव्हता.

शैवलिनी अगदीं घाबरून गेली होती. ती जिवाला कंटाळली होती. सुख, धर्म, कुल, मान, हीं सारींच ती हरवून बसली होती. मग ती भीत होती

कशाला ? ज्याच्यासाठीं तिनें सर्वस्वाचा त्याग केला होता, तोही आतां तिच्या लेखीं नाहींसा झाला होता. दोन दिवसाचा उपास, अडचणीच्या मार्गांतून केलेला प्रवास, वादळामुळें उडालेली दैना यांनीं ती पूर्णपणें थकून गेली होती. देह अगदीं कोसळून पडला होता.

अर्धवट झोंप आणि अर्धवट जागृतावस्थेंत ती त्या गुहेंतल्या दगडावर पडून राहिलेली असतांना तिच्या नजरेसमोर नरकाचीं भयानक दृश्यें दिसत होतीं. कल्पनेच्या पलीकडे जाऊन दिसत असलेलीं तीं भीषण दृश्यें पाहून ती घाबरून जागी झाली आणि 'धांवा धांवा, मला वांचवा' असें ओरडूं लागली. एक किंचाळी फोडून तिनें म्हटलें, "काय होणार माझं ? यांतून सुटका व्हायचा उपायच का नाहीं ?"

गुहेंतून गंभीर आवाज आला, "उपाय आहे—" तो आवाज ऐकून शैवलिनी दचकली. पुन्हां आवाज झाला, "बारा वर्षांचं व्रत घे !"

ही आकाशवाणी होती का ?

ती म्हणाली, "कसलं हें व्रत ? मला कोण शिकवील तें ?"

उत्तर आलें, "मी शिकवीन. हें व्रत ग्रहण कर. तुझ्या अंगावर असलेलं वस्त्र टाकून मी देतों तें वस्त्र परिधान कर. हात पुढं कर."

शैवलिनीनें हात पुढें केला. त्या हातांत आलेलें वस्त्र नेसून तिनें आपलें वस्त्र टाकून दिलें आणि विचारलें, "आतां काय करूं ?"

उत्तर आलें, "आपल्या सासुरवाडीला जा—वेदग्रामला जा—तिथं गांवाबाहेर एक झोंपडी बांध. फलमूलांखेरीज दुसरं कांहीं खाऊं नकोस—अन् तेंही एकच वेळ. जमिनीवर शयन कर. जटा धारण कर. संध्याकाळीं एकदांच भिक्षेसाठीं गांवांत जा. भिक्षा मागतांना गांवोगांव आपल्या पापाचा उच्चार करीत जा—"

"माझं पाप बोलण्याजोगं का आहे ?" ती म्हणाली, "याखेरीज प्रायश्चित नाहींच का ?"

उत्तर आलें, "आहे."

"कोणतं ?"

"मरण !" उत्तर आलें.

"तर मग व्रतच घेतें." शैवलिनी म्हणाली, "आपण कोण ?" यावर

उत्तर आलें नाहीं तेव्हां तिनें पुन्हां विचारलें, " आपण कुणीही असा,—मी विचारीत नाहीं—पर्वतावरची देवता समजून मी आपल्याला नमस्कार करतें—मला एकाच प्रश्नाचं उत्तर द्या, माझे पति कुठं आहेत ? त्यांची माझी भेटच होणार नाहीं का ? "

उत्तर आलें, " प्रायश्चित पुरं झाल्यावर तुला तुझ्या पतीची भेट होईल. "

" म्हणजे बारा वर्षांनीं ? " शैवलिनी म्हणाली, " अन् त्यापूर्वीच मी मेलें तर ? "

" तर मृत्युकालीं भेट होईल ! "

" त्यापूर्वी भेट व्हायचा कांहीं मार्गच नाहीं का ? " शैवलिनीनें विचारलें.

उत्तर आलें, " आजच त्याची भेट व्हावी अशी तुझी इच्छा असेल तर या गुहेंत एक आठवडाभर राहून आपल्या पतिदेवाचं अखण्ड स्मरण कर. दुसरा कोणताही विचार मनांत आणूं नकोस. या सात दिवसांत फक्त संध्याकाळच्या वेळीं बाहेर जाऊन भूक शमवण्यापुरतीं फळमुळं घेऊन ये. कुणा माणसासमोर जाऊं नकोस. कुणी भेटलंच तर त्याच्याशीं बोलूं नकोस. या अंधाऱ्या गुहेंत आठवडाभर त्याचंच चिंतन करीत राहिलीस, तरच तुझी त्याची भेट होईल. त्या सात दिवसांत फक्त संध्याकाळच्या वेळीं बाहेर जाऊन फळमुळं घेऊन ये. केवळ भूक निवारण होईल एवढंच खा. पोटभर जेऊं नकोस. कुणा मनुष्याजवळ जाऊं नकोस. कुणी अचानक भेटलं तर त्याच्याशीं बोलूं नकोस. या काळोख्या गुहेंत एक आठवडाभर राहून सरळ मनानं सारखं त्याचंच ध्यान करीत राहिलीस, तरच त्याची तुझी भेट होईल."

शैवलीनें त्याची आज्ञा पाळली. सात दिवस ती गुहेबाहेर गेली नाहीं. सात दिवस कुणाशीं बोलली नाहीं. जवळ जवळ उपासपोटीं राहून केवळ एकच आपल्या पतीचें ध्यान करीत ती त्या काळोखांत राहिली होती.

सातव्या रात्रीं ती नित्याप्रमाणें चिंतन करीत बसली असतांना तिची चेतना नष्ट झाली. त्या तंद्रेंत तिला नाना प्रकारची भयंकर स्वप्नें दिसूं लागली. नरकाचीं रोमहर्षक दृश्यें तिला पुन्हांपुन्हां दिसत होतीं.

तिला वाटलें, आपल्याला मृत्यु आला. आपला देह घेऊन पिशाच्चें काळोखांतून आकाशांत उड्डाण करीत जाऊं लागली. तिला वाटलं, तिथून तीं

आपल्याला खालीं फेंकून देत आहेत. खालीं धगधगत्या नरकाची खाई पेटलेली तिला दिसली. तीं पाहून तिचा थरकांप उडाला. तिनें मनांतल्या मनांत हांक मारली, " कुठं आहां तुम्हीं, पतिदेव ? कुठं आहां चंद्रशेखर ? तुमच्या चरणीं सहस्र सहस्र प्रणाम ! माझं रक्षण करा. मीं अपराधी आहें. आतां मला या नर्ककुंडांत टाकतील. तुम्ही माझं रक्षण केलं नाहीं तर दुसरं कोण आहे मला ? प्रसन्न व्हा ! माझं रक्षण करा—माझं रक्षण करा ! "

ती आंधळी, बहिरी, मृतवत् झाली होती. तिला वाटलें, कुणीतरी आपल्याला धरून घेऊन बसलें आहे.

नजरेसमोर दिसणारीं नरकाची दृश्यें एकाएकीं अंतर्धान पावलीं. तिची बधिरता नाहींशी झाली. डोळ्यांत दृष्टी आली. तिला वाटलें, हा मृत्यु नव्हे—जीवन आहे. हें स्वप्न नव्हे—ही जागृति आहे. तिनें डोळे उघडून पाहिलें, गुहेंत थोडाथोडा उजेड दिसत होता. पहांट झालेली असावी—बाहेर पक्षांचा किलबिलाट सुरू झालेला होता.

पण हें काय ? कुणाच्या अंगावर तिचें मस्तक होतें ? कोण तिच्याकडे दयार्द्र दृष्टीनें पहात होतें ? शैवलिनीला ओळख पटली.—तो ब्रह्मचारी वेषधारी चन्द्रशेखर होता. तिच्या कानीं हांक आली, " शैवलिनी ! "

ती उठून बसली. चन्द्रशेखरच्या तोंडाकडे पाहूं लागली. पाहातां पाहातां तिला चक्कर आली आणि ती मूर्च्छित होऊन खालीं पडली.

चन्द्रशेखरनें तिला सावरून उठवून सावध केलें. सावध होतांच ती त्याचे पाय धरून मोठमोठ्यानें रडूं लागली. ती म्हणाली, " आतां काय होणार माझं ? "

" माझ्या भेटीची इच्छा तूं कां प्रदर्शित केलीस ? " चन्द्रशेखरनें विचारलें.

शैवलिनीनें डोळे पुसले. रडें आवरलें. सुस्थ होऊन ती म्हणाली, " मला वाटतं मी फार दिवस वांचणार नाहीं— " ती शहारली. स्वप्नांत पाहिलेलीं तीं भयंकर दृश्यें तिला आठवलीं. क्षणभर स्तब्ध राहून ती म्हणाली, "—मी थोड्या दिवसांची सोबतीण आहें. मरायच्यापूर्वी तुमची भेट व्हावी ही इच्छा. नवऱ्याचं घर टाकून जी निघून गेली ती पुन्हां त्याचीच भेट व्हावी म्हणून तळमळतेय हें कुणाला खरं वाटेल ? कोण माझ्यावर विश्वास ठेवील ? "

" मी विश्वास ठेवीन. " चन्द्रशेखर म्हणाला, " तुला जबरदस्तीनं नेण्यांत आलं हें कळलंय मला. "

" तें खोटं आहे. मी स्वेच्छेनं फॉस्टरबरोबर गेलें होतें. दरोडा पडायच्या-पूर्वीच फॉस्टरनं मला घेऊन जायला माणसं पाठवलीं होतीं. "

चन्द्रशेखरनें खालीं मान घातली. त्यानें शैवलिनीला हळूच जमिनीवर ठेवलें. तो उठून उभा राहिला. तो जायला निघाला होता. जातां-जातां तो म्हणाला, " शैवलिनी, बारा वर्षांच्या प्रायश्चित्ताचं व्रत घे. तोंवर दोघंही जिवंत असलों तर पुन्हां आपली भेट होईल. आज हें एवढंच. "

शैवलिनी हात जोडून म्हणाली, " जरा थांबा. प्रायश्चित करणं माझ्या नशिबी नाहींसं दिसतं. जरा खालीं बसा. क्षणभर मी तुम्हांला पाहून घेतें. "

चन्द्रशेखर खालीं बसला तेव्हां तिनें विचारलें, " आत्महत्त्येंत पाप आहे का ? "

" आहे ! " तो म्हणाला, " असं कां वाटतं तुला ? कां मरायला उठली आहेस ? "

शैवलिनी शहारली आणि म्हणाली, " मरायची मला भीति वाटते. या पर्वतावर कुणीतरी देवता आहेत. त्यांनीं काय केलं आहे कोण जाणे, रात्रंदिवस माझ्या नजरेसमोर नरकाचीं भयानक दृश्यं दिसतात. मेलें तर त्या नरकांत जाईन याची भीति वाटतेय मला ! " असें म्हणून ती पुन्हां शहारली आणि लगेच दगडासारखी स्तब्ध होऊन राहिली.

चन्द्रशेखरनें विचारलें, " कां घाबरलीस ? काय दिसतंय तुला ? "

तिच्याकडून उत्तर आलें नाहीं. ती दगडाच्या पुतळीसारखी निश्चल होऊन बसली होती. चन्द्रशेखर सारखी नजर लावून तिच्याकडे पहात होता. एकदम किंचाळी ठोकून ती म्हणाली, " मला वांचवा, मला वांचवा ! तुम्ही माझे पति-राज—तुमच्याखेरीज कोण माझं रक्षण करणार ? " बोलतां बोलतां ती मूर्च्छित झाली.

जवळच असलेल्या झऱ्यांतलें पाणी घेऊन चन्द्रशेखरनें तिच्या मस्तकावर सिंचन केलें. आपल्या उत्तरीयानें तो तिला वारा घालूं लागला. थोड्या वेळानें ती सावध झाली, ती उठून बसली आणि एक शब्दसुद्धां न बोलतां हुंदके देत रडूं लागली.

चन्द्रशेखरनें विचारलें, " कां रडतेस ? "

ती म्हणाली, " तीं नरकाचीं दृश्यंच दिसतायत मला. मला भीति वाटतेय मरायची. मेलें तर त्या नरकांत जाईन. कसंही करून मला वांचवा. मी ही अशी एकटी. बारा वर्षं कशीं काढूं ? "

चन्द्रशेखर म्हणाला, " भिऊं नकोस. तो सगळा भ्रम आहे. उपास आणि मानसिक क्लेशांच्या पायीं हें सारं होतंय. तूं वेद्रग्रामला जा, गांवाबाहेर एक झोंपडी बांध, तिथं सुंदरी येऊन तुझी विचारपूस करील—" तिचा हात धरून तो तिला म्हणाला, " चल, ये माझ्याबरोबर. "

शैवलिनी उठून उभी राहिली; पण एकदम गुहेच्या तोंडाकडे पळत सुटली. त्या अंधुक प्रकाशांत रस्ता न दिसल्यामुळें दगडाला ठेंचाळून ती खालीं पडली. पुन्हां तिला मूर्च्छा आली. चन्द्रशेखरनें तिला उचलून घेतलें आणि पलीकडे वहात असलेल्या झऱ्यापाशीं नेलें. बाहेरचा वारा लागल्यावर थोड्या वेळानें ती सावध झाली आणि म्हणाली, " कुठंय मी ? "

" मी तुला बाहेर घेऊन आलोंय. " चन्द्रशेखर म्हणाला.

शैवलिनी पुन्हां शहारली—घाबरली—विचुक बोलूं लागली—गाऊं लागली—हंसूं लागली. चन्द्रशेखरला वाटलें, कीं शैवलिनीला वेड लागलें. ती चन्द्रशेखरचें नांव घेऊन हांका मारूं लागली होती. ' मीच चन्द्रशेखर ' असें त्यानें म्हटलें, तेव्हां एकदम झेंप घेऊन तिनें त्याच्या गळ्याला मिठी मारली आणि ती ओक्साबोक्शीं रडूं लागली.

चन्द्रशेखरलाही गहिंवरून आलें. तो हळूहळू तिची समजूत घालीत होता. ती म्हणाली, " आतां मी तुमच्याबरोबर येतें. मला मारणार नाहीं ना तुम्ही ? "

" नाहीं." असें म्हणून चन्द्रशेखर उठून उभा राहिला. शैवलिनीही उठली. खिन्न मुद्रेनें चन्द्रशेखर चालूं लागला. पागल झालेली शैवलिनीही केव्हां हंसत, केव्हां गात, तर केव्हां रडत रडत त्याच्यामागून चालूं लागली.

★

# पंचम खंड

## : १ :

♣ इंग्रजांचीं सारीं गलबतें मुर्शिदाबादला येऊन पोंचलीं. मीरकासीमचा तिथला नायब महम्मद तकीखाँ याला ॲमियेट येऊन पोंचल्याची बातमी मिळाली.

महम्मद तकीखाँ लव्याजम्यानिशीं येऊन ॲमिएटला भेटला. त्यानें ॲमियेटला भोजनाचें आमंत्रण दिलें. मोठ्या नाखुषीनें कां होईना, ॲमियेटनें त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. तिकडे इंग्रजांचीं गलबतें खालीं केलीं जाऊं नयेत म्हणून महम्मद तकीनें किनाऱ्यावर आपले टेहेळे ठेवून दिले होते.

महम्मद तकी निघून गेल्यावर इंग्रज खलबत करूं लागले—आमंत्रण स्वीकारावें, कीं नाहीं ? इंग्रजांची जात निर्भय, त्यांनीं कां भ्यावें असें गलस्टन् आणि जॉन्सन म्हणाले. ॲमियेट म्हणाला, " आम्हीं यांच्याबरोबर लढाई पुकारलीय. आतां सलोख्याचं नातं राहिलेलं नाहीं. आतां यांच्याकडे जेवायला जायचं कसं ? " शेवटीं निमंत्रणाचा स्वीकार करायचा नाहीं असें ॲमियेटनें ठरवलें.

तिकडे दलनी आणि कुलसम गलबतावर बंदींत होत्या, त्यांच्यापर्यंत ही बातमी जाऊन पोंचली. दलनी कुलसुमला म्हणाली, " आतां आपल्या सुटकेची वेळ जवळ आलीय. नबाबाच्या बेगमेला ज्यांनीं कैद करून आणलंय, त्यांनाच नबाबाच्या वतीनं खान्याचं आमंत्रण येतं, यांतच काय तें समज. इंग्रजांची घटका आतां भरली आहे. निष्कारण आम्हांला ज्यांनीं पकडून आणलं, त्यांना आतां चांगलीच अद्दल घडेल. "

"पण सुटकेसाठीं एवढी घाई कां?" कुल्सुम म्हणाली, "अटकेंत ठेवण्यापलीकडे त्यांनीं आम्हांला अजून कसलाच उपसर्ग केला नाहीं. नुसतं अटकेंतच ठेवलंय. बायकांच्या जातीला कुठंही गेलं तरी अटकच."

दलनीला राग आला. ती म्हणाली, "आपल्याच घरीं अटक झाली तरी तिथं मी होतें दलनी बेगम. इथं इंग्रजांच्या गलबतावर मी नुसती गुलाम. काय म्हणून त्यांनीं आम्हांला अटक करावी?"

कुलसुम म्हणाली, "मुंगेरला ज्याप्रमाणें हे–साहेबाला इंग्रजांच्या वतीनं ओलीस ठेवलं आहे, त्याचप्रमाणं मला वाटतं त्यांनीं आम्हांला ओलीस ठेवलंय. नबाबानं हे—साहेबाला सोडून दिलं तर ते आम्हांलाही सोडून देतील. हे–साहेबाला धोका पोंचला तरच आम्हांला धोका आहे. मग भ्यायचं कशाला?"

दलनीला अधिकच राग आला. ती म्हणाली, "मी तुझ्या हे—साहेबाला ओळखत नाहीं अन् तुझी इंग्रजांची स्तुतीही मला ऐकायला नकोय. मला वाटतं, तुला सोडून दिलं तरीसुद्धां तूं इथून जायची नाहींस."

कुलसुमला राग यायच्याऐवजीं उलट हंसूं आलें. ती म्हणाली, "मी नाहीं गेलें तर तुम्ही मला टाकून जाणार आहां का?"

दलनी अधिकच चिडून म्हणाली, "खरं सांग,—ॲमियेटसाहेबानं तुला दोनतीन वेळ कां बोलावून नेलं होतं?"

"मी खरं तेंच सांगितलं होतं तुम्हांला." कुल्सुम म्हणाली, "आमची सारी व्यवस्था ठीकठाक आहे कीं नाहीं तेंच तो विचारीत होता. इथं असेपर्यंत आमची कांहीं गैरसोय होऊं नये हीच साहेबाची इच्छा. ईश्वर करो अन् इथून आमची सुटका न होवो."

"ईश्वर करो आणि तुला एकदांचं मरण येवो!" दलनी रागारागानें म्हणाली.

कुलसम म्हणाली, "इंग्रजांनीं आम्हांला सोडलं तर पुन्हां आम्हांला नबाबाच्याहातीं पडावं लागेल. तो तुम्हांला क्षमा करील, पण माझी खात्री आहे, तो माझी गय करणार नाहीं. म्हणूनच मी म्हणतेंय, कीं दुसऱ्या कुठं आसरा मिळाला तर पुन्हां म्हणून नबाबाकडे जायचं नाहीं."

दलनीचा राग आतां ओसरला होता. ती गहिंवरून म्हणाली, "माझा आधार एकच—मरायचंच असलं तर मी नबाबाच्याच पायापाशीं मरेन."

इकडे ॲमियेट आपल्या शिपायांना तयारींत रहायला सांगत होता. आपली विशेषशी तयारी नसल्यामुळें गलबतें रेसिडेन्सीच्या जवळ नेऊन ठेवावीं असें जॉन्सननें ठरवलें. ॲमियेट म्हणाला, " आहेत तिथून होड्या हालवल्या तर मुसलमानांना वाटेल, कीं आम्हीं भिऊन पळालों. बसल्या जागीं मेलेलं पत्करेल पण घाबरून पळायचं नाहीं. अडचण आहे ती एकच, कीं फॉस्टर आजारी आहे. त्याला वाटेल तर रेसिडेन्सींत जायला सांगा. त्याच्या होडीवर असलेली बेगम आणि दुसरी एक स्त्री यांना दुसरीकडे न्या अन् त्यांच्याबरोबर एकदोन शिपाई द्या. "

शिपाई तयार झाल्यावर फॉस्टरची होडी गुपचुप हालवायचा प्रयत्न सुरू झाला. तें महंम्मद तकीच्या टेहेळ्यांनीं पाहिलें.

ती बातमी कळतांच महंम्मद तकीनें इंग्रजांना बोलावण्यासाठीं माणूस पाठवला. कांहीं कारणामुळें आपल्याला गलबत सोडून येतां येत नाहीं असें ॲमियेटसाहेबानें त्याला उत्तरीं कळवलें.

तो दूत होडीवरून उतरून थोडासा दूर येतांच त्यानें एक वायबार काढला. त्या वायबाराबरोबरच किनाऱ्यावरून दहाबारा बंदुकांचे आवाज आले. आपल्या होड्यांवर गोळीबार सुरू झाला आहे हें ॲमियेटला कळून चुकलें. होडीवरच्या इंग्रज शिपायांनीं लगेच उलट गोळीबार सुरू केला. पण ही सारी गोळागोळी आडून होत होती. किनाऱ्यावरचे मुसलमान घराआडून गोळीबार करीत होते, तर इंग्रजांचे शिपाई होडीच्या आंतून गोळीबार करीत होते. या असल्या लढाईत दारूगोळा खर्ची पडण्यापलीकडे फारसा फायदा नव्हता.

आतां आडोशाला असलेले मुसलमान हातांत बर्च्या तलवारी घेऊन ॲमियेटच्या होड्यांच्या रोखानें धांवले. इंग्रजांची जात बेडर. ॲमियेट, गल्स्टन आणि जॉन्सन हातीं बंदुक घेऊन होडीखालीं उतरले आणि अचुक गोळीबार करून एकेक मुसलमानाला खालीं पाडूं लागले.

तिकडे यवनांना सारखी कुमक येत होती. तुकड्यांमागून तुकड्या येऊन हल्ला करूं लागल्या होत्या तें पाहून ॲमियेट म्हणाला, " आतां बचावाची आशा दिसत नाहीं. शक्य तितक्या शत्रूंचा जीव घेऊन आपण आतां लढत-लढत मरूं या. "

तितक्यांत मुसलमान ॲमियेटच्या गलबतावर चढूं लागले होते. तिघेही इंग्रज एकवटून एका आवाजांत गोळ्या झाडून होडीवर चढणाऱ्या मुसलमानांना खालीं पाडीत होते. कांहीं मुसलमान होडीवर चढून गेले, तर कांहीं खालीं पहार लावून भोंक पाडीत होते. गलबताचा तळ फुटला आणि आंत पाणी शिरूं लागलें त्यावेळीं ॲमियेट आपल्या जोडीदारांना म्हणाला, "गुरांढोरांसारखं पाण्यांत बुडून मरायचं काय म्हणून ? चला बाहेर या, आपण वीरासारखे हातीं शस्त्र घेऊन मरूं."

हातीं तरवारी घेऊन ते तिघे बेडर इंग्रज असंख्य यवनांच्यासमोर येऊन उभे राहिले त्यावेळीं त्यांतला एक यवन ॲमियेटला सलाम करून म्हणाला, "उगीच कां मरतां ? माझ्याबरोबर चला."

ॲमियेट म्हणाला, "आज आम्हीं इथं मेलों तर भारतवर्षांत जी आग पेटेल त्यांत मुसलमानी राज्य जळून खाक होईल. आमच्या रक्तानं आज ही भूमि भिजली तर तिसऱ्या जॉर्जचा झेंडा या भूमींत सहज रोवतां येईल."

"तर मग मर आतां." असें म्हणून एका पठाणानें तरवारीच्या एका फटक्यासरशी ॲमियेटचें शीर धडावेगळें केलें. तें पहातांच गल्स्टननें चपळाई करून त्या पठाणाचें डोकेंही तिथल्या तिथें उडवलें.

दहाबारा मुसलमानांनीं गल्स्टनला घेरलें आणि ते त्याच्यावर वार करूं लागले. त्या धुमश्चक्रींत गल्स्टन आणि जॉन्सन दोघेही कामास आले.

त्यापूर्वीच फॉस्टरची होडी त्या तांड्यांतून निघून गेली होती.

● ●

## : २ :

♣ **रामचरणची** गोळी लागून लॉरेन्स फॉस्टर नदींत पडल्यावर प्रताप गलबतावरून उतरून गेला. त्यानंतर हत्याऱ्यांच्या गलबतावरचे खलाशी पाण्यांत उतरून फॉस्टर साहेबाचा तपास करूं लागले. त्याच गलबताच्या बाजूनें फॉस्टरचा देह वाहात जात होता तो गलबतावर उचलून घेऊन ॲमियेटला खबर देण्यासाठीं ते खलाशी निघून गेले होते.

ॲमियेट त्याच गलबतावर आला होता. फॉस्टर शुद्धीवर नसला तरी त्याचा

प्राण निघून गेला नव्हता, तरीपण तो जगेल कीं मरेल हें सांगतां आलें नसतें. ॲमियेट साहेबानें त्याची योग्यती शुश्रुषा केली होती.

फॉस्टरच्या नशिबाची दोरी बळकट होती—तो त्यांतून वांचला—मुर्शिदाबादला मुसलमानाच्या हातूनही वांचला—पण आतां तो दुबळा झाला होता. डोक्याला गोळी लागल्यामुळें त्याच्या मेंदूवरही परिणाम झाला होता.

कासीमबझार, फरासडांगा, सैदाबाद आणि रांगामाटी सोडून फॉस्टरनें गलबत जोरांत हांकारलें. त्याच्या मागोमाग एक छोटी होडी त्याच्या गलबताचा पाठलाग करीत येत होती. फॉस्टर घाबरून गेला. त्याला वाटलें गलबतांतून उतरून किनाऱ्यावर पळून जावें—पण किनाऱ्यावर गेल्यावर पळून जाण्याइतकें त्राण त्याच्या अंगांत नव्हतें. पुन्हा त्याला वाटलें, कीं पाण्यांत उडी घ्यावी—तर बुडून मरण्याची भीती होती.

त्याच्या मनांत एक दुर्बुद्धि आली. मुसलमान आपला पाठलाग करीत असतील तो त्या दोन बायांसाठीं. त्यांनाच सोडून द्यावें. दलनी होती नबाबाची बेगम, तिला उतरून टाकल्यावर अर्थातच मुसलमान आपला पाठलाग करायचें सोडून देतील असें त्याला वाटलें. तो दलनीला म्हणाला, "ती पाहिलीस होडी ? तुला सोडवून नेण्यासाठीं ते येताहेत."

दलिनी म्हणाली. "मग मला त्या होडींत सोडून द्या ना ! "

"तें शक्य नाहीं." फॉस्टर म्हणाला, "ते आमच्या गलबतावर आले तर मला मारून टाकतील. तुझं कुणी ऐकायचं नाहीं. तुमचे लोक बायकांचं सांगणं हिशेबांत धरीत नाहींत. "

दलनी उतावीळ झाली होती. ती होडी नबाबाचीच होती याची खात्री नव्हती, तरीही तिनें अविचारानें संकटांत उडी घेतली. ती फॉस्टरला म्हणाली, " तर मग मला किनाऱ्यावर सोडून द्या. "

फॉस्टरला तें पटलें. त्यानें गलबत किनाऱ्याला लावायचा हुकूम दिला. कुलसुम दलनीबरोबर जायला तयार नव्हती. तिला नबाबाची भीति वाटत होती. ती फॉस्टरला म्हणाली, "तुम्ही जर मला खालीं उतरून टाकलं तर त्या होडीवाल्यांना मी पुन्हा तुमचा पाठलाग करायला भाग पाडीन. "

कुलसुम उतरली नाहीं. दलनीनें मोठ्या कष्टानें तिचा निरोप घेतला. गलबत

पुन्हा चालू झालं तेव्हां सूर्योदय व्हायच्या बेताला झाला होता. फॉस्टरचें गलबत हळुहळु दृष्टीआड झालें. जी छोटी होडी पाठलाग करीत होती ती दलनी उतरलेल्या किनाऱ्याच्या पलिकडे जाऊं लागली असें पाहून तिनें आपला पदर उंच उडवून तिला खूण केली. तरीही ती होडी पुन्हा मागें फिरली नाहीं.

आतां दलनीचे डोळे उघडले. ती होडी नबाबाची आहे असें आपण कां ठरवलें? कदाचित ती दुसऱ्या कुणाची तरी असेल! दोन्ही होड्या निघून गेल्यामुळें दलनी हताश झाली.

फॉस्टरची होडी त्यावेळीं नजरेच्या टापूपलिकडे गेली होती, तरीही ती किनाऱ्या किनाऱ्यानें धांवत जाऊन होडी गांठायचा प्रयत्न करीत होती, पण ती होडी गांठायला ती समर्थ झाली नाहीं.

आतां काळोख पडला होता. कुठेंच कांहीं दिसत नव्हतें. नुसता वहात्या नदीच्या पाण्याचा आवाज तेवढा ऐकूं येत होता. ती उठून चालूं लागली, पण काळोखांत रस्ता दिसत नव्हता. मनुष्य वस्तीचा कुठें मागमूसही नव्हता.

रातकिडे किरकिरत होते. क्वचित कोल्हे कुत्रे ओरडत असल्याचा आवाज ऐकूं येत होता. रात्र वाढत जात होती, तसतसा काळोखही वाढत जात होता. दोन प्रहर रात्र उलटून गेली होती. दलनी जीव डोळ्यांत आणून पहाते तों तिला एक भव्य आकृतीचा पुरुष समोर दिसला. एक शब्दसुद्धां न बोलतां तो दलनीच्या बाजूला येऊन उभा राहिला.

शैवलिनीला डोंगरावरून उचलून ज्यानें नेलें होतें तोच तो महापुरुष होता.

• •

## : ३ :

**मुंगेरला** स्वरूपचंद जगतशेठ आणि मेहताबचंद जगतशेठ असे दोन भाऊ एका मोठ्या वाड्यांत रहात होते. रात्रीं त्या वाड्यांत हजारों दिवे पाजळले होते. संगमरवरी मंडपांत नाचत असलेल्या नर्तकींच्या अंगावरील दागिन्यांवर त्या दिव्याचा प्रकाश पडून ते जिकडे तिकडे झळझळत होते.

नाच सुरू होता, संगीत सुरू होतें पण शेठजींच्या अंतःकरणाला तें भिडत

नव्हतें. तिथें छाया पडली होती गुरगनखाँची. बंगालच्या राज्यांत युद्धाचा वणवा पेटला होता. कलकत्त्याचा हुकूम पोंचला नव्हता तरीही एलीस साहेबानें पाटणाच्या किल्ल्यावर हल्ला चढवला होता. पहिल्यानें त्यानें तो किल्ला ताब्यांत घेतला खरा, पण लगेच मुंगेरहून मुसलमानांचें सैन्य येऊन त्यांनीं पुन्हां किल्ला काबीज केला. पाटण्यांतले एलिसप्रभृती इंग्रज मुसलमानांचे कैदी झाले.

दोन्ही बाजूनें लढाईची तयारी सुरू होती. शेठजींबरोबर गुरगनखाँचें याच बाबतींत खलबत चाललें होतें. गाण्याबजावण्याचें नुसतें निमित्त होतें.

गुरगनखाँचा उद्देश सिद्ध झाला होता. दोन पक्षांत लढा सुरू झाल्यामुळें दोन्ही पक्ष दुबळे होतील, असें झाल्यावर दोघांनाही पराजित करून स्वतः बंगालचा मालक व्हायचें, असा त्याचा डाव होता. त्यासाठीं आधीं सर्व सैन्य आपल्या ताब्यांत आणून ठेवणें अवश्य होतें. त्याकामीं जरूरी होती पैशाची–आणि या धनकुबेराच्या मदतीशिवाय पैसा मिळणें शक्य नव्हतें. म्हणूनच ही बैठक होती.

इकडे कासिम अलीखाँ याला कळून चुकलें होतें, कीं ज्या बाजूला या धनकुबेर जोडीचा कांटा झुकेल तीच बाजू जय मिळवील. हे जगतशेठ पहिल्यापासून त्याला विरोधी होते. पूर्वी कासम अलीखाँनें संशयावरून त्यांना मुंगेरांत नजरबंद करून ठेवलें होतें. संधी आली कीं ते दोघेही प्रतिपक्षाला मिळतील अशी त्याला भीति वाटत होती. अजूनपर्यंत त्यांनीं मीरकासीमला प्रतिकूल होईल असें कोणतेंच वर्तन केलें नव्हतें, पण आतां दुसरा कोणताच मार्ग पुढें दिसत नाहीं असें पाहून ते गुरगनखाँला सामील झाले होते.

कांहींतरी कारण असल्याशिवाय गुरगनखाँनें जगतशेटजींची भेट घेणें संशयास्पद दिसलें असतें, म्हणून त्यांनीं या उत्सवाचें निमित्त पुढें करून गुरगनखाँ आणि इतर नबाबाचे अमात्य यांना निमंत्रण दिलें होतें. नबाबाची संमती घेऊनच गुरगनखाँ या समारंभाला हजर राहिला होता. इतर अमात्यांपासून दूर अंतरावर तो एकटाच बसला होता. जगतशेठ प्रत्येक अमात्याबरोबर कांहींवेळ बोलून जसे जात होते तसेच गुरगनखाँशीही बोलत होते. मात्र ते दुसऱ्याला ऐकूं जाऊं नये अशा आवाजांत बोलत होते. गुरगनखाँ म्हणत होता,

" आपल्या जोडीनं आम्ही एक वखार उघडायचा बेत केला आहे. आपण बखरादार व्हायची कबुली द्याल का ? "

मेहताबचंदनें विचारलें, " याचा मतलब ? "

" मुंगेरची मोठी वखार बंद करायची आहे म्हणून. "

शेठ म्हणाले, " असा कांहींतरी नवीन व्यवसाय सुरू केल्याशिवाय आम्हांला गत्यंतर नाहीं. हा प्रस्ताव आम्हांला कबूल आहे."

गुरगनखाँ म्हणाला, " हें कबूल असेल तर पैसा आपल्याला उभा करावा लागेल. शारीरिक परिश्रम आम्ही करूं."

" कबूल ! " शेठ म्हणाले, " आमचं व्याज मुद्दल शाबूत राहिलं म्हणजे झालं. त्यांत खूट येतां कामा नये. "

तिकडे बाईजी, हमीर, केदार, छायानट वगैरे राग छेडित होती, तर इकडे गुरगनखाँ आणि जगतशेठ नफानुकसान, व्याजमुद्दल, पैसारूका यांच्या गोष्टी बोलत होते.

पहिला प्रस्ताव निश्चित झाल्यावर गुरगनखाँ म्हणाला, " एक नवा व्यापारी वखार उघडतो आहे तें कळलं का तुम्हांला ? तो आहे देशी माणूस. मुंगेरपासून मुर्शिदाबादपर्यंत पहाड जंगल, शहरवस्ती जिथं जिथं आहे, तिथं तिथं वखारी उघडतो आहे. "

" चांगला पैसेवाला आहे का तो ? "

" तसा फारसा पैसेवाला दिसत नाहीं, पण कुणी सांगावं ?—मुंगेरच्या बड्या वखारीशीं त्याचा देण्याघेण्याचा व्यवहार आहे—"

" हिंदू कीं मुसलमान ? "

" तो आहे हिंदूच." गुरगनखाँ म्हणाला, " मुर्शिदाबादच्या आसपास कुठं तरी त्याचं घर आहे. त्याचं नांव आहे प्रताप राय. महा भयंकर माणूस आहे तो—"

" या भानगडींत तो कां पडला आहे ? " शेठजीनीं विचारलें.

" त्याचा राग आहे कलकत्त्याच्या बड्या वखारवाल्यावर. "

शेठजी म्हणाले, " तर मग त्याला हस्तगत केला पाहिजे !—त्याला काय हवं आहे ? "

गुरगनखाँ म्हणाला, " या कामीं तो कां प्रवृत्त झाला आहे तें निश्चित कळल्याशिवाय कांहीं सांगतां यायचं नाहीं. नुसत्या पैशाच्याच लोभानं जर त्यानं या कामाला हात घातला असेल तर त्याला पैशाच्या जोरावर विकत घ्यायला कितीवेळ लागणार आहे ? जमीन-जुमला त्याला हवा असेल तर तोही देतां येईल—पण त्याचा अंतस्थ हेतू आधीं कळला पाहिजे. "

" अंतस्थ हेतू तो दुसरा काय असणार ? " मेहताबशेठ म्हणाले, " हा प्रताप कसल्या जोरावर एवढा गबर झाला आहे ? "

त्याचवेळीं बाईजी गात होती, " गोरे गोरे मुखपर मन भावे—"

मेहताबशेठ म्हणाले, " म्हणजे काय ? कुणाचा गोरा मुखडा—"

● ●

## : ४ :

♣ **तो** महापुरुष एक शब्दही न बोलतां दलनीपाशीं येऊन बसला. रडत असलेली दलनी त्याला पाहून घाबरून एकदम गप्प झाली. दोघेंही मुकाट्यानें बसलीं होतीं.

इकडे हा प्रकार चाललेला असतांना तिकडे दलिनीवर आणखी एक संकट येऊं पहात होतें. महमद तकीला एक गुप्त हुकूम मिळाला होता, कीं इंग्रजांच्या गलबतावरून दलिनी बेगमला हस्तगत करून मुंगेरला पाठवून द्यावें. इंग्रज कैद झाले किंवा पराजित झाले तर बेगम सहजासहजीं हस्तगत होईल असें महमद तकीला वाटलें होतें आणि म्हणूनच त्यानें तिला ताब्यांत घेण्याचा कोणत्याही प्रकारचा हुकूम आपल्या अनुचरांना दिला नव्हता.

पुढें इंग्रजांचीं गलबतें ताब्यांत आलीं आणि बेगम त्या गलबतावर नाहीं असें दिसून आलें, तेव्हां महमद तकीला मोठा पेंच पडला. या ढिलाईमुळें नबाबाचा आपल्यावर रोष होईल ही खात्री असल्यामुळें त्यानें धाडस करून नबाबाच्या डोळ्यांत धूळ टाकायचा बेत योजला. लोकप्रवाद असा होता, कीं लढाई सुरू झाली तर इंग्रजलोक मीरजाफरला तुरुंगांतून सोडवून पुन्हां मसनदीवर बसवतील. मीरकासीमचा जय झाला तर त्याला झालेल्या गोष्टी मुळीं कळूंच द्यायच्या नाहींत असें करणें शक्य होतें, म्हणून महमदतकीनें नबाबाला लिहिलें,

कीं ॲमिएटच्या गलबतावर बेगम आपल्याला सांपडली आणि तिला आपण सन्मानपूर्वक किल्यांत ठेवून दिलें आहे. नबाबाचा विशेष हुकूम आल्याशिवाय तिला हुजूरकडे पाठवण्याचें तहकूब केलें आहे, कारण इंग्रजांचे खानसामे, नावाडी आणि शिपायी जे आपल्या हातीं लागले त्यांच्याकडून कळलें, कीं बेगम त्या गलबतावर ॲमिएटच्या रखेलीसारखी रहात होती. दोघांचीही एकशय्या होती. बेगमेनेंही स्वतः या गोष्टी कबूल करून आपण खिस्ति धर्म पत्करल्याचें सांगितलें. ती मुंगेरला जायला कबूल नाहीं. ॲमिएटपाशीं कलकत्त्याला रहावें अशी तिची इच्छा आहे. तिला जर कलकत्त्याला पाठवून दिलें नाहीं तर आपण पळून जाईन असें ती म्हणते आहे. मुंगेरला पाठवल्यास ती आत्महत्त्या करायची धमकी देते आहे. ही सर्व हकिकत निवेदन करून पुढें काय करावें याजबद्दल हुकूम व्हावा असें तकीनें पत्रांत लिहिलें होतें. तें पत्र घेऊन त्याच रात्रीं घोडेस्वार मुंगेरला गेला होता.

कुणीकुणी असें म्हणतात, कीं आपल्या नकळत दुसऱ्या कुठेंतरी आपल्या विरुद्ध अमंगल घटना घडत असली तर ती आपल्याला जाणवते. हें खरेंच आहे असें जरी म्हणतां येत नसलें, तरी ज्यावेळीं तो घोडेस्वार तें पत्र घेऊन निघाला त्याचवेळीं दलनीच्या अंगावर एकदम थरारून कांटा उभा राहिला. त्याचवेळीं तिच्या शेजारीं बसलेल्या त्या महापुरुषानें बोलायला सुरवात केली. तो म्हणाला, " मी तुला ओळखतों. तूं दलनी बेगम आहेस--" ती एकदम शहारली. तो पुढें म्हणाला, " या निर्जन स्थानांत त्या चांडाळानं तुला सोडून दिलंय तेंही मला कळलंय--" दलनीच्या डोळ्यांना पाझर सुटला. त्यानें तिला विचारलें, " आतां तुला कुठं जायचं आहे ? "

दलनीची भीती आतां नाहींशी झाली होती. ती म्हणाली, " कुठं जाऊं मी ? मला कुठंच आधार नाहीं—जायची जागा आहे एकच—पण ती फार दूर आहे. तिथवर मला कोण घेऊन जाईल ? "

महापुरुष म्हणाला, " नबाबाकडे जायचा उद्देश सोडून दे. त्यांत तुझं अकल्याण आहे."

दलनी शहारली आणि म्हणाली, " होऊं दे माझं अकल्याण. त्याच्याखेरीज मला दुसरा आधार नाहीं. दुसऱ्या कुठं जाऊन कल्याण होण्यापेक्षां नवऱ्याच्या पायापाशीं अकल्याण झालेलं मला पत्करेल."

" तर मग ऊठ. " तो म्हणाला, " मी तुला मुर्शिदाबादला महमदतकीकडे नेऊन पोंचवतों. तो तुला मुंगेरला नेऊन पोहचती करील. पण आधीं माझं सांगणं ऐक—लढाई सुरू झाली आहे. आपलीं सारीं माणसं रूहीदासच्या गडावर पाठवायचा नबाबानं बेत केला आहे. तूं तिकडे जाऊं नकोस. "

" माझ्या नशिबीं काय असेल तें होईल. " दलनी म्हणाली, " मी तिकडेच जाणार. "

" तुझ्या नशिबी मुंगेरचं दर्शन नाहीं ! " तो महापुरुष म्हणाला.

दलनीला पेंच पडला. ती म्हणाली, " पुढं काय होईल कोण जाणे ! चला, मी आपल्याबरोबर मुर्शिदाबादला येतें. कुडींत प्राण आहे तोंवर नबाबाच्या भेटीची आशा मी सोडणार नाहीं. "

" तें मला माहीत आहे ! " तो म्हणाला, " आतां चल माझ्याबरोबर. "

तीं दोघेंही त्या काळोख्या रात्रीं मुर्शिदाबादला जायला निघालीं.

जळत्या वातीवर दलनी बेगम पतंगासारखी झेप घेत होती.

★

# षष्ठ खंड

## : १ :

यापूर्वी जो इतिहास सांगितला गेला नाहीं तो आतां सांगणें अवश्य आहे. आतांपर्यंत ब्रह्मचारी म्हणून ज्याचा उल्लेख केला तो चंद्रशेखर होता. ज्या दिवशीं फॉस्टरला घेऊन ॲमिएट मुंगेरहून निघाला त्याच दिवशीं त्याच्याबरोबरच दलनीबेगम आहे याचा पत्ता रमानंदस्वामींना लागला होता. त्यांनीं गंगातीरीं जाऊन चंद्रशेखरची गांठ घेतली आणि त्याला ही हकिकत सांगून म्हटलें, " आतां तुला इथं राहायची जरूरी नाहीं. तूं आपल्या गांवीं जा. मी शैवलिनीला काशीक्षेत्रांत पाठवून देतों. परोपकाराचं जें व्रत तूं पत्करलं आहेस, त्याच कामाला आतां लाग. ती यवनकन्या धर्मिष्ठ आहे, सध्यां ती संकटांत आहे, तूं तिच्या मागोमाग जा आणि तिच्या मुक्ततेचा प्रयत्न कर. प्रतापदेखील तुझा नातलगच आहे. तुझ्यासाठींच तो संकटांत पडला आहे, त्यालाही अंतर देऊं नकोस. त्याच्याही मागोमाग जा. " नबाबाला ही बातमी कळवावी असें चंद्रशेखरनें म्हटलें तेव्हां रमानंदस्वामींनी निषेध करून त्याला सांगितलें, कीं ती बातमी आपणच नबाबापर्यंत पोंहचती करीन.

आपल्या गुरुचा आदेश मस्तकीं धारण करून चंद्रशेखर एक छोटीशी होडी घेऊन ॲमिएटचा पाठलाग करीत निघाला. शैवलिनीला काशीला पाठवून देण्यासाठीं रमानंदस्वामी योग्य शिष्याच्या शोधांत होते, तोंच त्यांना कळलें, कीं शैवलिनी एका होडींतून इंग्रजांच्या मागोमाग निघाली आहे. रमानंदस्वामींना मोठें संकट पडलें. ही पापिष्ठा कुणामागें जात होती ? फॉस्टरच्या कीं चंद्रशेखरच्या ?

त्याच मार्गानें जायचें त्यानीं ठरवलें. रमानंदस्वामी कुठेंही पायींच जात असत. किनाऱ्या किनाऱ्यानें ते शैवलिनीच्या मागोमाग निघाले. भुकेतहानेची त्याना पर्वा नसे. कांहीं न खातां पीतां ते प्रवास करीत गेले आणि त्यांनीं चंद्रशेखरला गांठलें. तो भेटतांच ते त्याला म्हणाले, "नवद्वीपच्या पंडितांची भेट घेण्यासाठीं वंगदेशांत जावं असं मनांत आलं आहे. चल मी तुझ्याबरोबर येतों." असें म्हणून ते चंद्रशेखरच्या होडींत बसले.

इंग्रजांचीं गलबतें समोर दिसतांच त्यानीं आपली छोटी होडी आडोशाला नेली. शैवलिनीची होडी देखील आडोशाला आलेली पहातांच ते किनाऱ्यावर लपून राहिले. प्रताप आणि शैवलिनी होडींतून उड्या टाकून पळून गेल्याचें त्यांनीं पाहिलें, त्यावेळीं होडींत बसून त्यांनीं त्यांच्या पाठोपाठ जायला सुरवात केली. त्या दोघांची होडी किनाऱ्याला लागली त्यावेळीं त्यानींही आपली होडी कांहीं अंतर ठेवून किनाऱ्याला लावली. रमानंदस्वामी चन्द्रशेखरला म्हणाले, "पोहत असतांना प्रताप आणि शैवलिनी एकमेकांशी बोलत होतीं. त्यांचं बोलणं तुला ऐकूं आलं का?"

चन्द्रशेखर 'नाहीं' म्हणाला तेव्हां ते म्हणाले, "तर मग आज रात्रीं जागा रहा, त्यांच्यावर नजर ठेव."

दोघेही जागत राहिले होते. रात्र संपायच्या सुमाराला शैवलिनी त्या होडींतून उतरून किनाऱ्यावरच्या झुडुपांत गेल्याचें त्यांनीं पाहिलें. पहांट झाली तरी ती बाहेर आली नाहीं. त्यावेळीं रमानंदस्वामी चन्द्रशेखरला म्हणाले, "हिचा बेत काय आहे तें कळत नाहीं. चल आपण तिच्या मागोमाग जाऊं."

दोघेही लपत-छपत शैवलिनीच्या मागोमाग निघाले होते. संध्याकाळीं आभाळ भरून आलें त्यावेळीं रमानंद स्वामीनीं चन्द्रशेखरला विचारलें, "कितीशी ताकद आहे तुझ्या बाहूंत?"

चन्द्रशेखर हंसला आणि त्यानें वाटेवरच असलेली एक मोठी शिळा अगदीं सहजासहजीं उचलून दूर फेंकून दिली.

"फार उत्तम!" स्वामी म्हणाले, "शैवलिनीच्या मागोमाग जा आणि आडोशाला उभा रहा. या वादळांत ती सांपडली आणि तिला मदत मिळाली नाहीं तर स्त्रीहत्या होईल. जवळच एक गुहा आहे, ती मी तुला दाखवतों. मी तुला सांगितलं, कीं शैवलिनीला उचलून घेऊन माझ्या मागोमाग ये."

"काळोख अगदीं मिट्ट पडला आहे, मला वाट कशी सांपडेल?" चंद्रशेखर म्हणाला.

"मी तुझ्याजवळपासच राहीन." स्वामी म्हणाले, "माझ्या हातच्या दंडाचें एक टोंक तूं हातीं घे. दुसरं टोंक माझ्या हातीं राहील."

शैवलिनीला गुहेंत ठेवून चंद्रशेखर बाहेर आला त्यावेळीं रमानंदस्वामी आपल्याशींच म्हणाले, "आजवर मी एवढ्या शास्त्रांचं अध्यायन केलं, सर्व प्रकारच्या माणसांची पारख केली, पण या बालिकेच्या अंतरंगाचा ठाव अजून मला लागला नाहीं. या समुद्राला तळच नाहीं का?"

ते चंद्रशेखरला म्हणाले, "या डोंगरांत एक मठ आहे तिथं जाऊन थोडा वेळ विश्रांति घेऊं. शैवलिनीसाठीं जें करायचं तें होऊन गेलं म्हणजे तूं पुन्हा त्या यवनीच्या मागोमाग जा. ध्यानांत ठेव, परोपकार हेंच तुझं व्रत—त्याखेरीज दुसरं कांहीं नाहीं. मी इथंच आहें—तूं शैवलिनीची काळजी करूं नकोस—पण मी सांगितल्याखेरीज शैवलिनीला भेटूं नकोस. माझ्या सांगण्याप्रमाणें चालशील तर शैवलिनीचं कल्याणच होईल."

चन्द्रशेखरनें त्यांचा निरोप घेतला. त्यानंतर रमानंदस्वामी कुणाला न दिसूं देतां त्या काळोखांतील गुहेंत गेले. त्यानंतर जें कांहीं घडलें तें यापूर्वीच सांगितलें गेलें आहे.

वेड्या झालेल्या शैवलिनीला घेऊन चन्द्रशेखर रमानंदस्वामींच्या मठांत आला आणि रडकुंडीला येऊन म्हणाला, "गुरुदेव, हें काय केलंत?"

रमानंदस्वामींनीं शैवलिनीची अवस्था नीट निरखून पाहून घेतली. ते म्हणाले, "छान झालं! कांहीं काळजी करूं नकोस. तूं एक दोन दिवस इथंच विश्रांती घे. नंतर हिला घेऊन आपल्या गांवीं जा. ज्या घरांत ही रहात होती. त्याच घरांत तिला ठेव. तिच्या पूर्वीच्या ज्या सखी सोबतिणी होत्या त्यांनाच सदोदित हिच्या जवळपास राहायला सांग. मधून मधून प्रतापलाही बोलावून घे. तितक्यांत मी मागाहून येतों."

गुरूच्या आज्ञेप्रमाणें चन्द्रशेखर शैवलिनीला घेऊन आपल्या घरीं गेला.

• •

: २ :

♣ **इंग्रजांबरोबर** लढाई सुरू झाली. मीरकासीमच्या अधःपाताला सुरवात झाली. काटवारच्या लढाईत मीरकासीम पहिल्यानेंच हरला. त्यानंतर गुरगनखाँचा विश्वासघात उघडकीस येऊं लागला आणि नबाबाचा त्याच्यावरचा विश्वास उडाला. याचवेळीं नबाबाच्या बुद्धींत विकृती निर्माण होऊं लागली. युद्धबंदी म्हणून ठेवलेल्या इंग्रजांचा जीव घेण्याचा विचार तो करूं लागला. इतर संबंधी लोकांशीही तो अहिताचरण करूं लागला.

याचवेळीं महमदतकीचें पत्र आलें, त्यांतच दलिनीची हकिकत होती. जळत्या आगींत तूप ओतलें गेलें. इंग्रजांनीं विश्वासघात केला—सेनापती अविश्वासू ठरला—आणि आतां दलनीही विश्वासघातक ठरली! सहनशक्तीची पराकाष्ठा झाली. मीर कासीमनें महमद तकीला लिहिलें—

‘ दलनीला इकडे पाठवायची जरूरी नाहीं. तिला तिकडेच विष घालून मारून टाक. ’

हातीं विषाचा पेला घेऊन महमद तकी दलनीपाशीं गेला. दलनीला आश्चर्य वाटलें. ती चिडून म्हणाली, “ हें काय खाँसाहेब? माझी अशी बेइज्जत कां करतां? ”

कपाळावर हात मारून महमद तकी म्हणाला, “ नशीब माझं! आपल्यावर नबाबाची नाराजी झाली आहे. नबाबाचा हा परवाना पहा. ”

त्यानें नबाबाच्या सही-शिक्याचा परवाना दलनीला दाखवला. तो वाचल्यावर तिनें हंसून फेंकून दिला आणि म्हटलें, “ हा बनावट आहे. माझ्याबरोबर ही अशी प्रतारणा कां म्हणून? एवढ्यासाठीं मी काय म्हणून जीव देऊं? ”

महमदतकी म्हणाला, “ आपण घाबरूं नका. मी आपला बचाव करीन. ”

“ असं का? ” दलनी म्हणाली, “ यांत तुमचा मतलब आहे तर! बनावट परवाना दाखवून मला बनवीत होतां वाटतं? ”

“ तर मग ऐका,” तो म्हणाला, “ अॅमिएटच्या गलबतावर तुम्ही त्याची रखेली म्हणून राहातां आहां असं मी नबाबाला लिहिलं होतं म्हणून हा हुकूम आला. ”

दलनीच्या कपाळाला आठ्या पडल्या. महमद तकीही बावरल्यासारखा झाला. असें कां लिहिलें म्हणून दलनीला विचारलें तेव्हां त्यानें आद्योपान्त सारी हकिकत त्याला सांगितली. दलनीनें नबाबाचा परवाना पुन्हां एकदा मागून घेऊन पाहिला आणि म्हटलं, " कुठं आहे विष? आणा पाहूं."

" म्हणजे ! " तकी म्हणाला, " आपण विषपान करणार कीं काय ? "

दलनी म्हणाली, " माझ्या राजाचा हुकूम मी कां पाळूं नये ? "

तिचें तें उत्तर महमदतकीच्या मर्माला भेदून गेलें. तो म्हणाला, " जें झालं तें झालं. मी याला कांहीं तरी उपाय करतों. "

दलनीच्या डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या उडूं लागल्या. नागिणीसारखी फणा उभारून ती म्हणाली, " तुझ्यासारख्या पाप्याच्या हातून प्राणदान घेणारा तो तुझ्यापेक्षांही अधम ! आण—विष आण. "

महमदतकी तिच्याकडे सारखा पहात राहिला होता. तिच्या सौंदर्याला तो भाळून गेला होता. तो म्हणाला, " ऐक सुंदरी—माझी हो—मग नको विष घ्यायला. "

ते शब्द ऐकतांच दलनीनें त्याला लाथ मारली. विष देणें राहून गेलें. फटका मिळालेल्या कुत्र्यासारखा तो तिथून निघून गेला.

दलनी धरणीवर अंग टाकून रडूं लागली. नबाबाची आठवण करकरून ती आसवें गाळीत होती. तिच्या दिमतीस दिलेल्या करिमन नांवाच्या दासीला बोलावून घेऊन तिनें आपल्या अंगावरचे दागिने तिच्या हातीं दिले आणि म्हटलें, " हकिमाकडे जा, त्याला हे दागिने दे आणि असं झोपेचं औषध आणून दे कीं त्यांतून पुन्हां जागं होऊं नये. बाकीचे दागिने तूं घे. "

ती दासी पहिल्यानें कांहीं केल्या कबूल होईना, पण दलनीनें हट्ट धरल्या-मुळें म्हणा, कीं दागिन्यांच्या लोभानें म्हणा, शेवटीं ती कबूल झाली.

हकिमानें विष दिलें. ती बातमी एका हेरानें जाऊन महमद तकीला सांगितली. महमद तकी येऊन पहातो तों दलनी निश्चेष्ट होऊन पडली होती. विषाचा पेला शेजारीं पडला होता. तो पाहून महमद तकीनें विचारलें, " हें काय आहे ! "

दलनी थोडीशी शुद्धीवर होती. ती म्हणाली, " हें विष आहे. मी तुझ्यासारखी

निमकहराम नाहीं. माझ्या प्रभूची आज्ञा मी पाळली आहे. तुझ्यांत कांहीं सचाई असेल तर त्यांत उरलेलं विष पिऊन तूंही माझ्या मागोमाग ये."

महमद तकी तटस्थ होऊन उभा राहिला होता. दलनीनें हलुहलु डोळे मिटले. सारा अंधार झाला.

दलनी निघून गेली.

• •

## : ३ :

♣ मीर कासीमचें सैन्य काटवारच्या रणक्षेत्रावरून पराभूत होऊन मागें हटलें होतें. इंग्रजांच्या सैन्यानें त्यांचा धुव्वा उडवला होता. शिल्लक राहिलेलें सैन्य उदयनाल्याला आलें आणि तिथें चारी बाजूला खंदक खणून त्यानें इंग्रजांची चढाई थोपवण्याचा प्रयत्न केला.

मीर कासीम स्वतः तिथें हजर होता. अमीर हुसेननें येऊन त्याला सांगितलें, कीं कुणितरी एक कैदी त्याच्या भेटीसाठीं उत्सुक झाला आहे. त्याला कांहींतरी विशेष सांगायचें आहे. ती एक बाई आहे. ती कलकत्त्याहून वॉरन हेस्टिंग्जचें पत्र घेऊन आली आहे. वास्तविक ती कैदी नाहीं. लढाईच्या पूर्वींच लिहिलेलें तें पत्र असल्यामुळें मी तें ताब्यांत घेतलें. ही माझी चूक झाली असेल तर खाविंदानीं मला शिक्षा करावी. असें म्हणून त्यानें तें पत्र नबाबाला वाचून दाखवलें.

तें पत्र वॉरन हेस्टिंग्जनें लिहिलें होतें—

'ही स्त्री माझ्या ओळखीची नाहीं. काकुळतीला येऊन ती माझ्यापाशीं आली आणि तिनें आपल्याला नबाबाकडे पाठवून द्यावें अशी विनंती केली. आपल्याशीं आमची लढाई सुरू होण्याचा संभव दिसत आहे, पण आम्हीं लोक स्त्रियांच्या बाबतींत शत्रु-मित्र पहात नाहीं. म्हणून मी तिला आपल्याकडे पाठवीत आहें.'

नबाबानें त्या बाईला आणून आपल्यासमोर हजर करायला सांगितलें. ती कुलसुम होती. तिला पाहातांच नबाब चिडला आणि म्हणाला, "तुला काय हवं ग सटवे? मरायचं आहे?"

कुलसुम काकुळतीला येऊन म्हणाली, " आपली बेगम कुठं आहे खाविंद ? दलनीबिबि कुठं आहे ? "

नबाब म्हणाला, " ती चांडाळीण आतां जिथं गेली तिथंच तूंही जाशील ! "

" मग तें खरं तर ! " कुलसुम म्हणाली, " दलनी बेगमनें आत्महत्या केली असं मला कुणी सांगितलं. "

" आत्महत्या ! " नबाब उद्गारला, " राजाच्या हुकुमानं ती मेली आहे. तिच्या दुष्कर्मांत तूं मदतगार होतीस. तुलाही कुत्र्याकडून फाडून खायला लावतों— "

कुलसुम धरणीवर अंग टाकून किंचाळ्या फोडूं लागली. ती तोंडाला येईल तें बोलत होती. नबाबाला शिव्यागाळी करीत होती. तिचा आरडा ओरडा ऐकून सारे उमराव, सैनिक, नोकर चाकर धांवून आले. एकानें तिचे केंस पकडले तेव्हां नबाबानें त्याला हटायला सांगितलें.

कुलसुम बोलत होती, " तुम्हीं सारे लोक इथं आलां आहां तें बरं झालं. मी एक अजब कहाणी सांगणार आहें तुम्हांला. आतां मला मृत्यूची शिक्षा सांगतील अन् मग ती कहाणी कुणाला ऐकायला मिळायची नाहीं—आतां ऐका सर्व लोक हो—सुभे बंगाल बिहारचा मीर कासीम नांवाचा एक मूर्ख नबाब आहे. दलनी नांवाची त्याची एक बेगम होती. सेनापती गुरगनखाँची ती बहीण— "

सारे थक्क होऊन ऐकत होते.

कुलसुम बोलत होती, "—गुरगनखाँ आणि दौलतउन्निसा स्वतःचा बचाव करण्यासाठीं इस्फाहानमधून बंगाल्यांत आलीं. दलनीनं मीरकासीमच्या घरांत बांदी म्हणून प्रवेश केला— " असें म्हणून तिनें त्या रात्रीं गुरगनखाँ आणि दलनी या दोघांचें जें भाषण ऐकलें होतें तें सांगितलें. त्यानंतर घडलेली सर्व हकिकत तपशिलवार सांगून ती म्हणाली, "—त्यावेळीं कुठला सैतान माझ्या मानगुटीवर बसला होता कोण जाणे! नाहींतर मी बेगमला सोडून कां राहिलें असतें ? मला वाटलं, नबाबाची होडी मागून येत होती त्यांतलीं माणसं दलनीला सोडवतील. मी घाबरून मागं राहिलें अन् त्याचं बक्षीस मला मिळालं. फॉस्टर साहेब मला कलकत्त्याला घेऊन

गेला. मी विनवणी केली तरी त्यानं मला गलबतावरून उतरलं नाहीं. कुणीच मला कलकत्त्यांत मदत करीना. शेवटीं मी हेस्टिंग्जसाहेबांना गांठलं. ते मोठे दयाळु—त्यांच्या कृपेनं मी इथं येऊन पोंहचलें. आतां मला जगायची इच्छा नाहीं. माझा जीव घ्यायची तयारी करा—" असें म्हणून ती रडूं लागली.

बंगालचा तो प्रतापी नबाब लाजेनें काळवंडून मान खालीं घालून बसला होता. त्यानें हिरा फेंकून कांच हातीं घेतली होती. कुलसुम म्हणाली तेंच खरं—बंगालचा नबाबच महामूर्ख !

नबाब आपल्या उमरावांना उद्देशून म्हणाला, " आतां तुम्हीच ऐका. ही बांदी बोलते आहे तें खरं आहे—बंगालचा नबाब मूर्ख आहे ! तुमच्या अंगीं ताकद असली तर या सुभ्याचं रक्षण करा. मी चाललों. मी कुठं तरी तोंड लपवून राहीन किंवा फकीर तरी होईन ! " बोलत असतांना तो थरथर कांपत होता. त्याच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा लागल्या होत्या. तो म्हणाला, " ऐका दोस्त हो, सिराज उद्दौल्या प्रमाणेंच इंग्रजांनीं जर माझा जीव घेतला तर तुमच्यापाशीं माझं एकच मागणं—दलनीच्या कबरेच्या शेजारींच माझी कबर द्या. आतां माझ्यानं बोलवत नाहीं. तुम्ही जा सारे. इब्राहीमखाँ, त्या तकीखाँला माझ्यापाशीं घेऊन या. "

नबाबाला सलाम करून इब्राहीमखाँ घोड्यावर स्वार होऊन निघाला.

नबाब अमीर हुसेनला म्हणाला, " त्या फॉस्टरला कुणी आणील कां पकडून ? आणि ती शैवलिनी कोण ? तिला कोण घेऊन येईल का इथं ? मुंगेरला बेगमेला ज्यानं आश्रय दिला त्या ब्रह्मचाऱ्याला देखील शोधून काढून कुणी आणील का ? "

महमद इरफान म्हणाला, " ही कामगिरी मी पत्करतों. गुरगनखाँ कुठपर्यंत पोंहचला आहे ? "

एक उमराव म्हणाला, " फौज घेऊन तो उदय नाल्याला येतो आहे असं ऐकलेय, पण अजून येऊन पोंहचला नाहीं. "

नबाब आपल्याशींच पुटपुटत होता, " फौज ! फौज ! कुणाची फौज ! "

कुणितरी हलुच म्हटलं, " आपली ! "

साऱ्या उमरावांनीं निरोप घेतला आणि ते निघून गेले. नबाब सिंहासनाखालीं उतरला. झिऱ्यामाणकांनीं खचलेला माथ्यावरचा मंदील त्यानें दूर फेंकून

दिला. गळ्यांतले मोत्यांचे कंठे त्यानें तोडून टाकले. अंगावरचा भरजरी पोषाख काढून फेंकून देऊन धरणीवर अंग टाकून तो ' दलनी, दलनी,' म्हणत टाहो फोडून रडूं लागला.

या जगांतली नबाबी ही अशीच !

• •

## : ४ :

♣ **कुलसुम** ज्यावेळीं वॉरन हेस्टिंग्जला भेटली त्यावेळीं तिनें आपली हकिकत सांगतांना फॉस्टरनें केलेले अत्याचार तिच्या तोंडून सहजच त्याच्या कानीं गेले. इतिहासांत वॉरन हेस्टिंग्ज हा छलक म्हणून प्रसिद्ध आहे— कर्मनिष्ठ लोक कर्तव्याच्या जाणिवेनें वेळीं प्रसंगीं कोणाचा छळ करायला प्रवृत्त होतात म्हणून ते निर्दयच आहेत असें म्हणतां येणार नाहीं. स्वभावतः वॉरन हेस्टिंग्ज हा मोठा दयाळु आणि न्यायनिष्ठ होता. तसा तो नसता तर राज्य स्थापनेचें कार्य त्याच्याकरवीं पार पडलें नसतें.

या कथानकाच्या कालांत तो गव्हर्नर झाला नव्हता. कुलसुमला निरोप दिल्यावर त्यानें फॉस्टरचा तपास सुरू केला. त्यावेळीं फॉस्टर आजारी होता. त्याला अवश्य तो औषधोपचार करून बरा केल्यावर वॉरन हेस्टिंग्जनें आपल्यासमोर बोलावून घेऊन तपास करायला सुरवात केली. फॉस्टरनें आपले अपराध कबूल केले तेव्हां वॉरन हेस्टिंग्जनें कौन्सिलसमोर प्रस्ताव करून त्याला नोकरीवरून दूर केलें. फॉस्टरला न्यायासनासमोर उभा करावा अशीच हेस्टिंग्जची इच्छा होती, पण अवश्य तो साक्षी पुरावा मिळण्याचा संभव नसल्यामुळें तो विचार त्याला सोडून द्यावा लागला.

फॉस्टरला वाटलें, कीं क्षुल्लक अपराधासाठीं आपल्याला फार मोठी शिक्षा करण्यांत आली. आपल्या पूर्वीच्या मालकावर सूड उगवायचा त्यानें निश्चय केला. डाईस् संबर नांवाचा एक स्वीस किंवा जर्मन मीर कासीमच्या सैन्यांत सैनिक होता. त्याला त्यावेळीं ' समरू ' या नांवानें सारे ओळखत असत. तो समरू त्यावेळीं सैन्याबरोबर उदय नाल्याला छावणींत होता. फॉस्टरनें तेथें जाऊन त्याची भेट घेतली. आपलें खरें नांव न सांगतां आपण जॉन स्टॉलकार्ट

नांवाचा शिपाई आहें असें सांगून त्यानें समरूच्या छावणींत प्रवेश केला. अमीर हुसेन फॉस्टरच्या तपासासाठीं निघाला होता त्यावेळीं फॉस्टर समरूच्या छावणींत होता.

एकजण इंग्रज येऊन मुसलमानांच्या सैन्यांत राहिला आहे असें कळलें तेव्हां अमीर हुसेन समरूच्या छावणींत आला. त्यावेळीं समरू आणि फॉस्टर बोलत बसले होते. समरूनें जॉन स्टालकार्ट म्हणूनच त्याचा परिचय करून दिला तेव्हां अमीर हुसेननें त्याला विचारलें, "लॉरेन्स फॉस्टर नांवाच्या इंग्रजाला तुम्ही ओळखतां का?"

फॉस्टरचा चेहरा गोरामोरा झाला. तो मान खालीं घालून आवाज बदलून म्हणाला, "लॉरेन्स फॉस्टर? कुणी नाहीं या नांवाचा."

"पण हें नांव ऐकलंय का तुम्ही?" अमीर हुसेननें विचारलें.

"काय म्हटलंत?" फॉस्टर थोडा वेळ थांबून म्हणाला, "लॉरेन्स फॉस्टर होय? हां—खरंच!—नाहीं."

यावर अमीर हुसेन कांहीं बोलला नाहीं. त्यानें इतर विषयांवर बातचीत करायला सुरवात केली. जॉन स्टालकार्ट अस्वस्थ झाला आहे हें त्याच्या ध्यानी आलें. एक दोन वेळ त्यानें निघून जायचा प्रयत्न केला तेव्हां अमीर हुसेननें त्याला बसवून घेतलें. त्याला फॉस्टरची माहिती असावी, पण तो ती सांगूं इच्छित नाहीं अशी अमीर हुसेनला शंका आली.

थोड्या वेळानें फॉस्टरनें आपली टोपी उचलून डोक्यावर ठेवली. असें करणें इंग्रजांच्या शिष्टाचाराविरुद्ध आहे हें अमीर हुसेनला माहीत होतें. तो टोपी डोक्यावर ठेवीत असतांना त्याच्या डोक्यावरच्या केंस काढलेल्या जखमेकडे अमीर हुसेनची नजर गेली. ती जखम झांकण्यासाठींच का त्यानें टोपी माथ्यावर ठेवली?

अमीर हुसेन निघून आपल्या छावणींत आला आणि कुलसुमला बरोबर घेऊन पुन्हा समरूच्या तंबूत उपस्थित झाला. कुलसुम तंबूबाहेरच राहिली होती. तोंपर्यंत फॉस्टर तंबूतच होता. अमीर हुसेन समरूला म्हणाला, "एक बांदी तुम्हाला सलाम करायला आली आहे. तिचं कांहीं जरूरीचं काम आहे. तिला बोलावूं का आंत?"

समरूनें संमति दिली.

फॉस्टरची घाबरगुंडी उडाली. तो उठून जायला निघाला तेव्हां अमीर हुसेननें त्याचा हात धरून त्याला खालीं बसवलें. त्यानें कुलसुमला हांक मारली. ती आंत येतांच फॉस्टरला पहातांच चकित होऊन उभी राहिली. अमीर हुसेननें तिला विचारलें, "कोण हा ?"

कुलसुम म्हणाली, "लॅरेन्स फॉस्टर !"

अमीर हुसेननं फॉस्टरचा हात धरला तेव्हां तो म्हणाला, "काय केलंय मी ?"

अमीर हुसेननें त्याच्या प्रश्नाला उत्तर दिलें नाहीं. तो समरूला म्हणाला, "समरूसाहेब, या माणसाला गिरफदार करण्याचा नबाब साहेबांचा हुकूम आहे. बरोबर शिपाई देऊन याला माझ्याबरोबर द्या."

आश्चर्यचकित होऊन समरूनें विचारलें, "हा काय प्रकार आहे ?"

"तें मागाहून सांगेन." असें म्हणून अमीर हुसेन फॉस्टरला काढण्या लावून बांधून घेऊन गेला.

• •

## : ५ :

♣ **शैवलिनीला** घेऊन चंद्रशेखर एकदांचा आपल्या गांवीं आला. बऱ्याच कालावधीनंतर त्यानें आपल्या घरांत प्रवेश केला. त्याला आपल्या घराचें जंगल झालेलें दिसून आलें. बहुतेक दारें खिडक्या कोसळायला आल्या होत्या. त्यांचीं झडपें चोरांनीं काढून नेलीं होतीं. घर उघडें पडलें होतें. आंत होतें नव्हतें तें सामान कुणीतरी लांबवलें होतें. पावसाळ्यांत पावसाचें पाणी घरांत येऊन कुठें सडलें होतें, तर कुठें शेवाळ धरलें होतें. उंदीर घुशी आणि झुरळें याच्याप्रमाणेंच साप किरडवांनींही घराचा ताबा घेतला होता.

शैवलिनीचा हात धरून घरांत प्रवेश करतांना चंद्रशेखरनें एक मोठा सुस्कारा सोडला. आपलीं बहुमोल पुस्तकें ज्या जागीं त्यानें जाळलीं होतीं ती जागा क्षणभर पाहून घेतल्यावर त्यानें शैवलिनीला हांक मारली. तिनें 'ओ' दिली नाहीं. तो बोलत होता पण त्याच्या प्रश्नाला उत्तर न देतां डोळे

तारवटून ती चोहींकडे नुसती पहात होती—फिदीफिदी हंसत होती—कांहीं कांहीं जागांकडे नुसतीं बोटें दाखवीत होती.

चंद्रशेखर शैवलिनीला घेऊन आल्याची बातमी गांवांत पसरली त्यावेळीं बरींच माणसें त्यांना भेटायला आलीं. सर्वांत आधीं आली ती सुंदरी. शैवलिनी वेडी झाल्याचें तिला माहित नव्हतें.

सुंदरीनें आल्याबरोबर चंद्रशेखरला प्रणाम केला. चंद्रशेखर वैराग्याच्या वेषांत होता. तिला आश्चर्य वाटलें तें शैवलिनीचें. शैवलिनीनें माथ्यावर पदर ओढला नव्हता. तिला पाहून ती बाजूला सरलीही नव्हती. इंग्रजांच्या संसर्गानें ती या नव्या चालीरिती शिकली असावी अशी कल्पना करून सुंदरीनें हंसत हंसत विचारलें, " ओळखलंस का मला ? "

" ओळखलं तर ! " शैवलिनी म्हणाली, " तूं पार्वती ! "

" चार दिवसांत मला विसरलीस ? " सुंदरी म्हणाली, " काय म्हणावं तुला ? "

" मी कशी विसरेन तुला ? " शैवलिनी म्हणाली, " तूं माझ्या सैंपाकाला शिवलीस त्यावेळीं मी मारलं नव्हतं का तुला ? हें काय झालं ग पार्वती ? कुणितरी होतं, पण तें आतां नाहीं—कुणितरी येणार म्हटलं, पण आलं नाहीं—मी कुठं जाणार होतें, तिथं आलें नाहीं—कुणाला तरी शोधीत होतें, पण त्याची ओळख पटली नाहीं—"

सुंदरी बावरली. तेव्हां चंद्रशेखरनें हळुच तिच्या कानांत सांगितलें, " वेडी झाली आहे ती ! "

तें ऐकतांच सुंदरी क्षणभर तटस्थ राहिली. हळुहळु तिच्या डोळ्यांवाटे आसवें पाझरूं लागली. तिला एकदम रडें कोसळलें. स्त्रीजात म्हणजे या जगांतलें रत्न ! एक दिवस हीच सुंदरी म्हणाली होती, कीं होडीसकट शैवलिनी बुडून मरूं दे—तीच सुंदरी आज शैवलिनीची अवस्था पाहून कुणाहीपेक्षां दुःखी झाली होती.

सुंदरी शैवलिनीजवळ बसून हळुहळु गोष्टी करूं लागली. पूर्वीच्या गोष्टी बोलून पहूं लागली. तिला कांहीं आठवत नव्हतें. तिची आठवणच नाहींशी झाली म्हणावें तर पार्वतीचें नांव ती कशी घेत होती ? सुंदरी तिला आठवत होती, पण तिची ओळख मात्र पटत नव्हती.

सुंदरीनें पहिल्यानें चंद्रशेखरला आपल्या घरीं नेऊन खाऊं जेऊं घातलें. नंतर तिनें तें कोसळलेलें घर पुन्हा सजवायला सुरवात केली. तितक्यांत शेजाऱ्याच्या बायकाही मदतीला आल्या. घर पुन्हा सजवलें जाऊं लागलें.

तिकडे प्रताप मुंगेरहून परत आला होता. बरोबरच्या लाठीवाल्यांची योग्य जागीं रहाण्याची व्यवस्था करून तो आपल्या घरीं आला. तिथें आल्यावर चन्द्रशेखर आपल्या गांवीं आल्याचें त्याला कळलें. तो तसाच वेदग्रामांत आला.

त्याच दिवशीं रमानंदस्वामी तिथें आले होते. त्यांच्या उपदेशानुसार चन्द्रशेखर शैवलिनीवर औषधप्रयोग करणार आहेत हें कळल्यावर सुन्दरीला फार आनंद झाला. शुभ दिवस पाहून या प्रयोगाची सुरवात करायचें ठरलें.

● ●

## : ६ :

♣ तें औषध काय होतें तें कुणाला सांगतां आलें नसतें, पण तें द्यायच्या दिवशीं चन्द्रशेखरनें शुचिर्भूत होऊन व्रतस्थ राहून उपास केला होता. ठरलेल्यावेळीं औषधाच्या प्रयोगाला सुरवात करण्यापूर्वी शैवलिनीसाठीं त्यानें बिछाना तयार करून घेतला. सुंदरीनें शैवलिनीला धरून बांधून त्या बिछान्यावर निजवलें. त्यानंतर चन्द्रशेखरनें सुंदरीला बाहेर जायला सांगितलें.

सुंदरी नुसती पुटपुट गात होती. तें औषध म्हणजे रमानंदस्वामींनीं दिलेलें कमंडलूंतलें पाणी होतें. त्यानें तें तिला पाजलें आणि तो तिच्या कपाळावर डोळ्यांवर वक्रगतीनें हात फिरवूं लागला. थोड्या वेळांत शैवलिनीनें डोळे मिटले. ती गाढ झोंपी गेल्यासारखी दिसली. नंतर त्यानें तिला प्रश्न करायला सुरवात केली. त्या प्रश्नांतून तिच्या तोंडून पूर्वीची सर्व हकीकत निघाल्यानंतर चन्द्रशेखरनें महत्त्वाचे प्रश्न विचारायला सुरवात केली. त्या उत्तरांचा सारांश साधारणपणें असा होता:—

"मी फॉस्टरच्याबरोबर गेलें ती प्रतापसाठीं. प्रताप माझा जार नव्हता. एका देंठावरची आम्ही दोन फुलं—पण आम्हाला वेगळं केलं. पुरंदरपूरला गेलें तर प्रताप भेटेल या आशेनं मी फॉस्टरच्या होडीवर राहिलें. मनानं मी प्रतापला आत्मसमर्पण केलें होतें. नाहींतर मी पूर्णपणें सतीसाध्वी आहें. मी फॉस्टरकडचं

अन्न घेतलें नाहीं, त्याच्या पाण्याला शिवलें नाहीं—एका गलबतांत राहिलें होतें मात्र—मग मी जातिभ्रष्ट कशी ? ती हकीकत मी कुणालाच सांगितली नाहीं; कारण माझ्यावर कुणीच विश्वास ठेवला नसता. आतां मला आरोग्य मिळालं तर—असं वाटतं विष खाऊन मरावं, पण नरकाचं भय वाटतं. आपण मला आपल्या घरांत स्थान दिलंत तर मी सर्वस्वी आपली सेवा करून राहीन—पण लोक आपल्याला कलंक लावतील—"

नंतर ती म्हणाली, "घोड्यांच्या टापांचा शब्द ऐकूं येतो आहे. नबाबाचा सैनिक महमद इरफान मला नबाबाकडे घेऊन जायला येतो आहे—"

ती गाढ झोंपी गेली होती. चंद्रशेखरनें सर्वांना बोलावून घेतलें आणि सांगितलें, "ही झोंपी गेली आहे. ही जागी झाली कीं तिला या भांड्यांतलें औषध द्या. नबाबाचा सैनिक येईल त्याच्याबरोबर हिला पाठवून द्या—तुम्हीही बरोबर जा."

दुसऱ्या दिवशीं महमद इरफान आला. चंद्रशेखरनें झालेला सर्व वृत्तांत रमानंदस्वामींना सांगितला त्यावेळीं ते म्हणाले, "उद्यां आपणा दोघांनाही नबाबाच्या दरबारीं हजर राहिलं पाहिजे."

• •

## : ७ :

♣ एका मोठ्या तंबूंत बंगालचा शेवटचा राजा दरबारी थाटांत बसला होता. त्याचे सारे अमीर उमराव आणि नोकर तिथें हजर होते. पकडून आणलेले लोक हजर आहेत असें महमद इरफाननें सांगितलें तेव्हां पहिल्यानें लॉरेन्स फॉस्टरला आणून नबाबासमोर उभें केलें.

लॉरेन्स जिवावर उदार झाला होता. आजवर इंग्रजांच्या नांवाला काळिमा लावला, यापुढें इंग्रजांप्रमाणें बेडर वृत्तीनें मरावें असें त्यानें ठरवलें होतें.

नबाबानें विचारलें, "इंग्रज आमचे दुष्मन—दुष्मन असतांना तूं आमच्या छावणींत कां आलास ?" या प्रश्नाचें उत्तर द्यायचें त्यानें साफ नाकारलें तेव्हा नबाब त्याला म्हणाला, "इंग्रजांची बात बेडर आहे तें मला माहित आहे, पण माझ्यासमोर खोटं बोलूं नकोस—"

नबाबानें चन्द्रशेखरला बोलावून आणून त्याची ओळख आहे कीं काय असें विचारलें तेव्हां फॉस्टरनें नकार दिला. कुलसुमला त्यानें ओळखलें. नंतर महमद तकीला काढण्या बांधून समोर आणण्यांत आलें. तो आल्यावर त्याच्याकडे न पाहातां नबाबानें कुलसुमला विचारलें, " तूं मुंगेरहून कलकत्त्याला जाईपर्यंतचा इतिहास सांग. "

तो सर्व इतिहास सांगून कुलसुम म्हणाली, " हा महमद तकीखाँ बेइमान पाजी आहे. बेगमेवर यानें खोटा आरोप केला आणि त्यापायीं निष्कारण तिची हत्या झाली.— "

" याला साक्षीदार कोण ? " तकी म्हणाला.

कुलसुम भयंकर उखडून म्हणाली, " माझा साक्षीदार एक तो जगदीश्वर. माझा साक्षीदार तूं स्वतः ! आपल्या हृदयावर हात ठेवून खरं बोल !—हवं असेल तर या फिरंग्याला विचार. "

नबाबानें फॉस्टरला विचारलें तेव्हां तो म्हणाला, " दलनी निर्दोष होती. सतीसाध्वी होती. "

तकीनें मान खालीं घातली. त्यावेळीं चंद्रशेखर पुढें झाला आणि म्हणाला, " धर्मावतार, या दासीनं सांगितलं तें अक्षरशः खरं आहे. मी त्याला साक्ष आहें. मीच तो ब्रह्मचारी !—जहाँपन्हा, या फिरंग्याला मला एक दोन प्रश्न विचारायचे आहेत—"

फॉस्टर म्हणाला, " खुशाल विचारा. मी त्याचं उत्तर देईन किंवा देणारही नाहीं."

चंद्रशेखरच्या सांगण्याप्रमाणें शैवलिनीला समोर हजर करण्यांत आलें. फॉस्टरनें तिला ओळखल्याचें कबूल केलें. तेव्हां नबाब म्हणाला, " तूं हिला कसं ओळखलंस ? "

फास्टर म्हणाला, " मला वाटेल ती शिक्षा करा—मी या प्रश्नाचं उत्तर देणार नाहीं."

नबाब म्हणाला, " आमची पद्धत अशी आहे—अपराध्याला कमरेपर्यंत मातींत पुरायचं आणि त्यानंतर त्याच्यावर कुत्रे सोडायचे. अर्धवट लचके तोडून ते कुत्रे त्या माणसाला ठेवून तसेच निघून जातात आणि पुन्हा येऊन

परत लचके तोडूं लागतात आणि शेवटीं तो माणूस मरतो. फॉस्टर आणि तकीखाँ या दोघांना मी ही शिक्षा देत आहें. "

ते दोघेही गर्भगळीत झाले. मनांतल्या मनांत ईश्वराची प्रार्थना करूं लागले.

तितक्यांत फॉस्टरची नजर तंबूच्या दाराबाहेर गेली. एक जटाजूटधारी काषायवस्त्र परिधान केलेला महापुरुष त्याच्याकडे पहात होता. पहातां पहातां फॉस्टरला तंद्रा आली. त्या जटाधारी पुरुषाचे ओठ हालत होते. फॉस्टरला वाटलें कुणितरी आपल्याला विचारतें आहे, "या भयंकर शिक्षेतून सुटावं अशी तुझी इच्छा आहे ना ? तर मग माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. तूं शैवलिनीचा जार का ?" फॉस्टरनें निर्धारानें 'नाहीं' म्हणून सांगितलें तेव्हां पुन्हा त्याला प्रश्न ऐकूं आला. "मग शैवलिनी तुझ्या गलबतांत कां होती ?"

फॉस्टर मोठमोठ्यानें बोलूं लागला, "शैवलिनीच्या रूपाला भाळून मी तिला तिच्या घरांतून पळवलें आणि माझ्या गलबतावर आणून ठेवलें. तीही मला भाळली आहे असा माझा समज होता, पण मला अनुभव आला तो वेगळा. पहिल्याच भेटीला तिनें छपवलेली सुरी बाहेर काढून मला म्हटलं, 'तूं या माझ्या केबिनींत आलास तर मी तुला मारीन आणि मीही मरेन. मी तुझी आई आहें !' तेव्हांपासून मी तिला कधीं बोटसुद्धां लावलं नाहीं. तिनं आमच्या घरचं अन्न खाल्लं नाहीं. ती स्वतः रांधून दूध आणि भात याखेरीज कांहीं खात नसे. गंगेतलं पाणी स्वतः काढून घेत असे—"

तो बोलत होता तोंच दुरून आवाज आला—धुडुम् धुम् धुम्—तो इंग्रजांच्या तोफेचा आवाज होता.

सगळीकडे धांवाधाव पळापळ सुरू झाली. एकामागून एक तोफेचे आवाज ऐकूं येत होते. रणवाद्यें वाजूं लागलीं होतीं. जिकडे तिकडे एकच धुमाळी माजूं लागली होती.

तंबूंत असलेले अमीर उमराव एकदम तंबूबाहेर पडले. कुणी रणांगणाकडे धांवले, तर कुणी मागल्या दारानें पळ काढला. कुलसुम, चंद्रशेखर, शैवलिनी आणि फॉस्टर हेही बाहेर निघाले. तंबूंत फक्त नबाब आणि तकीच तेवढे राहिले.

इतक्यांत एक तोफेचा गोळा येऊन तंबूजवळ पडला. नबाबानें कमरेची तरवार म्यानाबाहेर काढली आणि ती तकीच्या छातींत खुपसली.

तकी गतप्राण झाला आणि नबाब तंबूच्या बाहेर पडला.

• •

## : ८ :

♣ **शैवलिनीला** घेऊन चंद्रशेखर बाहेर आला. रमानंदस्वामी तिथेंच उभे होते. ते म्हणाले, " आतां पुढं काय करणार तूं चंद्रशेखर ? "

" आतां शैवलिनीला वांचवलं पाहिजे. " चंद्रशेखर म्हणाला, " चौहीकडे गोळे पडताहेत, वातावरण धुरानें भरून गेलं आहे, यावेळीं काय करावं, कुठं जावं, तेंच कळत नाहीं मला. "

रमानंदस्वामी म्हणाले, " भिऊं नकोस ! यवनांची सेना कुठं पळते आहे तें पाहिलंस ना ? लढाईची सुरवातच जिथं पलायनानं होते आहे तिथं रण-जयाची अपेक्षा कुठली ? इंग्रजांची जात मोठी भाग्यवान, मोठी बलवान् आणि कुशल दिसते. आज-उद्यां हे इंग्रज सारा भारतवर्ष आक्रमण करणार असं वाटतंय मला ! चल, आतां आपण या पळपुट्या मुसलमानांच्या मागोमाग जाऊं. तुला मला भीति नाहीं, पण या मुलीचीच काळजी वाटते आहे मला. "

तिघेही पळपुट्या मुसलमानांमागून निघाले. इतक्यांत समोरून एक शस्त्र-धारी हिंदूसेना लढाईच्या आवेशांत डोंगराच्या भुयारांतून बाहेर येऊन इंग्रजांवर चाल करून जात असलेली त्याला दिसली. घोड्यावर स्वार झालेला त्यांचा नायक मध्यभागीं होता. तो प्रताप असल्याचें त्यांनीं ओळखलें. प्रतापला पहातांच चंद्रशेखर अस्वस्थ होऊन म्हणाला, " हें काय चालवलं आहेस प्रताप ? तूं कां या लढाईच्या धुमश्चक्रींत ? माग फीर. "

" मी तुमच्याच शोधांत निघालों होतों. " प्रताप म्हणाला, " चला, मी तुम्हाला सुरक्षित जागीं घेऊन जातों. "

डोंगरांतले आडवळणाचे रस्ते प्रतापला चांगलेच माहीत होते. प्रताप त्यांना घेऊन लढाईच्या मैदानापासून दूर अंतरावर गेला; तेव्हां चंद्रशेखरनें नबाबासमोर घडलेली सारी हकिकत त्याला सांगितली.

चंद्रशेखर प्रतापला उद्देशून म्हणाला, " तूं धन्य आहेस प्रताप. तुला जें माहित होतं तें आतां मलाही कळलं आहे—" प्रताप चकित होऊन त्याच्याकडे पाहूं लागला तेव्हां तो गहिंवरून म्हणाला, " आतांच मला कळलं, कीं ही निष्पाप आहे. लोकांच्या समजुतीसाठीं प्रायश्चित्त करावं लागलं तर तें मी करीन

आणि हिला घरीं घेऊन जाईन--पण माझ्याकपाळीं सुख आहे असं कांहीं दिसत नाहीं."

" असं कां म्हणतां ?" प्रताप म्हणाला, "स्वामींच्या औषधाचा कांहीं उपयोग झाला नाहीं का ?"

" हा वेळपर्यंत नाहीं." चंद्रशेखर म्हणाला.

प्रताप खिन्न झाला. त्याच्या डोळ्यांना पाणी आलें. पदराच्या बुरख्यांतून शैवलिनीनें तें पाहिलें. तिनें हातानें खूण केली तेव्हां तो घोड्यावरून तिच्या बाजूला आला. ती हळूच त्याला म्हणाली, "मी तुमच्या कानांत सांगतें तें ऐकून घ्या. त्यांत कांहीं दोष येण्याजोगं नाहीं."

प्रताप चकित होऊन म्हणाला, "तुझं वेड म्हणजे ढोंगच का ?"

" या क्षणीं तरी तें ढोंग आहे." शैवलिनी म्हणाली, "आज सकाळीं जागी झाल्यापासून मला सारं कांहीं कळूं लागलं आहे. खरोखरच का मी वेडी झालें होतें ?"

प्रतापची मुद्रा खुलली. त्याचा उद्देश ध्यानीं येऊन ती त्याला म्हणाली, " चुप ! यावेळीं कांहीं बोलूं नकोस. मीच काय तें बोलतें—पण तुझी संमति असली तर ! "

" माझी संमति कशाला ?" प्रताप म्हणाला.

शैवलिनी म्हणाली, " माझ्या नवऱ्यानं पुन्हा माझा स्वीकार केला तर माझ्या मनांतलं पाप चोरून ठेवून मी त्याची प्रणयभागिनी होऊन रहाणं योग्य होईल का ?

" तुझा काय उद्देश आहे ?" प्रतापनें विचारलें.

" पूर्वीचा सारा इतिहास त्यांना सांगायचा आणि त्यांची क्षमा मागायची."

प्रताप क्षणभर विचार करून म्हणाला, " सांगून टाक ! माझा आशीर्वाद आहे तुला—तूं सुखी हो ! " असे म्हणतांना त्याच्या डोळ्यांत आंसवें आलीं.

" आतां मी सुखी होणं अशक्य ! " शैवलिनी म्हणाली, " तूं आहेस तोंवर मला सुख नाहीं—"

" म्हणजे काय शैवलिनी ?"

" या पृथ्वीवर जोंपर्यंत तूं हयात आहेस तोंपर्यंत माझ्यासमोर येऊं नकोस."

शैवलिनी म्हणाली, " बायकांचं मन मोठं चंचल असतं—केव्हां चळेल याचा नेम नाहीं. याजन्मीं तरी तूं माझ्या समोर येऊं नकोस. "

प्रतापनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यानें घोड्यावर उडी घेतली आणि तो लढाईच्या मैदानाकडे धांवत गेला. त्याचें सैन्य त्याच्या मागोमाग धांवत सुटलें. तो जात असतांना चन्द्रशेखरनें त्याला विचारलें, " कुठं चाललास ? "

" लढाईच्या मैदानावर ! " प्रताप म्हणाला.

" जाऊं नकोस ! जाऊं नकोस !! जाऊं नकोस !!! " चन्द्रशेखर त्याच्या मागें धांवत ओरडला, " इंग्रजांशीं युद्ध करण्यांत तरणोपाय नाहीं. "

प्रताप थांबला आणि म्हणाला, " फॉस्टर अजून जिवन्त आहे. त्याचा जीव घेणार आहें मी. "

चंद्रशेखरनें धांवत जाऊन त्याच्या घोड्याचा लगाम धरला आणि म्हटलें, " फॉस्टरच्या वधाचा भार तूं कां घेतोस भाई ? दुर्जनाला शिक्षा देणारा भगवान् आहे. शत्रूच्या बाबतींत जो सूडाची भावना ठेवतो तो अधम !-शत्रूला क्षमा करतो तोच उत्तम ! "

प्रताप चकित झाला—रोमांचित झाला. घोड्यावरून खालीं उतरून त्यानें चंद्रशेखरची पायधूळ घेतली. तो म्हणाला, " माणसाच्या जातींत आपण धन्य आहां. मी फॉस्टरला कांहीं करणार नाहीं. " असें म्हणून तो घोड्यावर बसून रणांगणाकडे निघत आहे असें पाहून चंद्रशेखर म्हणाला, " तर मग आतां तिकडे कशाला जातोस प्रताप ? "

प्रतापनें मागें वळून पाहिलें, तो गोड गोड हंसला आणि म्हणाला, " तसंच कारण आहे. " असें म्हणून त्यानें घोड्याला चाबूक हाणला आणि दौड करीत तो निघून गेला.

त्याचें तें हंसणें पाहून रमानंदस्वामी उद्विग्न झाले. ते चंद्रशेखरला म्हणाले, " आपल्या बायकोला घेऊन तूं घरीं जा. एक दोन दिवसांत मी तुला भेटेन. "

चंद्रशेखर म्हणाला, " प्रतापच्या बाबतींत मी फार उद्विग्न झालों आहें. "

" त्याच कामगिरीवर मी चाललों आहें ! " रमानंदस्वामी म्हणाले.

चंद्रशेखर आणि शैवलिनीचा निरोप घेऊन रमानंदस्वामी लढाईच्या मैदानाकडे निघाले. धुरानें भरून गेलेल्या, जखमी लोकांच्या विव्हळण्यानें नादावलेल्या

त्या लढाईच्या मैदानावर चोंहीकडून गोळ्यांचा वर्षाव होत असतांना ते प्रतापचा शोध करीत होते. जिकडे तिकडे प्रेतांचा खच पडला होता. कांहीं अर्धवट जिवंत होते, तर कांहीं मेलेले होते. कित्येकजण आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांचीं नांवें घेऊन हांका मारीत होते. कुणी लढत होते तर कुणी पळत होते.

हा तपास करतांना थकून जाऊन रमानंदस्वामी एका झाडाच्या बुंध्याशीं बसले. रणांगणावरून पळून जाणारा एक शिपाई जात होता त्याला त्यानीं विचारलें, " सारेच पळताहेत, मग लढाई करतो आहे कोण ? "

शिपायी म्हणाला, " एक हिंदू काय तो लढतो आहे."

" तो कुठं आहे ? " म्हणून स्वामींनीं विचारलें तेव्हां शिपाई म्हणाला, " तो पहा गडाच्या समोर." असें म्हणून त्यानें पळ काढला.

रमानंदस्वामी गडाच्या दिशेनें निघाले.

युद्ध थांबलें होतें. कांहीं हिंदू आणि कांहीं इंग्रज यांचीं प्रेतें पडलीं होतीं, तर कांहीं मरणोन्मुख झालेले शिपायी कण्हत होते. एका हिंदूच्या कण्हण्याचा आवाज ऐकून त्या प्रेताच्या ढिगांतून स्वामींनीं त्याला बाहेर काढलें. तो प्रताप होता. तो जखमी होऊन मरायला टेकला होता, पण अजून जिवंत होता.

कुठून तरी पाणी आणून स्वामींनीं तें त्याला पाजलें. प्रणाम करण्यासाठीं प्रतापनें हात वर उचलण्याचा प्रयत्न केला पण तो साध्य झाला नाहीं.

स्वामी म्हणाले, " लवकर बरा हो, हाच आशीर्वाद आहे माझा ! "

" आतां कसला बरा होतों ? " प्रताप मोठ्या कष्टानें म्हणाला, " आतां लवकरच मी दुःखमुक्त होईन. आपली पदधुली माझ्या माथीं लावा. "

स्वामी म्हणाले, " आम्हीं नको म्हटलं तरी कां धावलास या रणांगणाकडे ? तुला शैवलिनीनंच सांगितलं का तसं ? ती आतां साफ बरी झाली आहे हें मी जाणतों. ती तुला विसरली नाहीं —"

प्रताप म्हणाला, " यापुढं मला केव्हांही भेटूं नकोस असं शैवलिनी म्हणाली. मी हयात आहें तोंवर शैवलिनी आणि चन्द्रशेखर यांना सुख लागायचं नाहीं. चन्द्रशेखरचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. त्याच्या

सुखांत मी कांटा होऊन कां बसूं ? म्हणूनच मी आपली अवज्ञा केली आणि या रणांगणावर आलों."

आतां पहिल्यानेंच रमानंदस्वामींच्या डोळ्यांना पाणी आलें. ते म्हणाले, "खरा परोपकारी आहेस तूं. आम्हीं नुसते ढोंगी. तुला अक्षय स्वर्गलाभ होईल—" क्षणभर थांबून ते म्हणाले, "ऐक वत्सा, मला तुझं मन कळलं आहे. या तुझ्या इंद्रियजयापुढं ब्रह्मांडाचा जय सुद्धां कांहींच नव्हे. शैवलिनी-वर तुझं प्रेम होतं ना ?"

झोंपलेला सिंह जागा झाला. मरणोन्मुख झालेल्या प्रतापला एकदम अवसान आलें आणि तो म्हणाला, "तुम्हाला कसं कळणार ? तुम्ही संन्यासी आहां. माझ्या या प्रेमाचा अंत घेईल असा कोण माणूस आहे या जगांत ? या सोळा वर्षांत केवढं माझं प्रेम होतं शैवलिनीवर ! पापी बुद्धीनं मी पहात नव्हतों तिच्याकडे—माझं प्रेम—माझ्या प्रेमाचं नांव—जीवनविसर्जनाची आकांक्षा ! नसानसांतून, रक्ताच्या प्रत्येक बिंदूंतून, हाडामांसातून माझा अनुराग अहोरात्र वावरत होता. कुणालाही तो कळला नाहीं—मी कळूं दिला नाहीं !—मरतां मरतां कां आपण हा प्रश्न केला मला ? या अनुरागाच्या पायीं या जन्मीं माझं कल्याण होणार नाहीं म्हणून मी हा देहत्याग केला. माझं मन कलुषित झालं आहे. शैवलिनीच्या हृदयांत पुन्हां कसली तरी भावना निर्माण होईल—माझ्या मृत्यूखेरीज त्याला दुसरा उपाय नाहीं म्हणून मी मरतों आहें. आपण सर्व कांहीं जाणतां—आपण ज्ञानी आहां, शास्त्रदर्शी आहां, आपणच सांगा, माझ्या पापाला प्रायश्चित्त कोणतं ? जगदीश्वरासमोर मी दोषी आहें का ? त्या प्रायश्चित्तानं मी मुक्त होईन का ?"

"तें मला माहीत नाहीं." रमानंद स्वामी म्हणाले, "इथं माणसाच्या ज्ञानाची गति खुंटते. शास्त्रं इथं मुकीं होतात. आतां ज्या लोकीं तूं जातो आहेस त्या लोकेश्वराखेरीज दुसऱ्या कुणालाच या प्रश्नाचं उत्तर देतां येणार नाहीं. तरीपण मी एवढंच म्हणतों, कीं इंद्रियविजयांत जर स्वर्ग असेल तर तुला अनंत स्वर्ग लाभेल. चित्तसंयमांत जर पुण्य असेल, तर तुझ्या पुण्याच्या तोडीला देवदेवताही येणार नाहींत. परोपकारानं जर स्वर्ग मिळत असेल, तर

दधीची ऋषीपेक्षांही स्वर्गावर तुझा जास्त अधिकार आहे. जन्मजन्मान्तरीं तुझ्या सारखाच मला इंद्रियजय करतां यावा असंच मागणं मी देवाकडे मागतों. "

रमानंद स्वामी स्तब्ध झाले.

हळुहळु प्रतापचा आत्मा त्याच्या देहाला सोडून गेला. उज्वलस्वरूप असलेला तो सुवर्णवृक्ष गवताच्या राशींत कोलमडून पडला.

तर मग प्रताप, त्या अनंतधामीं जा. जिथं इंद्रिय जयांत कष्ट नाहींत, रूपांत मोह नाहीं, प्रणयांत पाप नाहीं, त्याच स्थानीं जा. रूप अनंत आहे, अनंत प्रणय आहे, अनंत सुख आहे आणि सुखांत अनंत पुण्य आहे, त्या स्थानीं जा. जिथं परक्याचं दुःख परके जाणतात, जिथं परक्याच्या जयाचे पवाडे परके गातात, परक्यासाठीं जिथं परक्याला मरावं लागत नाहीं, त्या महान् ऐश्वर्यमय अशा दिव्य लोकांत जा. लाखों शैवलिनी पायावर लोळल्या तरीदेखील त्यांच्यावर प्रेम करावंसं तुला वाटणार नाहीं !

समाप्त

# आमचें नवें प्रकाशन

## बंकिमसाहित्यमाला

१ दुर्गेशनंदिनी
२ कपालकुंडला
३ मृणालिनी
४ विषवृक्ष
५ इंदिरा व युगलांगुरीय
६ चंद्रशेखर
७ रजनी व राधाराणी
८ आनंदमठ
९ देवी चौधुराणी
१० सीताराम
११ कृष्णकांताचें उईल
१२ राजसिंह

ही ग्रंथमाला १२ पुस्तकांत गुंफली जाणार आहे. हिचें संपादन श्री. **मामा वरेरकर** करीत असून पहिलीं सहा पुस्तकें निघालीं आहेत व बाकीचीं पुढें चालू आहेत. **प्रत्येक पुस्तकाची किंमत** २ रु. ट. ख. निराळा.

नवभारत प्रकाशन संस्था; मुं. ४

# आमचें प्रकाशन

## नाथमाधव-माला

| | |
|---|---|
| डॉक्टर कादंबरी | ८-०-० |
| वीरधवल | ८-०-० |
| ,, (शालेय) | १-४-० |
| सोनेरी टोळी | ५-०-० |
| देशमुखवाडी | ५-०-० |
| विमलेची ग्रहदशा | ३-०-० |
| विहंगवृंद | ३-०-० |
| सुहासिनी | २-८-० |
| सापत्न भाव | ३-८-० |
| हेमचंद्र रोहिणी | १-८-० |
| सांवळ्या तांडेल | २-०-० |
| ,, (शालेय) | १-२-० |
| दोन भावंडें | २-०-० |
| ,, (शालेय) | १-०-० |
| मालती माधव | १-८-० |
| ग्रहदशेचा फेरा | २-०-० |

### नाटकें

| | |
|---|---|
| मराठ्यांचा आत्मयज्ञ | १-८-० |
| जातिवंत मराठा वीर | १-८-० |
| नेताजी पालकर | २-०-० |

## शरत्साहित्य-माला

श्रीकांत भाग १ ते ४ किं. अनुक्रमें रु. १॥, २, २, २

| | |
|---|---|
| देवदास व बिंदुचें बाळ | ४-०-० |
| भारती | ६-०-० |
| गांवगंगा | २-०-० |
| शुभदा | ३-०-० |
| काशीनाथ | १-८-० |
| माधवी | १-८-० |
| भैरवी | ३-८-० |
| विजया | ४-०-० |
| चंद्रनाथ, दर्पचूर्ण, | ३-०-० |
| शेष प्रश्न | ५-०-० |
| चार मिनार | १-८-० |
| विराज-वहिनी | २-८-० |
| ब्राह्मणाची मुलगी | २-०-० |
| विप्रदास | ४-०-० |
| परिणीता | ३-१२-० |
| पंडित महाशय | ३-१२-० |
| चरित्रहीन भाग १ ला | ४-०-० |
| ,, भाग २ रा | ४-०-० |
| शेवटचा परिचय | ७-०-० |
| नाटक शास्त्र आणि तंत्र | ३-०-० |

**नवभारत प्रकाशन संस्था — मुंबई नं. ४.**